म. ग्रं. सं. ठाणें

विषय चरित्र

लेखक गणेश जनार्दन आगरे

सन १८९१

पुस्तकाचें नांव सद्गुण मंजरी.

ग्रंथालय क्रमांक

२७

१५८४

चरित्र

३२३

# सद्गुणमंजरी.

## एका हतभाग्य स्त्रीचें चरित्र.

हें पुस्तक

गणेश जनार्दन आगाशे बी. ए,

हेडमास्तर हायस्कूल धुळें, यांनीं तयार केलें.

तें

आर्यभूषण छापखान्याचे म्यानेजर

यांनीं

"आर्यभूषण" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

पुणें

१८९०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

पुणें येथें
" आर्यभूषण " छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

मिस् ए. हर्फर्ड

लेडी सुपरिंटेंडेंट, गर्ल्स् हायस्कूल पुणें,

यांस

कृतज्ञतापूर्वक

त्यांच्या

प्रिय शिष्येचें हें अल्प चरित्र

परमादरानें

नजर केलें असे

ग्रन्थकर्ता

सं. ६ १३० ९२७ २८ २

तला व त्या गुणांचा विकास होऊं दिला नाहीं. हल्लींचे इंग्लंदांतील कविशिरोमणी तेनिसन यांनीं या अल्पवयी मुलाचे गुणही आपल्या एका काव्यांत अजरामर करून टाकिले आहेत. सारांश, सहृदय जनांस सद्गुणी जनांचे चरित्राचे मननापासून व पठनापासून आल्हाद वाटतो व हा आल्हाद अगदीं अनिर्वर्णनीय आहे हेंही ते जाणतात. एखादी सुकुमार लता आपल्या बागेंत आपण वाढवावीः तिच्या त्या नाजूक अवस्थेंत आपण मोठ्या कौतुकानें नानातऱ्हेच्या उपायांनीं तिची मशागत करावी आणि दुर्दैवानें त्या लतेला ऐन भरांतच रोगानें गांठावें व ती सुकून जावीः तिच्या सुगंधि फुलांचा सुवास आपण आतां थोड्या काळांतच घेऊं अशी आपण आशा धरून बसलों असतां अकस्मात् आपली निराशा व्हावीः तद्वतच या चरिताच्या नायिकेची स्थिति झाली. तथापि लतेच्या सुकुमार पल्लवांचे केवळ अवलोकनानेंच जसा एक प्रकारचा आनंद होतो तसाच या गोष्टीच्या नायिकेच्या गुणांचे मननापासून रसिक जनांचे मनास आनंद व बोधही होईल याविषयीं आम्हांस कांहीं शंका नाहीं; दुर्दैवामुळें त्या लतेचीं फुलें आपल्या दृष्टीस पडलीं नाहींत ह्यास उपाय नाहीं. परंतु अशीं उत्तम फुलें येण्याची सिद्धता कशी झाली व त्या लतेचें

संगोपन कसें करावें लागलें हें समजल्यानेंही पुष्कळ उपयोग आहे.

प्रसिद्ध भाषाभिज्ञ म्याक्समुलर यांचें नांव आमच्या सर्व वाचकांस विश्रुत आहेच. त्यांनीं आपल्या एका ग्रंथांत चरित्रलेखनासंबंधीं कांहीं मार्मिक विचार प्रकट केले आहेत. ते ह्मणतात प्रत्येक थोर मनुष्याचे चरित्रास तीन अंगें किंवा स्वरूपें असतात. ह्यांत पहिलें त्याचें 'बाह्य स्वरूप.' ह्यांत जे जे त्यानें पराक्रम केले असतील त्यांचा समावेश होतो. तसेंच त्याची जी वागणूक चारचौघा लोकांत असते तिचा ही अंतर्भाव या स्वरूपांतच होतो. हें सर्व आचरण लोकप्रसिद्ध असतें. मनुष्याच्या चरित्राचें दुसरें अंग अगर स्वरूप जें असतें त्यास आपण 'अंतरंग स्वरूप' असें ह्मणूं. यांत त्या मनुष्याची घरगुती वागणूक, त्याचें आप्त इष्ट मित्रांशीं सौजन्य वगैरे गोष्टींचा समावेश होतो. वर सांगितलेल्या बाह्य स्वरूपाविषयीं माहिती प्रायः सर्वांस असते; कारण ज्या बाह्य आचरणाचा यांत समावेश होतो तें आचरण सर्वांना महशूर असतें; परंतु अंतरंग स्वरूप ह्मणून जें सांगितलें तें फारच थोड्या लोकांस ठाऊक असतें. इतिहासांत व चरित्रांत बाह्यस्वरूपाचें सविस्तर वर्णन केलेलें असतें, परंतु अंतरंग स्वरूपाची माहिती केवळ जिवलग अ-

सणाऱ्या आप्तमित्रांसच असल्यामुळें तिचा उल्लेख फारसा सविस्तर मिळत नाहीं, परंतु या अंतरंग स्वरूपाहूनही गुप्त असें एक चरित्राचें अंग आहे, त्यास आपण 'गूढ स्वरूप' असें नांव देऊं. या गूढ स्वरूपाचा साक्षी एक ज्याचा तोच, किंवा एक सर्वात्मा परमेश्वर मात्र असतो; कारण अंतरंग स्वरूपांत सुद्धां प्रत्येक मनुष्य कांहीं खबरदारीनें वागत असतो. आपल्या इष्टमित्रांशीं काय, परंतु प्रत्यक्ष बायकोपाशीं आणि पोटच्या मुलापाशीं सुद्धां कांहीं गोष्टी मनुष्यें चोरून ठेवितात. एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहेः "दारेषु किंचित् स्वजनेषु किंचित् गोप्यं वयस्येषु सुतेषु किंचित्." मनुष्याच्या अंतरंगांत खरोखर ज्या वृत्ती उचंबळत असतात व ज्या त्याच्या मनाच्या बाहेर कधींच येत नाहींत, त्या त्याच्या त्यालाच ठाऊक असतात. या मनोवृत्ती ह्मणजे नानातऱ्हेचे मनांतील संकल्प होत. ह्यांत कृतीचा भाग प्रायः मुळींच नसतो असें ह्मटलें तरी चालेल. मनुष्यें एकांतांत आपल्याशींच विचार करीत बसलीं असतां जे नाना तरंग त्यांच्या मनांत उठतात त्यांवरून त्यांचें गूढ स्वरूप समजण्यांत येतें. हें गूढ स्वरूप समजण्याला प्रायः कांहीं मार्ग नसतो, परंतु प्रत्येक मनुष्याची खरी योग्यता या गूढ स्वरूपावरूनच ओळखावयाची. याचें हुबेहुब चित्र काढणें

हीच कवीच्या निर्माणकौशल्याची खरी कसोटी आहे व कवींनीं कल्पिलेल्या निरनिराळ्या व्यक्तींचें वैचित्र्य या गूढ स्वरूपरचनेवरूनच स्थापित होतें. शेक्सपियरच्या 'Soliloquies' (आपल्याशींच भाषण) व कालिदासाचीं "स्वगतानि" जर त्यांच्या नाटकांतून काढून टाकिलीं तर त्या नाटकांची योग्यता व प्रत्येक पात्राची खुबी पुष्कळ अंशीं कमी होईल हें मार्मिक जनांस सांगावयास नको, व हे अंतरात्म्यांतील गूढ व्यापार समजण्यास जर आपल्यास सर्वत्र साधन असतें तर काय मजा होती बरें? नेपोलियनासारख्या किंवा शिवाजीसारख्या पुरुषांच्या अंतर्गत व्यापारांचें जर एखादें टिपण सांपडेल तर आपले जे हल्लींचे ग्रह त्यांजविषयीं आहेत त्यांत पुष्कळ नफावत पडेल. कदाचित् हल्लीं ज्यांना बाह्य आचरणावरून जग चांगलें मानीत असेल त्यांचे अंतर्यामांत फार खोडसाळपणा भरलेला होता अशाविषयीं जर कांहीं खात्रीलायक पुरावा मिळेल तर इतिहासाच्या पुष्कळ भागांत फेरफार करावे लागतील. असो. ह्या सर्व गोष्टींचा उल्लेख येथें करण्याचें कारण इतकेंच कीं आह्मी जें चरित्र पुढील भागांत सांगणार तें लिहिण्यास आह्माला या गूढस्वरूपाचीच माहिती खात्रीलायक मिळाली आहे व त्याच्या आधारानेंच हें काम आह्मीं हातीं धरिलें आहे.

ह्या चरित्रांत कोणत्याही प्रकारच्या कृतींचें वर्णन नाहीं हें आम्ही एवढा वेळ सांगितलें. काय जें आहे तें शेवटीं वर्णन केलेल्या गूढ स्वरूपाचे चुटके व आरंभापासून शेवटपर्यंत ज्ञानवृद्धि आणि मानसशुद्धि ह्या दोन प्रधान हेतूंस अनुलक्षून केलेला अव्याहत परिश्रम. या परिश्रमाची फलद्रूपता होऊन परिश्रम करणारीचे मनास समाधान व्हावें व तिच्या देशबांधवांची तिचे हातून सेवा घडावी इतकी पुण्याई तिचे पदरीं नव्हती, किंवा आपल्याच दुर्भाग्यामुळें तशी गोष्ट ईश्वराला रुचली नाहीं. कसेंही असो. आमच्या येथें सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं ह्या चरित्रांत भावि उदयाचें बीज मात्र आहे. उदय तर झालाच नाहीं. पण एखादा अंकुर फुटला न फुटला तोंच लतेच्या मुळीवर घाव पडला व लता नाहींशी झाली. ह्यामुळें जे पराक्रमाचे भोक्ते आहेत त्यांची हें चरित्र वाचल्यानें निराशा होईल; परंतु एकाग्र मनानें अभ्यास केला असतां अल्प काळांतही किती ज्ञानप्राप्ति होते व मनाला विचार प्रागल्भ्य येतें, तसेंच अल्प वयांतही दृढ निश्चयानें पापवासनेचें आकलन होऊन धर्माचरणाची लालसा वाढत जाऊन ईश्वराचे ठायीं निष्ठा दृढतर होत जाते, परदुःखानें हृदयांत उमाळा फुटून स्वदुःखाविषयीं उदासीनता होत जाते व जों जों संकटें अधिक अ-

धिक येतात तों तों तीं सहन करण्याविषयीं मनाला धैर्य येत जातें, इत्यादि गोष्टी अनुभवसिद्ध वाचण्याची ज्यांना हौस असेल त्यांना या अल्पशा चरित्राचा कंटाळा वाटणार नाहीं असें आह्मास वाटतें.

# सद्गुणमञ्जरी.

## भाग पहिला.

आवडाबाईचा जन्म सन १८६९ सालीं जून महिन्याचे २९ तारखेस रत्नागिरी येथें झाला. त्यावेळीं तिचे वडील रावबहादूर विष्णु मोरेश्वर भिडे त्या जिल्ह्यांत डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर होते. या मुलीचा जन्म झाल्यावर दोन महिन्यांनीं विष्णुपंतांची बदली नाशिक येथें प्रिन्सिपाल सदर आमिनीचे जागेवर झाली. आपल्या कामावर रुजू झाल्यावर त्यांनीं थोडे दिवसांनीं आपलें कुटुंब नाशिकास नेलें. तेथेंच ह्या मुलीच्या वयाचीं ३।४ वर्षें गेलीं. या ३।४ वर्षांत ही मुलगी इतर मुलींप्रमाणें हिंडूं फिरूं लागली व थोडथोडें बोलूं लागली. नाशिक येथें असतांना विष्णुपंतांचे पदरीं गोविंदराव चिंधडे या नांवाचा एक गरीब ब्राह्मण नोकरीस होता. या नोकराचा आवडीस फार लळा लागला व आवडीचें याजवर जें प्रेम जडलें तें नी आमरणान्त विसरली नाहीं याविषयीं उल्लेख पुढें येईलच.

पुढें कांहीं वर्षांनीं विष्णुपंत यांची बदली सुरत येथें झाली व त्यांनीं आपलें कुटुंब आपलेबरोबर

नेलें; परंतु तेथें घरच्या मंडळीस हवा मानवली नाहीं यामुळें थोडे दिवसांनींच त्यांनीं आपलें सर्व कुटुंब पुण्यास पाठवून दिलें व त्या दिवसापासून आवडा-बाईच्या वयाचा बहुतेक काल तेथेंच गेला. ती ल-हानपणींच थोडेंबहुत लिहिण्यावाचण्यास शिकली होती तथापि पुढें थोडे वर्षांनीं जी विद्येची अभिरुचि हिच्या अंगीं दृष्टीस पडूं लागली तिचा अंकुर या अल्पवयांत मुळींच दिसला नाहीं असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. लहानपणापासून हिच्या अंगांत एक दोन गुण मात्र लोकोत्तर होते. हिला प्रत्येक वस्तु जपून टापटिपीनें ठेवण्याची हौस होती. तसेंच कोणाच्या खोड्या वगैरे करणें हें तिच्या स्वभावाला मुळापासून आवडत नसे.

आवडाबाईचें लग्न सन १८८० सालीं सोलापूर मुक्कामीं झालें. हिच्या सासऱ्याचें नांव दादासाहेब जोग. हे त्या वेळेस सोलापूर मुक्कामीं ओव्हरसियर होते. दादासाहेबांच्या थोरल्या मुलास अप्पासाहेब ह्मणत असत व त्याच मुलाला आवडाबाई दिली होती. आवडाबाईच्या दुर्दैवानें विवाह झाल्यावर कांहीं महिन्यांनीं तिची सासू वारली व पुढें वर्ष सहा महिन्यांनीं सासऱ्यासही देवाज्ञा झाली. याप्र-माणें या मुलीवर एकामागुन एक संकटें येत चा-ललीं व ही मुलगी अपेशी आहे असा व्यर्थ अप-

शब्द तिला लोक लावूं लागले; परंतु त्या विचारीनें हें सर्व निमूटपणें सोशिलें. पुढें तिच्या दुःखाचा कडेलोट होऊन सन १८८६ सालीं जानेवारी महिन्याच्या १२ व्या तारखेस तिच्या नवऱ्याचाही अंत झाला व ही हतभागी मुलगी आपल्या वयाच्या सतराव्या वर्षी संसारसुखास आंचवली. पुढें आपल्या जिवास करमणूक व्हावी व यत्किंचित् तरी आपल्या देशाची सेवा आपल्या हातून घडावी असा उद्देश मनांत बाळगून तिनें अनन्यभावानें विद्यादेवीची आराधना केली. तो प्रकार पुढील भागांत सांगितला आहे.

---

## भाग दुसरा.

---

### विद्याभ्यास.

आवडीचे वडील रावबहादूर विष्णु मोरेश्वर भिडे हे मागल्या पिढीच्या अव्वल विद्वान् गृहस्थांपैकीं आहेत हें आमच्या वाचकांस माहीत आहेच. शिवाय, त्या काळीं नवीन मतांचा स्वीकार करून त्यांचा प्रसार करण्याकरितां जे थोडे लोक कायावाचामनेंकरून झटत होते त्यांत अण्णासाहेब हेही बरेच पुढारी होते. तेव्हां यांच्या घराण्यांत स्त्रीशिक्ष-

णाला थारा पूर्वींच मिळालेला होता व यामुळें मुलीं-
ना थोडेंबहुत लिहिणें, वाचणें वगैरे गोष्टी शिकवि-
ण्याविषयीं मुळींच अडचण नव्हती. घरांत कोणत्याही
मनुष्याचा या गोष्टीविषयीं दुराग्रह नसल्याकारणानें आ-
वडी लहान असतांनाच कांहीं दिवस मराठी शाळेंत
जात होती, परंतु पुढें लग्न झाल्यानंतर शाळेंत शिकणें बंद
झालें व माहेरीं आल्यानंतर फुरसतीच्या वेळेस जें थोडें-
बहुत शिकेल तेवढेंच. असा क्रम आवडी १५ व-
र्षांची होईतोंपर्यंत चालला. सन १८८४ सालीं हिं-
दुस्थान देशाचे खरे हितचिंतक मेहेरबान सर वुइ-
ल्यम वेडरबर्न यांनीं पुण्यांतील कांहीं पुढारी मंड-
ळीला सल्ला देऊन व द्रव्यद्वारा आणि इतर प्रकारा-
नें मदत करून त्यांजकडून मुलींकरितां हायस्कूल
स्थापन करण्याचा निश्चय करविला, व सर्व तयारी
झाल्यावर त्याच सालीं तारीख २९ सप्टंबर रोजीं
नामदार सर जेम्स फर्ग्यूसन मुंबईचे गव्हर्नर यांचे
हातून मोठ्या समारंभानें या शाळेची स्थापना झा-
ली. या नवीन शाळेच्या मुख्य चालकांपैकींच अ-
ण्णासाहेब हेही एक आहेत त्यामुळें यांची पूर्ण मदत
या शाळेस होतीच. तिचा मराठी चौथ्या इयत्तेप-
र्यंत अभ्यास पूर्वीं झालाच होता. शिवाय इंग्रजी पहिलें
पुस्तकही ती घरीं शिकलीच होती. या-
मुळें ही शाळा सुरू होतांच आवडीला या

मन त्याच्या भजनीं तल्लीन होत असे. याला कोणत्याही प्रकारचा अन्याय सहन होत नसे. क्रौर्याचा याला फार तिटकारा असे. त्याची स्वतःची वृत्ति शांत व उदासीन होती. कूपर याचे हे मनोधर्म आह्मी येथें सांगितले याचें कारण एवढेंच कीं 'समानशील व्यसनेषु सख्यम्' या म्हणीप्रमाणें शांत व उदासीन स्वभावाच्या आवडीला तिच्या स्वतःच्या शीलाप्रमाणेंच ज्याचें शील होतें असा कवी आवडला. कूपर कवीप्रमाणेंच हिचा सर्व प्रसंगीं ईश्वरावर हवाला असे. त्याच्यासारखेंच ईश्वर कृतीचें हिला अपार कौतुक वाटत असे. पतीच्या मरणामुळें हिचीही चित्तवृत्ति अगदीं उदासीन बनून गेलेली होती.

इंग्रजी गद्य ग्रंथांपैकींही कांहीं ग्रंथ हिनें वाचले होते. तिच्या मैत्रिणी मिस् भोर, व मिस् सोराबजी व तिची मुख्य अध्यापिका मिस् हर्फर्ड या सर्व तिला चांगलीं चांगलीं पुस्तकें वाचावयास देत असत. त्यांपैकी कित्येक पुस्तकांविषयीं उल्लेख तिच्या पत्रांत व रोजनिशींत आढळतात. मिस् एज्वर्थ या बाईच्या सुरस नीतिपर गोष्टी तिनें वाचल्या होत्या. शिवाय मासिक पुस्तकें व वेळोवेळीं कांहीं विवक्षित प्रसंगास अनुलक्षून प्रसिद्ध केलेलीं लहान पुस्तकेंही तीं वाचीत असे. पंडितारमाबाईनें लिहि-

लेल्या High Caste Hindu Women या पुस्तकावर आवडीनें आपल्या एका पत्रांत आपला अभिप्राय दिला आहे तें पत्र पुढील भागांत आम्ही देऊं.

येथवर आम्ही तिच्या संस्कृत आणि इंग्रजी अध्ययनाविषयीं माहिती सांगितली. शाळेंतील नियमित विषयाखेरीज ड्राइंग हाही विषय ती शिकत होती व इंग्रजी पांचवी इयत्ता शिकत असतांनाच ह्मणजे सन १८८७ सालीं एप्रिल महिन्यांत ती ड्राइंगच्या फर्स्ट ग्रेड परीक्षेस बसली. ती त्या परीक्षेंत पसार झाली एवढेंच नाहीं परंतु तिला फ्री ह्यांड आणि माडेल ड्राइंगबद्दल सर्टिफिकेट मिळून 'कर्तव्यभूमिति' या विषयांत बक्षिस मिळालें. भूमिति आणि फ्री ह्यांड ह्या विषयांत 'उत्तम' आणि 'माडेल' या विषयांत 'चांगला' असा शेरा परीक्षकांनीं दिला. या शेवटल्या विषयांत सुद्धां 'उत्तम' असा शेरा तिला मिळाला असता, परंतु ह्या विषयाचे परीक्षेचे वेळीं तिला मुलांबरोबर बसावें लागलें व असा प्रसंग तिला कधींच ठाऊक नसल्यामुळें ती त्या वेळेला घाबरली व तिचा हात कांपूं लागला असें तिनें आपल्या रोजनिशींत व आपल्या एका पत्रांत लिहिलें आहे. प्रत्येक वर्षी स्कालरशिपपरीक्षेंत व वार्षिक परीक्षेंत तिचा नंबर पहिला असे हें आह्मी वर सांगितलें-

च आहे; परंतु या संबंधानें एक विशेष गोष्ट सांगावयाची राहिली. ज्या गृहस्थांचा या शाळेशीं संबंध नाहीं अशा गृहस्थांकडून या दोन्ही परीक्षा दरसाल घेण्यांत येतात, यामुळें या परीक्षेंत पक्षपात किंवा सवलत किंवा असा कांहीं एक प्रकार न होतां मुलांच्या हायस्कुलाप्रमाणेंच परीक्षा कसोशीनें होते हें सांगावयास नको. सन १८८७ सालच्या स्कालरशिपच्या परीक्षेंत इंग्रजी भाषेंत परीक्षा रा. रा. वामन प्रभाकर भावे, पुणें नेटिव्ह इन्स्टिट्युशनचे प्रिन्सिपाल यांनीं घेतली. त्या सालीं आवडी ९ व्या इयत्तेंत होती व भावे यांनीं इंग्रजी निबंध लिहिण्याकरितां म्हणून पुढील विषय दिला. हा विषय काय होता व त्यावर आवडीनें निबंध काय लिहिला हें मराठी वाचकांस समजावें म्हणून आम्ही दोहींचें मराठी भाषांतर इंग्रजी निबंधाचे खालीं दिलें आहे-

**प्रश्न.** " In what way will you use the education that you receive here, in your domestic life"?

**उत्तर.** " I consider the education that I receive here to be of very great use to me in my after-life. Having been cut off from *the* worldly affairs by the will of God, I mean to pass my life in helping others ; and the education that I receive here, would be the most useful thing in accomplishing my object.

I shall help my mother in keeping accounts, in needle work, and in many other things. I

shall read pretty English stories to my mother and translate them into Marathi for her, and for those that would like to read them. I shall also read and explain the old Sanskrit books to her; and as she is very fond of listening to the Puranas, it will please her very much. Though it was not the wish of God that I should have any children, I shall instruct those of my dear sisters and friends; and in this way be useful to them. When I am with my dear father and brother, I shall not have to sit still as many poor girls in my position have to do. Then science and the higher subjects that I learn and mean to learn, will help me in talking with my father and brother; and I shall have the dear pleasure of seeing them pleased with me.

By the education that I receive here, I shall also be able to get money, out of which I shall spend some in helping the poor; and it will also make me independent.

I shall teach my country-women (and this is the principal aim of my life) the subjects that they want to learn; and in this way be useful to them.

The other subjects, such as music, drawing &c., will help me for my own amusement; and in this way the education that I receive here, will enable me to pass a happy, contented and independent life."

प्र० " जें शिक्षण तुला या शाळेंत मिळत आहे त्याचा उपयोग तूं गृहकृत्यांत कसा करशील?

उ० जें शिक्षण मला येथें मिळत आहे तें मला पुढें फार उपयोगी पडेल असें मी समजतें. माझा संसारपाश तोडावा हेंच ईश्वराच्या मर्जीस आल्यामुळें आपलें आयुष्य परोपकारांत घालवावें असा माझा संकेत झाला आहे, आणि हा माझा हेतु सिद्धीस नेण्याचे कामीं माझें चालू शिक्षण मला फार उपयोगीं पडेल.

घरचे हिशेबठिशेब ठेवण्याचे कामीं मी आपल्या आईला मदत करीन. इंग्रजींतील चांगल्या चांगल्या गोष्टी मी तिला वाचून दाखवीन, आणि तिला व इतर लोकांना त्या समजाव्या ह्मणून मी त्यांचीं भाषांतरें करीन. संस्कृत पुस्तकें मी तिला वाचून दाखवीन आणि समजून सांगेन आणि पुराणें ऐकण्याची तिला फार आवड असल्यामुळें तिच्या मनाला फार समाधान वाटेल. मला मुलें व्हावीं अशी जरी ईश्वराची मर्जी नाहीं, तथापि मी आपल्या बहिणींच्या आणि मैत्रिणींच्या मुलांस शिकवीन आणि अशा रीतीनें त्यांच्या उपयोगीं पडेन. माझ्यासारख्या दुर्दैवी मुलींना बाप किंवा भाऊ जवळ असतां कांहीं संभाषण करितां येत नाहीं, व त्यामुळें त्यांना निमूट बसावें लागतें. असें निमूट बसण्याचें मला कारण नाहीं. जे शास्त्रीय आणि इतर महत्वाचे विषय मी येथें शिकत आहें व पुढें

शिकणार त्यांच्या ज्ञानानें मला माझ्या बापाशीं आणि भावाशीं निरनिराळ्या विषयांवर बोलतां येऊं लागेल आणि त्यांना तशा भाषणानें संतोष झाला ह्मणजे माझ्याही मनाला फार गोड वाटेल.

शिवाय माझ्या सांप्रतच्या शिक्षणानें मला थोडाबहुत पैसा मिळविण्याचें सामर्थ्य येईल. या पैशांतून मी गरीबगुरिबांस मदत करीन आणि या पैशाचे योगानें मला स्वातंत्र्य मिळेल.

जें जें माझ्या देशभगिनींना शिकावयास पाहिजे तें तें मी त्यांना शिकवीन (आणि जन्मास आल्यासारखा हाच मुख्य हेतु मी मनांत बाळगिला आहे) आणि या रीतीनें मी त्यांच्या उपयोगीं पडेन.

गायन, ड्राइंग वगैरे जे इतर विषय मी शिकतें त्यांपासून माझ्या मनाला करमणूक होईल. या रीतीनें सुखानें, संतोषानें आणि स्वातंत्र्यानें माझें आयुष्य घालविण्याचें सामर्थ्य मला माझ्या चालू शिक्षणानें येईल."

वरील निबंधावर रा० भावे यांनीं "फार चांगला" शेरा दिला व ४० गुणांपैकीं ३९ गुण या निबंधास दिले. ज्यांना इंग्रजी येतें त्यांना या निबंधांतील वाक्यरचनेची खरी योग्यता समजेलच. यासारखा निबंध पांचव्या इयत्तेंतील फारच थोडया विद्यार्थ्यांना लिहावयास येईल हें कोणीही कबूल

करील. या निबंधाची भाषा जशी प्रशंसेला पात्र आहे तशीच त्यांतील विषयाची जुळणी सुद्धां तारीफ करण्यासारखी आहे. या एका निबंधांतच या मुलीच्या सर्व अंतर्यामाची प्रतिमा उभी आहे. ईश्वरानें ज्या असह्य वैधव्य दुःखांत तिला पाडिलें त्याबद्दल कांहीं एक कुरकुर न करितां तो ठेवील त्या स्थितींत राहून त्यांतच होईल तितका परोपकार करावयास झटावें असा अगदीं कोंवळ्या वयांतही मनाचा संकल्प होणें ही अल्प गोष्ट नाहीं. या शाळेंत जे अनेक विषय शिकविले जातात त्या प्रत्येक विषयाचा कोणकोणता उपयोग करितां येईल हें तिनें मोठ्या समंजसपणानें सांगितलें आहे. त्यांत एक गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं जगांत ज्या अनेक खटपटी चालू आहेत त्यासंबंधीं व निरनिराळ्या शास्त्रीय व गहन विषयांवरही आपल्यास संभाषण करितां यावें अशी या मुलीला हौस होती. पाश्चिमात्य विद्येचा खरा संस्कार ज्यांचे मनावर घडला असेल, ज्यांना राजकीय, सामाजिक किंवा शास्त्रीय वगैरे विषयाचा खल करण्याची संवय असेल व त्यामुळें कचेरींतून किंवा नित्यव्यवसायावरून माघारें आल्यावर घरीं कांहीं ओकेंसें वाटत असेल, किंवा लायब्ररींतून किंवा बाहेरून चार मंडळींतून घरीं आल्यावर आपण एकाएकीं एखाद्या निराळ्या प्रदे-

शांत आलों असें वाटत असेल, किंवा घराबाहेर एकोणिसावा शतक लागला असून घरांत अजून चौदावा किंवा पंधरावाच शतक आहे असा ज्यांना भास होत असेल त्यांना शास्त्रीयसंबंधीं किंवा इतर अशाच गहन विषयावर आपल्या बापाशीं व भावाशीं भाषण करण्याविषयीं आवडीच्या महत्वाकांक्षेचें कौतुक वाटल्यावांचून राहणार नाहीं. शाळेंत जाऊन पुरीं तीन वर्षें झालीं नव्हतीं तोंच स्त्रीजातीची खरी थोरवी तिला कळूं लागली. सध्यांच्या काळीं गृहकृत्यांखेरीज इतर व्यवसाय प्रायः स्त्रियांना नाहींत असेंच ह्मटलें तरी चालेल. आपआपसांत त्यांचें भाषण चाललें असतां किंवा घरांतील आप्तस्वकीय पुरुषांशीं बोलणें चाललें असतां त्यांचा विषय बहुधा दागदागिने, चीजवस्त, मुलेंबाळें अशाच कांहीं गोष्टी असतात. फार झालें तर कथापुराणें इत्यादि ऐकणें किंवा त्यांतल्याच गोष्टी सांगणें, यापलीकडे बहुधा त्यांची गति नसतेच. यामुळें केवळ ज्ञानमार्गानें होणारा जो अमूर्त्त आनन्द त्याचा यांना बहुधा गन्ध सुद्धां नसतो. चित्रकर्म, शिल्प, कविता इत्यादिकांच्या अभ्यासानें, व त्या त्या कलेंतील कृतिनैपुण्याचे केवळ अवलोकनानेंच होणारा जो अनिर्वर्णनीय आल्हाद त्याची आपल्या स्त्रियांना ओळख सुद्धां नाहीं. कर्मेंद्रियगम्य आनंदापेक्षां ज्ञानेन्द्रियगम्य आनंद फार

श्रेष्ठ आहेत व अशा आनंदाचा आस्वाद आपल्या स्त्रियांस नाहीं ही एक मोठी उणीव आहे. या आनंदाची स्पृहा इतक्या अल्प काळांत आवडीला झाली हें खरोखर नवल मानण्यासारखें आहे. आणखीही एक गोष्ट या एका निबंधावरून व्यक्त होते ती ही कीं एवढ्याशा अल्प अध्ययनानेंच हिला स्वातंत्र्याचें खरें स्वरूप समजूं लागून तें संपादन करण्याकरितां कितीही परिश्रम पडले तरी ते करण्याचा तिनें दृढ निश्चय केला होता. आवडीसारख्या दुर्दैवी स्त्रियांस प्रायः आपल्या आप्त स्वकीयांच्या आधीन राहणें जरूर पडतें. हिचे वडील हिच्यावर पराकाष्ठेची प्रीति करीत असत. त्यांचें हें शेवटलें अपत्य होतें व त्यांना ही जरी सातवी कन्या होती तरी ती त्यांची लाडकी होती म्हणूनच त्यांनीं तिचें नांव आवडी असें ठेविलें होतें हें आम्हीं मागें सांगितलेंच आहे. अशा ममताळू मातापितरांनीं आपल्या हतभागी मुलीची कांहीं तरी तजवीज करून ठेवलीच असती व तसें करण्यास त्यांना अनुकूलताही होती, तथापि त्यांच्या पश्चात् आपलें कोणासही ओझें पडूं नये अशी आवडीची फार इच्छा होती; म्हणून आपण जी विद्या संपादन केली तिच्या योगानें थोडें-बहुत द्रव्यसाधन करावें व ह्या द्रव्याच्या योगानें कधींकाळीं प्रसंग आलाच तर आपल्याला लोकांच्या तों-

डाकडे पाहण्याचें कारण पडूं नये असा पोक्त विचार हिच्या मनानें केला होता. ज्यांना ब्राह्मणज्ञातींतील विधवा स्त्रियांची स्थिति माहीत आहे त्यांना आवडीचा हा विचार पूर्णपणें संमत होईल. अशा विधवा स्त्रियांना दानधर्माला एखादा पैसा लागला तरी सुद्धां तो मागण्याची चोरी असते तेव्हां असा दुःखाचा प्रसंग आपल्यावर येऊं नये, व आपल्याला आपलें स्वातंत्र्य संभाळून थोडा फार दानधर्मही करितां यावा असे दोन फायदे आपल्या शिक्षणापासून करून घ्यावे असा आवडीचा हेतु होता.

असो. येथवर आह्मी १८८७ सालच्या स्कालरशिपपरीक्षेंतील एका विषयाचे संबंधानें माहिती सांगितली. या परीक्षेंत ती एकंदरींत पहिली आली व प्रत्येक विषयांत परीक्षकांनीं हिला उत्तम गुण दिले. एकंदर गुणांची संख्या ५२५ होती त्यांपैकीं आवडीला ४३० गुण मिळाले ह्मणजे, दर शेंकडा सरासरी ८२ गुण हिला मिळाले. इतके गुण कोणत्याही परीक्षेंत फारच थोड्या विद्यार्थ्यांस मिळतात हें सांगणें नकोच.

याच परीक्षेचे वेळीं संस्कृताची परीक्षा घेण्याकरितां पुण्यांतील एका शाळेंतील संस्कृताचे गुरूंची योजना झाली होती. या शास्त्रीबोवांची आणि प्रस्तुत चरित्र लिहिणाराची एकदां

गांठ पडली होती व तेव्हां बोलतां बोलतां सहज हा विषय निघाला. तेव्हां असें समजलें कीं, इतर शाळांत परीक्षेच्या प्रसंगीं जसा एक प्रश्नाचा कागद काढून मुलांना त्या प्रश्नांचीं उत्तरें लिहावयास सांगतात तसाच या प्रसंगींही एका कागदावर प्रश्न लिहून तो प्रश्नाचा कागद त्यांनीं आवडीपुढें मांडला व तिनें जीं उत्तरें लिहून दिलीं तो कागद तपासण्याकरितां ते घरीं घेऊन गेले. घरीं गेल्यावर उत्तरें तपासल्यावर त्यांना एवढेंच वाईट वाटलें कीं, अशीं उत्तम उत्तम उत्तरें देणाऱ्या मुलीची तोंडीं परीक्षा घेतली असती तर तिला खरोखर संस्कृताचें ज्ञान किती आहे हें तरी आपल्यास समजलें असतें. याच सालीं गणितविषयांत परीक्षा घेण्याकरितां कै० रा० रा० रावजीशास्त्री देवकुळे यांची योजना झाली होती. तेही आवडाबाईच्या गणिताचे कागदावर फार फार खुष झाले व अशा प्रकारचीं सुरेख उत्तरें क्वचित् दृष्टीस पडतात ह्मणून त्यांनीं तिच्या उत्तरांचे कागद जतन करून ठेवले होते. सारांश, ज्या ज्या गुरूंच्या हाताखालीं तिनें अध्ययन केलें व ज्या ज्या गृहस्थांना तिच्या ज्ञानाची परीक्षा करण्याची संधि सांपडली त्यांनीं त्यांनीं तिच्या अलौकिक बुद्धिमत्तेचें, दक्षतेचें व टापटिपीचें कौतुकच केलें.

सन १८८८ सालीं ती इंग्रजी सातवी इयत्ता शिकूं लागली. तिची प्रकृति मूळचीच फार अशक्त होती व त्यांत अनेक दुःखाचे पर्वत तिजवर कोसळल्यानें ती आंतले आंत काळजीनें झुरत होती. या वर्षी तिची प्रकृति फारच क्षीण झाली तथापि तिनें आपल्या अभ्यासांत खंड पडूं दिला नाहीं. ड्राइंग आणि पेंटिंग व संस्कृत हे अभ्यास खाजगी रीतीनें चालू होतेच. शिवाय परीक्षेचे विषय ती इतर उमेदवारांप्रमाणें तयार करीत होतीच. तिचे परीक्षेचे सर्व विषय तयार झाले होते याविषयीं साक्ष तिचीं नोटबुकें देत आहेत. या नोटबुकांत नाना तऱ्हेचे प्रश्न व भूमिति, पदार्थविज्ञान वगैरे विषयांचीं अनेक उदाहरणें सोडविलेलीं आहेत. परीक्षेस गेली असती तर ती खास पसार होती असा सर्वांस भरवसा होता.

वर आह्मी तिच्या इंग्रजी ज्ञानाची तारीफ केली आहे, व कदाचित् आमच्या वाचकांस तिच्या इंग्रजी लेखाचा मासला पहावा असें सहजच वाटेल; ही त्यांची जिज्ञासा तृप्त करण्याकरितां तिचे दोन इंग्रजी लेख सादर करितों:—

Poona,

24th November, 1886.

My dear—Bai

I received your letter yesterday and was very glad to hear that your brother passed his P. E.

examination. I am going to describe my journey to Ahamadnagar to you. You already know that my mother was ill in February and we went to Nagar for a change. We left home at about half past seven in the evening. There were 15 minutes for the train to arrive from Bombay ; we reached the Station in good time and took our seats. While we were waiting, the time passed quickly, as it was most interesting to watch all the passengers, some running to get their tickets, others looking out anxiously for the train's arrival, others looking after their luggage ; and porters hurrying about with lanterns in their hands. The train came puffing up and we got in, and started at half past eight, It was a clear moon light night and the scenery along the line, chiefly extensive fields and woodlands, was grand and picturesque. The sky resting on the earth like a vast vault studded all over with bright stars looked very beautiful. There were two other passengers in our carriage besides ourselves : one was a boy, a funny little child. He was asleep when the train started. Presently he awoke and wondering where he was, gazed out through a window and exclaimed 'O how strange ! ! the trees, houses, hills and even the very fields are running away from me, ! ! as soon as one lot disappears, another runs past ! O mother ! I cannot tell where they are all going to ! But I am quite sure they are all running away from me ! Can you tell me where they are going to !. " I could not keep fr m—

laughing to hear the child's innocent talk. I told him that the trees &c did not move, but it was we who were being carried along by the train. But it was so very hard to make him understand this. We reached Dhond at 11. We had to wait there for 2 hours. It was so cold there that though we had warm clothes on ( a thing that I dislike ) I wished we could have had some more wraps. We reached Nagar at 5 in the morning. We were there for 10 days. My very dear friend—bai was there and I used to go and see her every day. Do you know her? She is such a good girl. How sad it is that she lost her dear husband, father and mother last year! Is it not a dreadful loss! Poor—! I am so sorry for her. She is a very dear friend of mine you know.

We saw many places of interest at Nagar. It is a nice town to live in. The weather was very enjoyable. We returned to Poona after 10 days with my love to you.

I remain
A.—BHIDE.
Sadashive Peit, Poona,
16th December 1886.

My dear Miss. Sorabji

You asked me what I should like to do, where I should like to live, and what I should like to be. I should like to study all my life, if I could. I like all the subjects that I am learning and that I have to learn ( except letter writing ) ; but I like drawing the most though I scarcely

know any thing about it. Yet I should like to be an artist if I could. Would it not be very nice to be able to draw the different beautiful trees, flowers, hills, and all kinds of things around us and to paint them? I should like it so very much. It would be delightful to go abroad into the world and see many different countries. But I wonder if I shall ever be able to do so. I do not think I shall, as at present I have no prospects of going. But if not to other countries, I should like to travel all over my own country at least. We learn so much by travelling. As to the place I should choose to live in, it is no wonder that I love Poona best; for, it is here that I have spent nearly the whole of my little life; my parents and home are here, and therefore it is very dear to me.

With my love to you.

I am
Yours &c.
A. Bhide.

या दुसऱ्या पत्रावरून आवडाबाईच्या मनांत काय विचार घोळत होते हें व्यक्त होईलच. याविषयीं उल्लेख पुढील भागांत होईल.

आवडाबाईची टापटीप व व्यवस्था फार उत्तम असे हें आह्मी सांगितलेंच आहे. तिनें कोणतें काम कोणत्या वेळेस करावयाचें याबद्दल अगदीं वेळा बांधून ठेविल्या होत्या.

या वेळापत्रकाविषयीं कांहीं मजकूर तिच्या रोजनिशींत आला आहे ह्मणून तें वेळापत्रक येथें देऊन हा भाग आह्मी पुरा करितों.

| वेळ. | सोमवार. | मंगळ. | बुध. | गुरु. | शुक्र. | शनि. | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५–५–१५ | ईश्वरभजन. | ......... | ......... | ........ | ...... | ...... | ... |
| ५–१५–५–५५ | रोजनिशी. | ......... | ......... | ........ | ...... | | |
| ६–७ | संस्कृत. | ......... | ......... | ........ | ...... | | |
| ७–७–३० | भूमिति. | बीजग० | भूमिति | निबंध (शाळेंतील लेखनवि.) | बीजगणित | | |
| ७–३०–८– | लेखनविषय. | पाराफ्रेज अनुवाद | संस्कृत लेखन. | पत्रलेखन | अनुवाद. | | |
| ८–९ | शिक्षकाजवळ शिकणें | ......... | ......... | ........ | ...... | | |
| ९–९–१५ | व्युत्पत्ति. | भाषांतर. | व्युत्पत्ति. | भाषांतर. | व्युत्प. | | |

---

# भाग तिसरा

उपोद्घातांत वचन दिल्याप्रमाणें या भागांत आवडाबाईच्या रोजनिशींतले निवडक उतारे आम्ही आपल्या वाचकांस सादर करितों. हे उतारे देण्यांत आमचे दोन हेतु आहेत. स्त्रीशिक्षणाचे संबंधानें अजून आपले लोकांत बराच दुराग्रह आहे. जे सामान्यतः सुशिक्षित लोकांत मोडतात व जे स्त्रीशिक्षणाला केवळ प्रतिकूळ नाहींत त्यांच्याही मनांत खि-

यांना शिक्षण किती मिळावें याविषयीं अजून पक्का निर्धार झाला नाहीं. कोणी म्हणतात स्त्रियांना फक्त लिहिणें वाचणें आलें ह्मणजे पुरे आहे. त्यांना इंग्रजी शिकून काय करावयाचें आहे? त्यांना ड्राइंगचा काय उपयोग आहे? परंतु विद्या हें जर अमृत आहे तर मग हें अमृत घोटभरच प्यावें आणि पोटभर पिऊं नये हें ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. क्वचित् अमृतही विषाप्रमाणें घातक होतें हें आम्ही कबूल करितों. पण हा घातकपणा अमृताचा नाहीं. हा दोष सांसर्गिक कारणांमुळें उद्भवतो. चाकू लेखणी करण्याचे कामीं उपयोगीं पडतो आणि उरांतही भोंसकतां येतो, परंतु हा पुढें सांगितलेला दुरुपयोग एखाद्या मनुष्यानें केला ह्मणून चाकू मुळींच उपयोगी नाहीं असें आपल्यास ह्मणतां येत नाहीं. क्वचित् प्रसंगीं विद्वान् मनुष्यांचे हातून प्रमाद घडतात. हा दोष त्यांच्या विद्येचा नव्हे. त्यांचा स्वभाव अनेक कारणांमुळें दुष्टपणाचा बनला असेल व त्यामुळें त्यांचे हातून दुराचरण घडलें असेल असेंच आपल्यास ह्मटलें पाहिजे. विद्येनें खरोखर दुष्ट प्रवृत्तीचें आकलन होतें, अंगांत विनय येतो व अनेक इतर गुणांचाही विकास होतो, व ही गोष्ट प्रायः सर्व लोक कबूल करितात; परंतु फक्त स्त्रियांवरच विद्येचा संस्कार उलट प्रकारचा घडतो अशी कित्येकांची समजूत आहे. पण ही समजूत अगदीं

चुकीची आहे. पापभीरुत्व, विनय, आत्मसंयम, परोपकारलालसा इत्यादि परिणाम विद्येपासून स्त्रियांवरही घडतात हें पुढील उतारे वाचल्यावरून स्पष्ट होईल.

आह्मी वर जे दुराग्रह सांगितले त्यांचाच परिणाम असा झाला आहे कीं, जे जे स्त्रीशिक्षणाला उत्तेजन देतात ते आपल्या देशाची हानि करीत आहेत व ज्या मुली हल्लीं शाळेंत जात आहेत त्या दुर्व्यसनाचेंच वळण शाळेंत शिकत आहेत असा समज कित्येक लोकांचा झाला आहे. वर जे दोन प्रकारचे लोक सांगितले—ह्मणजे स्त्रीशिक्षण मुळींच नको असें ह्मणणारे व थोडेसें शिक्षण मुलींना मिळालें म्हणजे पुरे आहे असें ह्मणणारे; या उभयपक्षांचे डोळ्यांत, पुणें येथील मुलींचें हायस्कूल सलत आहे, व वारंवार या शाळेची होईल तितकी निंदा करण्यांतच त्यांना मोठें भूषण वाटतें, परंतु त्यांनीं निष्पक्षपातानें व शांतपणानें जर ह्या गोष्टीचा विचार केला तर त्यांच्याही मनांतील हे दुराग्रह समूळ नाहींतसे होतील अशी आमची खात्रीं आहे. असो, वर जी निंदाप्रवृत्ति आह्मी सांगितली ती यथेच्छ पुरवून घेण्याला सांप्रतच्या चरित्राची नायिका उत्तम पात्र त्या लोकांना सांपडली व मुलींच्या हायस्कुलांत उत्तम नांवाजलेली मुलगी हीच असल्या

कारणानें अनेक रीतींनीं ह्या मुलीचा छळ त्यांनीं केला. भर रस्त्यांत भर बारा वाजतां हिची टवाळी तर त्यांनीं केलीच केली, पण विननांवी बीभत्स पत्रें तिच्या नांवचीं लिहून आपली लेखणी विटाळवून घेण्याची देखील कित्येकांना खंति वाटली नाहीं. अशा पत्रामुळें तिच्या मनाला काय वाटलें हें पुढील एका उताऱ्यावरून स्पष्ट होईलच. परंतु तिचा स्वभाव कसा बनत चालला होता, व तिच्या अंतःकरणांत पापाचें बीज सुद्धां होतें किंवा नव्हतें हेंही या रोजनिशीवरून समजेल.

ही तिची रोजनिशी फक्त सहा महिन्यांपुरतीच ह्मणजे तारिख १ जानेवारी १८८७ आरंभापासून ता० ११ जून १८८७ पर्यंतच दिली आहे; पूर्वीच्या रोजनिशींत कांहीं महत्वाच्या गोष्टी नाहींत ह्मणून तिचे उतारे दिले नाहींत. या तारखे नंतर तिची प्रकृति दिवसेंदिवस बिघडत चालली ह्मणून तिच्या या रोजनिशींत खंड पडला. तिचा हा क्रम आणखी एक वर्षभर जर चालता तर या चरित्र लेखनास व क्वचित् स्थळीं सांप्रतकाळच्या इतिहासासही फार मदत झाली असती. ह्या रोजनिशींत पुष्कळ सार्वजनिक गोष्टींचा उल्लेख आहे, तसेंच हल्लीं जीं मनुष्यें जगापुढें आहेत त्यांच्याही स्वभावाविषयीं व मतांविषयीं थोडी चर्चा या रोजनिशींत आहे. हीं सर्व प्रकरणें आम्ही गाळलीं

आहेत. तसेंच आवडीच्या मैत्रिणींपैकीं कित्येकींच्या सुखदुःखाविषयीं हृदयद्रावक उद्गार आहेत. हे उद्गार आह्मी जसेच्या तसेच दिले आहेत, तथापि लोकांच्या गृहच्छिद्राचा स्फोट न व्हावा व कोणासही वाईट वाटूं नये ह्मणून आह्मी त्या त्या मैत्रिणींचीं व त्या संबंधानें येणाऱ्या इतर मनुष्यांचींही नांवें गाळलीं आहेत. आतां आह्मी पहिल्या दिवसाचा ह्मणजे ता० १ जानेवारीचा उतारा जसाचा तसाच देतों.

शनिवार, ता० १ जानेवारी सन १८८७.

"आजपासून रोज ज्या कांहीं विशेष गोष्टी होतील त्या लिहून ठेवाव्या असा मी बेत केला आहे व तो सिद्धीस नेण्याविषयीं परमेश्वराची अंतःकरणपूर्वक प्रार्थना करून मी लिहिण्यास आरंभ करत्यें.

आजची हकीकत लिहिण्यापूर्वीं माझी पूर्वीची थोडी हकीकत मला लिहून ठेविली पाहिजे. * * चिंगूताई ( आवडाबाईची वडील बहीण ) बाळंतीण होऊन आज २३ दिवस झाले. * * मला आतां सोळा वर्षें पुरीं होऊन सतरावें लागलें. माझा जन्मदिवस कोणाच्या ध्यानांत नाहीं. मी पुणें येथील मुलींच्या हैस्कुलांत जात असतें. पांचवी इयत्ता इंग्रजी शिकतें. तात्या जवळ (आवडाबाईचा भाऊ) ही शिकतें. व परवांपासून मास्तर येणार आहे. * डा० आनंदीबाई जोशी, व तिचा नवरा गोपाळराव

गोशी, आई व् वहीण हीं मनुष्यें आमच्या येथें उतरलीं आहेत. आनंदीबाई फार अजारी आहे. *** "

मी आज वेळापत्रक केलें आहे व त्याप्रमाणें वागण्याचा बेत केला आहे, परंतु तो कितपत सिद्धीस जाईल याची मला शंका आहे.

या उताऱ्या संबंधानें विशेष खुलासा करण्याचें कारण नाहीं. उताऱ्याच्या आरंभीं जी ईश्वराची प्रार्थना केली आहे ती आह्मी मागें सांगितलेल्या ईश्वर भक्तीचें एक सूचक आहे. ही रोजनिशी कधीं कोणाच्या दृष्टीस पडूं नये अशी आवडाबाईची फार इच्छा होती. तिच्या जिवंतपणीं ही रोजनिशी सहज तिच्या एका मैत्रिणीच्या नजरेस पडली, परंतु तिनें ती तेव्हांच तिच्या हातून हिसकावून घेतली. या मैत्रिणीवर जरी तिचा अत्यंत लोभ होता तरी सुद्धां तिनें तिला ती वाचूं दिली नाहीं. कधीं काळीं ही रोजनिशीं प्रसिद्ध व्हावी अशीही पण आवडीबाई-ची इच्छा नव्हती, कारण तशी इच्छा असती तर या रोजनिशींत ज्या कित्येक क्षुल्लक गोष्टींचें वर्णन केलेलें आहे, तें ती कधींच न करती. शिवाय तिच्या एकंदर सर्व लेखांत जो नीटनेटकेपणा आहे तो ह्या रोजनिशींत कोठेंही दृष्टीस पडत नाहीं. इं-ग्रजींत ज्याला Scribbing book. ह्मणजे खरडायची चोपडी म्हणतात. तशा प्रकारची ही चोपडी आहे

व एकदर सर्व मजकुरावरून असा ग्रह होतो कीं ही केवळ गृहकृत्याचे संबंधानें स्मरण वही म्हणून तिनें लिहून ठेविली आहे. शिवाय ही ही एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं ही वही ह्मणजे तिनें आपल्या मनाला एक विसावा करून ठेवली होती. तिच्या सर्व बहिणी आपआपल्या घरीं सुखांत होत्या. येऊन जाऊन कायती तिची आई तिच्या जवळ नेहमीं असे, परंतु आईजवळ हिनें आपलें हितगुज काय सांगावें ? मातापितरांची मुलांवर, व मुलांची त्यांजवर अत्यंत प्रीति असली तरी तीं एकमेकांस विश्रंभस्थानें होत नाहींत, त्यांच्या वयपरत्वें आणि अनुभवपरत्वें परस्परांचे सुखदुःखाविषयीं तादात्म्य कधींच होत नाहीं हें सर्व सुज्ञ वाचकांस माहीत आहेच. तेव्हां अशा स्थितींत फक्त आपल्या जिवाला करमणुक व्हावी व क्वचित् नित्य कार्यांत उपयोगही व्हावा ह्मणून लिहिलेली ही स्मरणवही सर्वथैव विश्वासास पात्र आहे, व ह्या वहींत जे जे तिनें परमेश्वरावर हवाले दिले आहेत ते ते तिच्या प्रेमळ भक्तीभावाचे उद्गार आहेत असेंच मानिलें पाहिजे.

ह्या उताऱ्यांत तिनें जें आपलें वय दिलें आहे तें चुकीचें आहे. आह्मी तिच्या मरणानंतर जो तपास केला त्यांत तिचा जन्म १८६९ सालीं जूनच्या

२९ तारखेस झाला असें आह्मास समजतें. या तारखेवरून आवडाबाईला ह्या जुनांत १८ वर्षें पुरीं झालीं. ज्या मैत्रिणीचा उल्लेख शेवटीं केला आहे ती हिच्याच सारखी दुर्दैवी होती व हिला जें मातापितरांचें सुख होतें तेंही तिला नव्हतें. तिच्यावर आवडाबाईचें फार प्रेम होतें व ह्या सहा महिन्यांच्या रोजनिशींत तिला उद्देशून पुष्कळ मजकूर लिहिलेला आहे.

ता० २ रविवार जानेवारी सन १८८७. * * मी घरीं गेलें होतें. तिच्या भावांनीं तिला भिड्याच्या घरीं आह्मी तुला धाडणार नाहीं असें सांगितलें व ते तिला पुष्कळ बोलले वगैरे ती माझ्याजवळ सांगत होती, तें ऐकून मला खचित फार वाईट वाटलें. गरीब बिचारी ! तिची बाजू घेणार या जगांत कोण आहे? ती ह्मणाली " आवडे, या जगांत राहण्यापेक्षां एकदम जिवास कांहीं करून घ्यावें हें मला बरें वाटतें." मी तिला सांगितलें " तूं कांहीं भिऊं नको. येथें आपल्या तर्फेचें जरी कोणी नसलें तरी सर्वसाक्षी परमेश्वर तर आहेना? त्यावर विश्वास ठेऊन तूं धीर धरून ऐस. त्यानें आपणास ज्या स्थितींत ठेविलें त्या स्थितींत आपण आनंद मानून रहावें. आपण आपला सन्मार्ग सोडूं नये ह्मणजे आपणास कोणतेंही भय नाहीं."

मी तिला किती जरी सांगितलें तरी तिच्या मनांतील दुःख कमी होईल काय ? ती ह्मणाली: " आवडे मला इतका धीर देणार तरी तूंच एकटी आहेस. पण जरी मी तुझ्या घरीं आलें नाहीं तरी त्याबद्दल तुला राग किंवा वाईट वाटून मजवरची तुझी ममता कमी होणार नाहींना ? मला तुजवांचून कोणी नाहीं. आई मला सोडून गेली; बाबा मला सोडून गेले व प्रियपतीही मला सोडून गेले. आतां मला सुख कोठचें ?" ह्यानंतर मी तिला पुष्कळ समाधानाच्या गोष्टी सांगितल्या, परंतु तिचें दुःख कसें कमी होईल ? मला स्वतःला याचा थोडा अनुभव आहे काय ? मी सर्वांस जरी मोठ्या आनंदांत आहें असें दाखवितें तरी माझ्या मनांत काय चाललें असतें हें कोणास ठाऊक आहे काय ? मी आपल्या माडींत एकटी असलें ह्मणजे माझी स्थिति काय होते याची कल्पना तरी कोणास करतां येईल काय ? * * * मला कोणतीही गोष्ट कमी नाहीं तरी मला इतकें वाईट वाटतें व कधीं कधीं माझें मन माझ्या ताब्यांत राहत नाहीं, मग तिला तर किती वाईट वाटावें ? तरी आतां मी आपल्यास फार त्रास करून घेणार नाहीं असें तिनें माझ्याजवळ कबूल केलें आहे. अरेरे, खरोखर तिजविषयीं मला फार वाईट वाटतें.

* * * चिंगीच्या उरांत कळ निघते ह्मणून ती आजारी आहे. आनंदीबाईच्या प्रकृतींत फेर नाहीं.

मागील उताऱ्यांत ज्या मैत्रिणीचा उल्लेख केला आहे तिच्याच संबंधीं या उताऱ्यांतील मजकूर आहे. हा उतारा वाचला ह्मणजे विधवा स्त्रियांचें जिणें कसें सर्वथैव पराधीन असतें, व त्यांना खरोखर काय क्लेश होतात हें विचारशील मनुष्याचे ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. शाकुंतल नाटकांत अनसूया आणि प्रियंवदा या दोन सख्यांचीं विश्रंभभाषणें वाचून रसिक जनांस आनंद वाटतो. पण तीं भाषणें त्या कविकुलगुरूनें कल्पनेनें रचिलीं आहेत. येथें तर आपल्याला या रोजनिशीचे योगानें या दोन मुलींचीं खरोखर घडलेलीं व तात्काळ लिहून ठेविलेलीं विश्रंभभाषणें वाचावयास मिळालेलीं आहेत. हीं वाचून सहृदय जनांस तर आनंद होईलच होईल. परंतु ह्या भाषणाचे योगानें ज्यांच्या हृदयास द्रव येणार नाहीं त्यांस शून्यहृदय अशीच संज्ञा शोभेल.

ता० ३ जानेवारी १८८७ सोमवार.—"मिस् सोराबजींनीं वहिनीला देण्याकरितां कांहीं कागदांत बांधून दिलें तें मला वाटतें मी आपल्या दप्तरांत बांधलें, पण घरीं आल्यावर पाहूं लागलें तों तें दप्तरांत नाहीं. आतां कदाचित् शाळेंत

विसरलें असेल तर उद्यां सांपडेल, नाहीं तर मी आपलें बक्षीस त्यांना देईन. चिंगीच्या उरांतली कळ अझून राहिली नाहीं."

या उताऱ्यांत विशेष मजकूर कांहीं नाहीं, तथापि वहिनीला दिलेली जिन्नस विसरून कोठें राहिली व तिच्या मोबदला आवडाबाईनें आपलें बक्षीस तिला देण्याचा संकल्प केला हें तिच्या न्यायशीलतेचें स्पष्ट उदाहरण आहे. दुसऱ्या एखाद्या मुलीच्या हातून कांहीं जिन्नस हरवली असती, तर "हरवली त्याला मी काय करूं? मी का जाणूनबुजून ती हरवली?" असें उत्तर मिळालें असतें. शिवाय सासुरवाशिणींवर माहेरवाशिणींचा नेहमीं पगडा असतो, व भावजया नणदांच्या फारशा खिसगणतींत नसतात ही गोष्ट ध्यानांत आणली असतां ह्या वर सांगितलेल्या उदाहरणाविषयीं चमत्कार वाटल्यावांचून राहणार नाहीं.

ता० ४ मंगळवार जानेवारी सन १८८७.
"वहिनींचें बक्षीस मी शाळेंतच विसरलें होतें तें त्यांचे त्यांना आणून दिलें. आह्माला ड्राइंग शिकविण्यास मागें एक मिस् हार्ट्री ह्मणून मडम येत होती तिनें इंग्लंडाहून आह्माला खिस्तमस् कार्ड पाठविली. मिस् मेरी भोर आज शाळेंत आली नव्हती ह्मणून दुपारीं मी तिच्या वर्गावर शिकविण्यास गेलें होतें."

ता० ८ शनवार जानेवारी १८८७. "आनंदीबाईस आज चारपांच दिवस ताप आला नव्हता तो आज बराच आला. त्या दुसरें बिऱ्हाड पाहणार आहेत असें ऐकतें. मी काल तात्याच्या खोलींत गेलें तेव्हां तेथें वहिनींची डायरी होती ती मी पाहिली. खरें पाहिलें असतां मला असें करण्याची गरज नव्हती. पण मी ती गोष्ट केली; त्यांत कांहीं विशेष मजकूर नव्हता, पण मला ती पाहिल्याबद्दल फार वाईट वाटलें. चिंगीला ताप आला होता."

लोकांची रोजनिशी पाहण्याच्या क्षुल्लक अपराधाबद्दल ज्या मनाला इतकें वाईट वाटून पश्चात्ताप झाला त्या मनांत पापाची भीति किती जबर असली पाहिजे याविषयीं वाचकांनींच विचार करावा.

ता० ९ रविवार–जानेवारी १८८७.

——आली होती. मागून भावानें लागलेच बोलावणें पाठविलें. शेजारच्या—आल्या होत्या. त्यांनीं माझें लोकरीच्या विणीचें पुस्तक नेलें होतें तें त्यांच्याजवळून हरवलें. त्याबद्दल पैसे देऊं कीं काय म्हणून त्यांनीं विचारिलें; मग मी नको म्हणून सांगितलें. × × × × ×

ता० १० सोमवार जानेवारी १८८७.

× × × आनंदीबाईकडे माधवराव बर्वे व त्यां-

यीं बायको आणि एक दुसरी मडम ( मिसेस नेलर ) आली होती. चिंगीचा ताप व खोकला अझून बंद होत नाहीं. × × ×

ता० ११ जानेवारी सन १८८७.

वेडर्बर्न साहेबांच्या बायकोनें इंग्लंदाहून मला एक चित्र ( ख्रिस्तमस् कार्ड ) पाठविलें. तें तिची थोरली मुलगी डोरोथी हिच्या तसबिरीवरून काढलेलें आहे. वेडर्बर्न साहेब हल्लीं तेथेंच आहेत व त्यांच्या बायकोला मी शाळेंत केलेली एक खुर्चीवरची गादी पाठविली त्याबद्दल मिस् हर्फर्डचे पत्रांत त्या बाईनीं माझे फार आभार मानिले. मिस् सोराबजी आनंदीबाईस पाहण्यास आल्या होत्या. त्यांना चिंगीचा मुलगा दाखविला. बेला भोर शाळेंत आली नाहीं म्हणून मी तिचा वर्ग शिकविण्यास दुपारीं गेलें होतें.

ता० १२ बुधवार जानेवारी सन १८८७.

"मी मिस् भोरच्या घरीं जाकिटाचा वेल छापण्याकरितां गेलें होतें. × × रात्रीं आमची सुंद्री ( आवडाबाईच्या बहिणीची मुलगी ) फार ओढगाई करीत होती म्हणून मी तिला घेऊन झोंपाळ्यावर बसलें, तों ती रडायला लागली. मग मी तिला अंथरुणावर निजवून मी जवळ वाचीत बसलें. तरी ती रडतच होती. मग थारूताई ( सुंद्रीची

भाई ) आल्या व तिच्याजवळ निजल्या. त्यांचेही नाकडोळे लाल झाले होते. मी सुंद्रीला रागें भरलें ह्मणून त्यांना वाईट वाटलें असें मला वाटतें. मलाही माझ्या करण्याबद्दल फार वाईट वाटलें. उद्यांपासून होईल तितकें गोड बोलून सुंद्रीला नीट वागविण्याचा मी बेत केला. घारूताई जेवल्या नाहींत. खरोखर मी असें करायचें नव्हतें. सर्व लहान मुलें अशीच दांडगाई करतात असें घारूताई पुष्कळ वेळा ह्मणाल्या होत्या. असो, झाली गोष्ट आतां परत येत नाहीं. पुढें नीट वागण्याचा विचार करावा ह्मणजे झालें. खरोखर मजपासून कोणास तिळभर देखील त्रास होऊं नये अशी मनापासून माझी इच्छा आहे व कधीं माझ्याबद्दल कोणास त्रास झाला ह्मणजे मला फारच वाईट वाटतें."

ता० १३ गुरुवार जानेवारी १८८७."मी आज मिस् सोराबजींस हलवा पाठविला. ताक्या वैद्य चिंगीला पहायाला आला होता."

ता० १४ शुक्रवार जानेवारी १८८७."चिंगीला ताप आजही आला होता. औषध ताक्या वैद्याचें सुरू आहे. आनंदीबाई गाडींतून बाहेर फिरायला गेल्या होत्या."

ता० १५ शनिवार सन १८८७ जानेवारी.

"चिंगी बाहेर गेली व येतांना पायऱ्यांवर तिला

घेरी आली. मग आईनें जाऊन तोंडांत पाणी घातलें व डोक्यावर शिंपडलें तेव्हां ती सावध झाली. मग तिला घरांत आणली. आनंदीबाईला आज ताप आला नाहीं."

ता० १७ जानेवारी सोमवार सन १८८७.

"आमची परीक्षा आठवड्याची झाली. मिस् सोरावजींनीं मला फ्रेम आणून दिली. चिंगीला ताप आलाच होता. आनंदीबाईला ताप आला नाहीं."

ता० १८ जानेवारी मंगळवार सन १८८७.

"माझी गणिताची व हिस्टरीची परीक्षा झाली. मी वयाकडून चौकट मागून आणिली व त्यावर जाकीट घातलें. आनंदीबाई उद्यां आमचे घरून जाणार असें समजलें."

ता० १९ जानेवारी सन १८८७ बुधवार.

"अण्णासाहेबांचें मला पत्र आलें. संध्याकाळीं अण्णासाहेब आले. त्यांनीं दोन परड्या व त्यांत कागदाचीं व लोंकरीचीं फुलें घातलेल्या मला दिल्या. आनंदीबाई गेली."

"हाय हाय !! आज माझ्या प्रियाचा व माझा वियोग होऊन बरोबर दोन वर्षें झालीं. त्या दिवसाची आठवण झाली ह्मणजे अंगावर कांटा उभा राहतो. हर ! हर ! परमेश्वरा ! असा प्र-

मग तूं कोणावर आणूं नको. आज सगळा दिवसभर त्या दिवसाची आठवण मला वारं-वार होत आहे. हें कोणाच्या लक्षांत येऊं नये ह्मणून मी पुष्कळ जपून आहें. पण ही भीति बाळ-गण्याचें कारण नाहीं. कारण आजचा दिवस मजखेरीज दुसऱ्या कोणाच्याही लक्षांत राहण्याचा संभव नाहीं. ही जानेवारी महिन्याची एकोणिसावी तारीख किती तरी दुष्ट आहे ? ज्यावर माझें सर्व सुख अवलंबून असावयाचें त्याची व माझी तुटातूट करण्यास हिला कांहींही शंका वाटली नसेल काय ? पुरे. आज माझ्या मनांत जे वेडगळपणाचे नाना-विचार येत आहेत ते माझ्याच्यानें लिहवत नाहीं-त; कारण मला ही भीति आहे कीं कदा-चित् हें पुस्तक कोणीं पाहिलें तर त्यास ते स-मजतील व तसें व्हावें असें माझ्या मनांतून नाहीं. व्यर्थ माझें जिणें ! ज्याजवळ मी आपल्या मनांतली एखादी गोष्ट निःशङ्कपणें सांगेन असा को-णी तरी सोबती मला आहे काय ! बरें, मी असा विचार केला कीं जें कांहीं मनांत येईल तें कागदा-वर लिहून ठेवावें ह्मणजे तरी अंमळ मनाला हलकें वाटेल, पण कोणी पाहील या भीतीनें तें तसें करण्यास ही मला परवानगी देत नाहीं. रोज जेव्हां जेव्हां माझ्या मनाला वाईट वाटतें तेव्हां तेव्हां " परमेश्व-

रानें आपणास जी स्थिति दिली आहे ती योग्य आहे व तींत आपण आनंदानें राहिलें पाहिजे " हा विचार मनांत आणून मी आपलें समाधान करतें. पण आज या सर्व विचारांचें कांहींच चालत नाहीं. मी आपलें मन कितीही दुसरीकडे लावण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा कांहीं उपयोग नाहीं. तो दिवस मूर्तिमंत माझ्या डोळ्यांसमोर दिसत आहे. मी आपल्या माडींत बसून आरशांत पाहत असतांना खालून आईनें मोठ्यानें किंकाळी फोडली ती तशीच्या तशीच आज वारंवार मला ऐकूं आल्यासारखें वाटतें, व ते वेळीं ती आरोळी ऐकल्याबरोबर मला घेरी येऊन मी जशी धाड्कन जमिनीवर पडलें तशीच आतां माझी स्थिति होते कीं काय कोण जाणें असें मला वाटतें. काय करावें हें कांहीं सुचत नाहीं. आज शाळेंत मला मडमीनें विचारलें " तुला आज काय होत आहे ? " मी ह्मटलें " कांहीं नाहीं, माझें कपाळ दुखतें आहे. " तिनें बिचारीनें मला औषध आणून दिलें तें औषध मी प्यालें, पण त्यानें माझी व्यथा कोठून कमी होणार ! माझ्या रोगावर मरणावांचून दुसरें औषध या जगतांत मिळणें कठीण. अरे पण, आतां कांहीं लिहावयाचें नाहीं असें मी ह्मटलें व फिरून हें काय करीत आहें ! मनोविकार फार

वाढले ह्मणजे त्यांच्याच्यानें बाहेर पडल्यावांचून राहवतच नाहीं असें मला वाटतें. असो."

आपल्या पतीची मूर्ति आवडाबाईचे डोळ्यांपुढें कशी रात्रंदिवस उभी होती व त्याचे मरणापासून तिच्या त्या कोमळ अंतःकरणावर किती तीव्र आघात झाला होता हें वरील उताऱ्यावरून स्पष्ट समजेल. बाहेरून तिनें जरी पुष्कळ शांतपणा दाखविला तरी ती अंतर्यामीं या दुःखामुळें फार होरपळत होती हें निर्विवाद आहे. ह्या तिच्या गुप्त शोकाच्या आवेगाचीं चिन्हें बाहेरून सुद्धां दिसत होतीं. तिच्या तोंडावर जी उदासीनतेची छटा दिसत होती तिचें कारण हा शोकच असावा असें वाटतें. ज्यांनीं ज्यांनीं आवडीला पाहिली असेल त्यांना त्यांना तिच्या चेहऱ्यावरची नेहमीची पांढुरकी, तिच्या कपाळावरच्या आंठ्या, तिचे खोल गेलेले गाल व तिची ती म्लान मुद्रा हीं स्मरत असतीलच.

ता० २१ जानेवारी सन १८८७."मी शाळेंत गेलें नाहीं; कारण माझें कपाळ दुखत होतें. चिंगीला ताप पुष्कळ आला. घाम आज तीन दिवसांत येत नाहीं;---आली होती---तिचे भाऊ तिला ह्मणतात कीं जसा आमच्या बायकांचा उपयोग आहे तसा हिचा काय आहे ! ! ती ह्मणाली "आवडे हे असले शब्द ऐकण्यापेक्षां मरून जाणें मला फार

बरें वाटतें. हे माझे भाऊ कसले! हे माझे जन्मांतरचे वैरीच आहेत. पण मला असा चमत्कार वाटतो कीं मेलेल्यास मारण्यांत किंवा चिरडून गेलेल्यास आणखी लाथेनें चिरडण्यांत यांना काय मजा वाटते!" अरेरे, गरीब बिचारी!—तिला किती तरी त्रास हा! ज्यापासून एक घडीभर तरी सुख होईल असें कोणी मनुष्य तिला आहे काय! मला तिजबद्दल फारच वाईट वाटतें."

वरील उताऱ्यांत भावांनीं बहिणीला उद्देशून जे शब्द उच्चारिले ते किती हृदयद्रावक आहेत याचा वाचकांनींच विचार करावा. ज्या मुलीचा नवरा मेला ती संसाराला आंचवली अशी ब्राह्मणज्ञातींत स्थिति असून अशा अभागी मुलीला उद्देशून तिच्याच भावांनीं अशीं मर्मभेदक भाषणें बोलावीं ही गोष्ट अगदीं अनुचित आहे हें कोणीही कबूल करील. बरें, ही बाई संसारांतून उठली तथापि तेवढ्यामुळें तिचा सारा जन्म वायां गेला असें झालें काय? प्रजननावांचून दुसरा स्त्रियांचा उपयोगच नाहीं का? मिस् कार्पेंटर बाईनें मुळींच लग्न केलें नाहीं म्हणून ह्या बाईचें सर्व जिणें व्यर्थ गेलें काय? मिस् नाइटिंगेल बाई दुखण्यानें आणि वयामुळें अंथरुणाला खिळलेली आहे तरी परोपकाराविषयीं तिचें

नांव सर्व दुनियेंत गाजत आहे, ती संसाराच्या भानगडींत कधीं पडलीच नाहीं तरी हिच्या उद्योगामुळें किती लोकांना संसारांत सुख होत आहे बरें? ज्या स्त्रियांवर वैधव्याचा दुःसह प्रसंग गुदरला त्यांना रोग्याची शुश्रूषा करतां येणार नाहीं काय? ज्यांनीं अलीकडील लढायांचीं वर्णनें वाचलीं असतील त्यांना लढाईचे प्रसंगीं रोग्यांची शुश्रूषा करणाऱ्या बायकांचा किती उपयोग होतो हें सांगावयास नको. एखादे ठिकाणीं लढाई सुरू झाली न झाली तोंच मिस् नाइटिंगेलसारख्या परोपकारी बायका आपल्या पदरचा पैसा खर्च करून लढाईच्या जागेवर आपला जीव सुद्धां धोक्यांत घालण्यास तयार होतात. स्वदेशाचे अभ्रूसाठीं किंवा स्वदेशाचें रक्षण करण्यासाठीं जे लोक आपलें शीर तळहातावर घेऊन समरांगणीं उभे राहतात त्यांना लढाईंत जखम झाली किंवा कांहीं दुखणेंबाणें झालें, तर त्यांना आपल्या ममताळू आईची सुद्धां या स्त्रिया आठवण होऊं देत नाहींत, असा हा शुश्रूषेचा परोपकार ईश्वराचे घरीं रुजू होत नसेल काय? अशा रोगांतून या परोपकारी बायकांचे मेहनतीमुळें जे लोक जगून आपआपल्या घरीं परत जातात त्यांचीं कुटुंबें या परोपकारी बायकांस दुवा देत नसतील काय? अमेरिकेंतील स्त्रिया पुरुषांचें मद्यपान बंद करण्याकरितां अपार श्रम करीत

आहेत. हा परोपकार नव्हे काय? कित्येक इंग्रज स्त्रिया अविवाहित किंवा विधवा असून या देशांत येऊन शाळा घालून आमचे लोकांस ज्ञानामृत पाजीत आहेत. हा त्यांजपासून उपयोग नव्हे काय? आमच्या बायकांनीं परदेशांत जाऊन किंवा स्वदेशांतच स्वधर्म शिकवावा हा उपयोग त्यांचे हातून होणार नाहीं काय? स्त्रीवैद्यांची, स्त्रीशिक्षकांची आपल्यांत मोठी उणीव आहे. हे धंदे ज्या स्त्रिया करतील त्यांचें जिणें खचित व्यर्थ होणार नाहीं. प्रजोत्पादनादिक केवळ ग्राम्य धर्माचें संपादन झालें नाहीं म्हणून मनुष्यजन्म निरर्थक होत नाहीं; व ज्यांचें मत असें असेल कीं जन्मास आल्यासारखी कांहीं संतति झालीच पाहिजे आणि तसें न झाल्यास जन्माचें सार्थक नाहीं, त्या लोकांना मनुष्यजातीची थोरवी मुळींच समजत नाहीं असें आम्ही समजतों; वास्तविक विचार केला असतां मनुष्याच्या अंगीं जे अनेक गुण आहेत त्या गुणांचे योगानें त्याला देवपणाही मिळूं शकतो, आणि बायकाही जर मनुष्य जातींतच मोडतात तर त्यांनाही देवाची योग्यता येईल हें उघड आहे. सारांश, केवळ वैधव्य प्राप्त झाल्यानें मनुष्यजन्म निरर्थक होत नाहीं.

ता० २८ जानेवारी शुक्रवार. "सकाळीं उठल्याबरोबर माझें अर्धें कपाळ दुखूं लागलें, त्यास काय

उपाय करावा हें मला समजत नाहीं. पण माझी खोड फार वाईट आहे. माझ्या मनांतील जो मोठा हेतु तो सिद्धीस जाण्यास ही मला फार नडणार आहे. कपाळ दुखूं लागलें ह्मणजे हातांत मला पुस्तक देखील घेववत नाहीं ह्मणून आज मला पुष्कळ वाईट वाटत आहे व निराशा होत आहे. असो. कोणताही चांगला हेतु आपण मनांत धरला तर तो सिद्धीस नेणार परमेश्वर समर्थ आहे. मी हातीं घेतलेलें काम तडीस नेण्याची शक्ति मला देणार तोच आहे."

आवडाबाईनें कोणता हेतु मनांत बाळगला होता हें वरील उताऱ्यांत कोठेंही सांगितलें नाहीं. तथापि तारीख १६ डिसेंबर सन १८८६ रोजीं तिनें मिस् सोराबजी यांना जें पत्र लिहिलें व जें आम्ही पुढच्या भागांत दिलें आहे त्यावरून तिच्या मनांतील हेतूचें दिग्दर्शन मात्र होतें. एवढ्याशा अल्प वयांत व इतक्या थोड्या अध्ययनानेंही जन्मास आल्यासारखें कांहीं तरी चीज करावें अशी बुद्धि होणें ही सामान्य गोष्ट नाहीं.

शनिवार ता० ५ फेब्रुवारी सन १८८७.
"मी आनंदीबाईच्या घरीं गेलें होतें. आनंदीबाई पूर्वीपेक्षां आतां फार अशक्त दिसते. तिचा शब्द तर अगदीं खोल गेला होता."

रविवार ता० ६ फेब्रुवारी सन १८८७.
" चिंगीचा ताप अजून कमी होत नाहीं. भिकाजीचें औषध सुरु करून चार पांच दिवस झाले तरी अजून त्याचा कांहींच गुण दिसत नाहीं. ही दिवसें-दिवस अगदीं अशक्त होत चालली आहे. काय करावें हें कांहींच सुचत नाहीं. असो. ईश्वर आह्मावर काय दया करील ती खरी."

सोमवार तारीख ७ फेब्रुवारी सन १८८७.
" मी मिस् हर्फर्डबरोबर स्टेशनावरील मोठ्या दवाखान्यांत गेलें. तेथें डा० कुकसाहेब आल्या-वर त्यांनीं मला पाहून एक औषध लिहून दिलें. तें येतांना ट्रेचरच्या दुकानीं विकत घेऊन आह्मी परत आलों."

* आली होती. तिनें माझें कपाट उघडलें तों आंत हें माझें पुस्तक पाहिलें. तें ती घेणार इतक्यांत मी तें तेथून उचललें व आपल्याजवळ घेतलें. मी ह्मटलें माझें तें पुस्तक कोणास दाखवावयाचें नाहीं, तेव्हां तिला वाईट वाटल्याप्रमाणें दिसलें. मला जें भय वाटत होतें कीं कोणी तरी हें बुक पाहील व त्यास मी अडथळा केला ह्मणजे वाईट वाटेल, तसेंच शेवटीं झालें. असो."

ही रोजनिशी तिनें किती जपून ठेवली होती हें वरील उताऱ्यावरून सहज समजेल.

ता० ८ माहे फेब्रुवारी मंगळवार १८८७. "पहाटे दोन वाजतां मी जागी झालें तों आई मोठ्यानें रडत अंथरुणावर बसली होती. तिच्या रडण्याचें कारण अर्थात चिंगीचें दुखणें होय. आम्ही सर्व मुलें आईबापांस सुख देण्यास तर नाहींच, पण दुःखच देण्यास उत्पन्न झालों आहों. त्यांनीं कोणाविषयीं म्हणून काळजी वहावी. असो. परमेश्वराच्या मनांत आह्मापासून त्यांस सुख व्हावें असें नसल्यास तें कोठून होणार? मला अण्णासाहेबांचें पत्र आलें."

ता० ९ बुधवार सन १८८७. "मी अण्णासाहेबांस पत्र लिहिलें. चिंगीचा खोकला अधिक झाला व उजव्या छातींत दुखूं लागलें."

ता० १० गुरुवार सन १८८७. "चिंगीला उजव्या कुशीवर निजवेनासें झालें. मी मिस् सोराबजींस विचारिलें कीं डा० कुक आमच्या घरीं येतील काय? ती ह्मणाली मी त्यांस विचारीन व उद्यां काय तें सांगेन. मी घरीं आल्यावर तसें आईला सांगितलें. आई म्हणाली अण्णासाहेब लवकरच येथें येतील तेव्हां ते असतांना डाक्तर आला ह्मणजे बरें, असें तूं तिला उद्यां सांग."

याच दिवशीं तिनें आपल्या भावजईस एक पत्र पाठविलें, तें पुढें वाचकांस सादर केलें आहे. यावेळेस तिचा भाऊ व भावजय हीं दोघें वडिलांजवळ नगरास होतीं.

Sadashiv Peth,
Poona,
10th February, 1887.

My dear Vahini,

We have had no letter from you since you left us. How very strange! Even little Sundri wrote to me yesterday but you did not. I think you forgot all about us as soon as you saw your husband. It is really very unkind of you to do so! I miss you very much indeed in school as well as at home. There is no one in the house to talk to. There is Chingubai, of course, but then she is so very ill and cannot speak even a word! It is so sad! She is getting thinner and weaker every day! The baby too looks very poorly now, as it doe not get enough milk! The medicine even seems to make her worse! We do not know what to do now!

I had a letter from Tatya yesterday. Please give him my love and tell him that I shall answer his letter to-morrow.

Miss Hurford took me to Dr. Cook on Mon-

day. We left home before 7 and reached the Sassoon Hospital at about half past seven ; but we had to wait for the Doctor till 8 o'clock. O ! it was so very cold as the hospital is paved with stones. The Doctor examined me and prescribed some medicine for me. We had the prescription made up at Treachers, in the Camp and then came home. The medicine is very bitter and I take it three times a day. I hope it will do me good. Miss Sorabjee and your classmates are going to write to you, so I need not say anything about them.

I hope you will not be so very unkind again as to leave my letter unanswered. I should like to know how you spend your time there, in playing or chattering or going to sleep or reading. Do you like Nagar ? How are Gharutai and Sundri ? Please give them my love and tell Sundri that I received her dear little note full of blots. I shall answer it as soon as I get time.

We are having very cold weather here just now. Is it cold there too ? With my love to you, I remain &c.

ता० ११ शुक्रवार सन १८८७. "मी शाळेंत गेल्यावर मिस् सोराबजींनीं सांगितलें कीं मी डाक्तर कुकला विचारिलें. तो उद्यां ९ वाजतां तुमच्या घरीं येणार आहे. पण त्याला घर ठाऊक नाहीं यासाठीं तुह्मी आपला एक मनुष्य त्या वेळेस तेथें

पाठवून द्या. मी आईनें सांगितलेला निरोप त्यांना सांगितला, पण मिस् हर्फर्ड म्हणाल्या कीं ते येथें नसले तरी हरकत नाहीं. मी तुमच्या घरीं येईन म्हणजे झालें. एक दिवस गेला तरी तिची प्रकृति तितकी क्षीण होते. अण्णासाहेब आल्यावर पाहिजे तर आणखीं एकदां डाक्तरला आणूं. तेव्हां मी वरें म्हटलें."

शनिवार तारीख १२ सन १८८७. "डाक्तर १० वाजतां आला. मिस् हर्फर्ड आधींच येऊन बसली होती. तिला मी चिंगीला काय काय होतें तें सर्व सांगितलें. डाक्तरानें चिंगीला तपासून पाहून सांगितलें कीं हिच्या उरांत उजव्या बाजूला Bronchitis आहे व फार अशक्त झाली आहे. ताप व खोकला थांबविण्यास लवकर उपाय झाले पाहिजेत, नाहीं तर हें दुखणें लवकरच क्षयावर जाणार. त्यानें एक तापावर व एक खोकल्यावर अशीं दोन औषधें लिहून दिलीं; ते कागद लगेच मिस् हर्फर्ड आपल्याबरोबर घेऊन गेली व दुपारीं औषधें घेऊन फिरून आली. तीं कशीं घ्यावयाचीं हें तिनें मजकरितां एका कागदावर लिहून आणिलें. किती तरी खटपटी बाई ही! म्हटलें असतां तिचा आमचा कांहीं एक संबंध नसतां आमच्याकरितां तिनें किती खटपट केली! ती फारच चांगली बाई आहे. देव

तिच्या हाताला तरी यश देवो. मी अण्णासाहेबांस पत्र लिहिलें. दोघी मिस् भोर आल्या होत्या. "

ता० १३ रविवार फेब्रुवारी सन १८८७.
" मिस् हर्फर्ड ११ वाजतां आली होती. तिनें तें दूध व दुसरें औषध कसें द्यावें हें मला दाखविलें व मुलाला दूध पिण्याची कुपी मी आणून देईन असें सांगितलें. * आली होती. मी व ती मिळून आनंदीबाईच्या घरीं गेलों. आनंदीबाईच्या खोलीचीं सर्व दारें बंद केलीं होतीं व आंतील हवा अगदीं कोंडली होती. मी आंत गेल्याबरोबर मला पुष्कळ घाम आला. आनंदीबाई अगदीं अत्यवस्थ आहे. गोपाळराव तक्याशीं टेंकून पलंगावर बसला आहे व आपल्या छातीवर तिचें डोकें ठेवून त्यानें तिला घेतली आहे. आज दोन तीन दिवस पोट फुगलें आहे. वरचेवर जीव घाबरा होतो. काल रात्रीं हातपाय गार पडले होते. आतां ती फार दिवस जगेल असें वाटत नाहीं. मी तेथें कांहीं वेळ होतें इतक्यांत मिस् हर्फर्ड तेथें आली. मी खालीं गेलें. तिनें मला सांगितलें कीं मुलाला दूध पिण्याची बाटली मी घरीं आणून दिली आहे. तिजबद्दल मी पैसे घेणार नाहीं. मी ती मुलाला दिली आहे. मग ती आणि मी वर आलों. ती गोपाळरावांशीं कांहीं बोलत होती व मी जवळ उभी होतें इतक्यांत एकदम

माझ्या डोळ्यांपुढें चक्कर आल्यासारखें मला वाटलें म्हणून मी मागें सरलें, व म्हटलें मला थोडें पाणी पाहिजे. इतकें म्हणतें तोंच मला घेरी आली व मी धाडकन् जमिनीवर पडलें, पण मला हें मुळींच समजलें नाहीं. माझ्या तोंडांत पाणी घातल्यावर मी सावध झालें. मग मिस् हर्फर्डनें मला आपल्या गाडींतून घरीं पोंचविलें व सांगितलें कीं तूं तेथें कधींही जाऊं नको. तेथील हवा फारच वाईट झाली आहे, व जर गेलीस तर आजारी पडशील. ×× "

ता० १४ फेब्रुवारी सन १८८७ सोमवार. × "×× मिस् हर्फर्ड आल्या होत्या. त्यांनीं डा० कुकला स्वतःचा खर्च करून आनंदीबाईला पहावयास नेला होता. ती बाई पलंगाच्या मागच्या बाजूस टेंकून बसली होती. तेथून जरा पुढें ये म्हणून सांगितलें. तेव्हां मला पुढें येववत नाहीं, असें तिनें सांगितलें. नवरा देखील तिला शक्ति नाहीं असें म्हणाला. डाक्तरानें पलंगावर चढून तिला पाहिली व तसाच निघून गेला. × × "

ता० १६ बुधवार फेब्रुवारी सन १८८७. "मी मिस् हर्फर्डबरोबर रात्रीं बंडगार्डनवर दिवे पहावयास गेलें होतें. तेथें पुष्कळ दारू उडाली. मिस् सोराबजी व त्यांच्या वहिणी आल्या होत्या. दिवे पुष्कळ लाविले होते. लोकांचा मोठा समाज मौज पाहण्यास जमला होता. गाड्या तर इतक्या

आल्या होत्या कीं मनुष्यास जाण्यास वाट मिळेना. बंडाची बाग दिव्यांनीं फारच सुशोभित दिसत होती. नदीच्या पुलाच्या कमानींतून दिवे लाविले होते यामुळें त्या दिव्यांच्या केल्या आहेत असें दिसत होतें. कालेजांतले लोक पुढें बाजा लावून व मशाली लावून थाटानें मिरवत आले होते व राणीच्या नांवानें जय शब्द करीत होते. येतांना आम्ही कौन्सिल हालाकडून आलों. तो नर दिव्यांनीं फारच सुरेख दिसत होता. टावरच्या पुढच्या बाजूला दिव्यांनीं राणीचा मुकुट काढिला होता व त्याच्या वरच्या बाजूला " विक्टोरिया " हीं अक्षरें दिव्यांनींच काढिलीं होतीं. येतांना रेमार्केट पाहिलें, तेथेंही पुष्कळ दिवे लाविले होते. मला घरीं येण्यास दहा वाजले. आज राणीच्या जुबिलीबद्दल सुट्टी होती. राणीला राज्यावर बसून पन्नास वर्षें झालीं, व या काळांत सर्व लोकांस सुख व शांतता मिळाली ह्मणून त्याबद्दल आनंद प्रदर्शित करण्याबद्दल हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणीं लोकांनीं आज मोठा उत्सव केला.

ता० १७ गुरुवार सन १८८७ फेब्रुवारी. "डा. कुक फिरून चिंगीस पहावयास आणला होता. तो ह्मणाला ती आतां पुष्कळ बरी आहे. औषधें बदललीं नाहींत. बळवंतराव ( चिंगूताईचा नवरा ) मुंबईहून आले. तात्याचें पत्र आलें. त्याला पांच

सहा दिवस बराच ताप आला व उजव्या बाजूला उरांत दुखतें असें लिहिलें होतें.

ता० १८ शुक्रवार सन १८८७ फेब्रुवारी. "मला घारूताईचें पत्र आलें. आणखी एक वेडें-वांकडे चमत्कारिक पत्र अण्णासाहेबांचे नांवावर आलें, पण आंतल्या बाजूस 'आऊताईस' हीं अक्षरें लिहिलीं होतीं, व पत्रांतला सर्व मजकूर मला उद्देशून होता. हें पत्र कोणीं लिहिलें असावें याची कल्पना मुळींच करवत नाहीं. अंत 'धर्म-रक्षक' अशी सही केली आहे. मला कांहीं शब्द फार लागण्यासारखे लिहिले आहेत, पण त्याबद्दल खेद मानण्याचें मुळींच कारण नाहीं; कारण तशा प्रकारचें वर्तन मजकडून कधींच झालें नाहीं, यास साक्षी सर्व जाणणारा परमेश्वर आहे. त्या पत्राव-रून पत्र लिहिणाराच्या सूचनेप्रमाणें मी न वागल्यास मला मारण्याचा त्याचा विचार आहे असें स्पष्ट दिसतें; म्हणून जरा चमत्कारिक वाटतें. पण असो, मला त्याबद्दल भीति बाळगण्यास नको. सर्वांचा पाठिराखा परमेश्वर माझ्याजवळ असतां विनाकारण मला इजा करण्यास कोण समर्थ होणार आहे? इंग्रजींत एक कविता आहे कीं

" God helps the right,
God spares the sin,

He brings the proud to shame,
He guards the weak against the strong,
Praise to his holy name. "

वरील उताऱ्यावरून आवडाबाईच्या मनांत पापभीरुत्व कसें जागरूक होतें याविषयीं वाचकांची खात्री होईलच. ही पापनिवृत्ति केवळ दांभिक नव्हती हेंही वरील उताऱ्यावरूनच स्पष्ट होतें. पापाचरणाची आसक्ति ज्याला असते त्याला दिव्य करण्याचा प्रसंग आला तर तो बाहेरून तसें करण्याचा डौल घालितो; परंतु जेव्हां तो निवांतस्थळीं आपल्या आपल्याशींच विचार करूं लागतो तेव्हां त्याचें मन त्याला खाऊं लागतें व ज्याच्या प्रखर दृष्टितेजापुढें कोणतीही गोष्ट छपून राहण्याचा संभव नाहीं त्या ईश्वराची साक्ष देण्यास त्याला कधींही धैर्य येत नाहीं. या मुलीला अशी आपल्या मनाची व परमेश्वराची साक्ष देण्यास बिलकुल शंका वाटली नाहीं; कारण तिचें मन पवित्र आणि तिचें आचरण फार शुद्ध होतें. उगीच खोटी शपथ घेण्याचेंही तिला कारण नव्हतें. शिवाय, परमेश्वराचे न्यायशीलतेवर व दुर्बलाचें परित्राण करण्याविषयींच्या त्याच्या तत्परतेवर तिचा पूर्ण भरवसा होता. " सर्वांचा पाठिराखा परमेश्वर माझ्याजवळ असतां मला इजा करण्यास कोण समर्थ होणार आहे ? " हीं निर्वाणीचीं अक्षरें ईश्व-

रावरच्या अनन्य भक्तीचीं सूचक आहेत. हीं वृथा दंभ करणाऱ्या चंचल वृत्तीच्या मनुष्याचे तोंडांतून कधींही निघावयाचीं नाहींत हें सांगावयास नकोच.

ता० १९ शनिवार फेब्रुवारी सन १८८७.

"बळवंतरावांनीं छत्रे डाक्टर चिंगीला पाहण्यास आणला होता. बळवंतरावाचे मनांत चिंगीला कुकसाहेबाचें औषध देऊं नये, विश्रामचें द्यावें असें होतें. परंतु त्याचें औषध कारणांवाचून एकदम बंद करतां येत नाहीं. याचा कांहीं तरी विचार केला पाहिजे. छत्रे यांनीं चिंगीचें दुखणें फार कठिण आहे असें सांगितलें. तें ऐकल्यापासून मला कसेंसेंच वाटत आहे. परमेश्वरा! तुझ्या मनांत माझी व माझ्या जिवलग चिंगूताईची ताडातोड करावी असेंच आहे काय? ती व मी लहानपणापासून खेळलों, बसलों, बोललों, नेहमीं तिच्या मनांत कांहीं गोष्ट आली कीं तिनें ती लागलीच मला सांगावी. ती किती तरी चांगल्या स्वभावाची ह्मणून सांगूं! कधीं माझ्याशीं भांडणें ह्मणून तिला ठाऊकच नाहीं. मी फार ह्माड होतें म्हणून कधीं मी कांहीं मागितलें तर तिनें तें मला द्यावें व आपण नेहमीं हार मानण्यास कबूल असावें. असे तिचे किती तरी गुण सांगूं! अशा माझ्या प्रिय बहिणीची ही अवस्था पाहून माझ्या मनाची काय स्थिति होत असेल बरें! याची कल्पना अनुभवावां-

चून कोणासही खास करतां येणार नाहीं. असो. परमेश्वराच्या इच्छेप्रमाणें सर्व होईल. मनुष्याकडे फक्त काळजी करणें एवढेंच राहिलें आहे, दुसरें कांहीं नाहीं."

वरील उताऱ्यावरून ह्या दोघीं वहिणींचें एकमेकींवर किती प्रेम होतें हें स्पष्ट आहे. जसजशी चिंगूताईची प्रकृति बिघडत चालली तसतसें आवडाबाईला दुःख आवरेनासें झालें. चिंगूताईचे प्रकृतीचें मान दिवसेंदिवस अधिक अधिक बिघडत चाललें व प्रतिदिवशीं जी तफावत पडली तिचें टिपण या रोजनिशींत आहे. प्रकृति क्षीण होतां होतां जेंव्हां शेवट जवळ आला तेंव्हां जे दुःखाचे उमाळे फुटले ते वाचून वाचकांचे डोळेही पाण्यानें भरून येतात, मग प्रत्यक्ष आवडाबाईलाच किती दुःख झालें असेल याची वाचकांनीच कल्पना करावी.

सोमवार ता० २१ फेब्रुवारी सन १८८७.

"आज शिवरात्रीची शाळेला सुट्टी होती. आम्ही पर्वतीस गेलों होतों. चिंगीचा डावा पाय आज दोन तीन दिवस सुजला आहे व दुखतो आहे."

मंगळवार ता० २२ फेब्रुवारी सन १८७७.

"डा. कुकला चिंगीला पाहण्यास आणला होता. त्यानें एक्या पायाला चोळण्यास औषध दिलें."

शनिवार ता० २६ सन १८८७ फेब्रुवारी. " मी मिस् हर्टफर्डबरोबर डा० कुककडे सासून इस्पितळांत गेलें होतें. त्यानें मला औषध लिहून दिलें. मी त्या पत्राविषयीं मिस् हर्फर्डला सांगितलें. केशवराव पटवर्धन यांच्या मुलीचे लग्नास मीं आईबरोबर गेलें होतें. मी आनंदीबाईच्या घरीं गेलें होतें. ती अगदीं अत्यवस्थ आहे. पायांना सूज देखील आली आहे. "

आदितवार ता० २७ फेब्रुवारी सन १८८७. " आज अंथरुणांतून उठल्याबरोबर आनंदीबाई जोशी मेल्याची बातमी ऐकली; त्यामुळें मला फार वाईट वाटलें. या बाईच्या धैर्याची कल्पना मनांत आली ह्मणजे फार आश्चर्य वाटतें. बायको माणूस होऊन एकटी परक्या देशांत जाऊन परक्या लोकांत तीन चार वर्षें अभ्यास करून शेवटीं तिची परीक्षा उतरली व आतां तिच्या मनांतील हेतु पूर्ण होण्याची वेळ आली तोंच तिला काळानें गांठली! ईश्वरी इच्छेपुढें कोणाचा इलाज नाहीं. तिनें आपलें कर्तव्य केलें व आपली कीर्ति गाजविली. परंतु लोकांच्या दुर्दैवानें त्यांस तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं! "

ता० ३ गुरुवार सन १८८७ मार्च.

" डा० कुक मिगीला पहाण्यास आला होता. चिंगीचा ताप अजून मुळीं कमी होत नाहीं. × × × "

शुक्रवार ता० ४ सन १८८७ मार्च. "या एप्रिल महिन्यांत ड्राइंगची परीक्षा होणार आहे. त्या परीक्षेस मी बसणार आहें ह्मणून माझें नांव करकमसाहेबांकडे पाठविलें."

शनवार ता० ५ मार्च सन १८८७.—"आजपासून आमच्या शाळेंतली लायब्ररी सुरू झाली. मी शिक्षक नांवाचें पुस्तक वाचावयास आणिलें. × × ×"

बुधवार तारीख ९ मार्च सन १८८७. "आजपासून आमच्या शाळेला शिमग्याची सुट्टी झाली. मिस् हर्फर्ड आमच्या घरीं रोज येते. ती आतां हुजुरपागेंत रहावयास आली आहे."

गुरुवार ता० १० मार्च सन १८८७.—"आज सकाळीं डाक्तर कुकला चिंगीला पहावयास आणला होता. मागच्या आदितवारीं त्याला आणला तेव्हां ती जरा बरी आहे असें तो ह्मणाला. पण आज तिचें अधिक आहे. तिच्या उजव्या फुप्फुसांत वरच्या बाजूस मात्र विकार झाला होता. तो आतां खालपर्यंत गेला, व डाव्या बाजुसही रोगाची सुरुवात झाली असें तो ह्मणाला. हें ऐकून मला काय वाटलें तें मलाच ठाऊक. माझ्या डोळ्यांतून पाणी येऊं लागलें, तेव्हां मी एकीकडे जाऊन बसून पुष्कळ रडलें. माझ्या प्रिय बहिणीस दिवसेंदिवस गुण न वाटतां उलटें तिचें दुखणें अधिकाधिकच

बळावत चाललें तेव्हां आतां मी काय करूं? माझ्याच्यानें आतां कांहीं लिहिवत नाहीं. डोळे वरचेवर एकसारखे पाण्यानें भरून येत आहेत. हे परमेश्वरा! माझ्या चिंगूताईला तूं बरी करशील काय? मनुष्यामध्यें तर तसें करण्याची शक्ति नाहीं, पण तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडून येतात."

वरील उताऱ्यांत चिंगूताईकरितां केलेला ईश्वराचा धांवा व सर्व प्रसंगीं ईश्वरेच्छेवर ठेविलेला हवाला ह्या दोन गोष्टी आवडाबाईच्या अंतःकरणाच्या कोमळपणाची आणि भाविकपणाची साक्ष देतात हें कोणीही कबूल करील.

शुक्रवार ता० २१ मार्च सन १८८७. "आज चिंगीला एका बाईचें दुधांतलें औषध दिलें. त्यावर पाणी प्यावयाचें नाहीं असें तिनें सांगितलें. रात्रीं एक वाजेपर्यंत कसा तरी तिनें दम काढला, पण मग तिच्यानें राहवेना, तेव्हां शेवटीं पाणी दिलें. या औषधानें चिंगीचा खोकला कोरडा झाला. ताप फार भरला व उरांत अधिक दुखूं लागलें. हें औषध तीन दिवस द्यावयाचें होतें. पण मग आह्मीं तें दिलें नाहीं."

ह्याप्रमाणें प्रत्येक दिवशींची चिंगीच्या प्रकृतीची हकीकत या रोजनिशींत आहे, परंतु ती वाचकांस कंटाळवाणी वाटेल या भीतीनें आह्मी ती येथें देत

नाहीं. तारीख १६ मार्च रोजीं तिनें आपल्या वडिलांला पत्र लिहिलें आहे तें येथें देतों. त्यावरून सर्व हकीकत कळेल.

Poona, 16th March, 1887.

My dear father,

I received your letter yesterday morning. Dear Chingi is not any better. We have stopped Dr. Cook's medicine as it did not seem to do her any good and have begun giving her Dr. Garde's medicine. Dr. Garde came on Monday. We heard from Chingi's mother-in-law; little Vaman is quite well.

How is dear Tatya? I hope he will soon be himself again. Please give him my love. We all miss him very much indeed. Mother sends her love to him. Our school reopened on Tuesday after the Shimga holidays. All my lessons are going on very nicely. Miss Hurford comes to see Chingi every day. It is so very kind of her to think of us in our trouble. We are all most grateful to her.

With my love to you,
I remain,
Yours affectionate daughter
AVDI.

या उताऱ्यांतील पहिल्या भागाचे संबंधानें तिच्या एका पत्रांत खुलासा आहे. तें पत्र तिनें आपल्या भावास लिहिलें आहे. त्यावेळेस तिचा भाऊ

नगरास आपल्या बापाजवळ होता. तें पत्र येथें वाचकांस सादर करण्यासारखें आहे.

Poona, 7th April, 1887.

My dearest brother,

I have been looking out anxiously for a letter from you since you left us, but in vain. I wrote to Vahini also on Saturday but she has not answered. Please do not be so unkind to your loving sister. Do you feel better now? How is the pain in your chest? Do you like Nagar? Not so much as Poona I suppose. Father came here yesterday afternoon. Dear Chingi is far worse. Her cough has increased so much, that she can't sleep all night! I went up for the First Grade Drawing Examination in the Boys' High School. Miss Hurford came with me. * * * Mr. Kunte, the Headmaster, was very kind. He gave us his own room to sit in. I did my freehand and Geometry there, but for the model drawing, I had to sit with the other candidates * * * *; this I did not like at all. Mr. Kunte was sitting on one side of me and Miss Hurford on the other; still I was trembling; I don't know why. I think, perhaps, because I had never sat among such a number of boys before; and for this reason, I did not do my model so well as the others. It was a difficult model, an oblong with a globe balanced on it. There were seven propositions from Practical Geometry. I did them all. The result is to be declared on, they say, the 23rd instant. Please give my love to Vahini, and tell

her to answer my letter. Mother sends her love to you, and bids you take great care of yourself.

With my love to you
I remain,
Yours affectionately,
AVADI.

रविवार ता० २७ मार्च सन १८८७.
" चिंगीची तसबीर काढली. "
गुरुवार ता० ३१ मार्च सन १८८७.
" बळवंतराव, मुलगा व चिंगीची सासू आ-ली. बळवंतरावांनीं मला ड्राइंगचे कागद, एक रबर व पेन्सली आणल्या. आज पांचसहा दिवस चिंगीच्या पायाला सूज आली. उजव्या हाताला सूज आली आहे, व तोंडही जरा सुजलें आहे! काय परमेश्वर करील तें खरें!!"

शुक्रवार ता० १ एप्रिल सन १८८७.—" आज ड्राइंगची पहिली परीक्षा मुलांचे हायस्कुलांत झाली. मी परीक्षेला बसलें होतें. मिस् हर्फर्डे माझ्याबरोबर आली होती. पहिल्यानें आह्मास बसण्यास निराळी खोली दिली होती. तेथें दोन कागद लिहिले. नंतर माडेलच्या वेळीं जेथें मुलें बसलीं होतीं, तेथेंच ब-सावें लागलें; कारण दुसरा ग्लोब नव्हता, असें कुंटे ह्मणाले. मुलांमध्यें बसणें जरा चमत्कारिक

वाटलें. दुसऱ्या कोणीच मुली नसून मी अगदींच एकटी होतें. मिस् हर्फर्डे माझ्याजवळ वसली होती.

आज रात्रीं बळवंतराव माझ्या माडींत असतांना ह्मणाले कीं डा० विश्राम ह्मणाला चिंगू ह्या दुखण्यांतून वरी होण्याची मुळींच आशा नाहीं! हें ऐकून मला फार वाईट वाटलें. पुष्कळ वेळ अंथरुणावर पडलें असतां हेच विचार एकसारखे मनांत घोळत होते. माझें मन कशाकडे लागत नाहीं. जिकडे पहावें तिकडे निराशेचीं चिन्हें दिसतात. आमचा जो पूर्वींचा बेत कीं कांहीं जरी झालें, कोणताही प्रसंग आला तरी एकमेकींला मदत करून धीरानें त्यांतून पार पडावयाचें, तो आतां कोणीकडे गेला? मी व माझी चिंगी यांमध्यें आतां ताडातोड होणार व ती कशी तर फिरून कधीं न फिरणारी. असें जर कोणी मला सांगितलें तर माझ्या मनाची स्थिति काय व्हावी? ते शब्द माझ्या अंतःकरणास कांट्यासारखे खुपतात. यांत नवल तें कोणते? मजवर असा दुःखाचा प्रसंग आणण्याचें जर ईश्वराचे मनांत असेल, तर तो सोसण्यास मला तयार असलेंच पाहिजे. दुसरा उपाय काय? × × × × ×"

रविवार ता० ३ एप्रिल सन १८८७.

"मी मिस् हर्फर्डेच्या घरीं गेलें होतें. त्यांना फार ताप आला आहे. माईची मुलगी फार आजारी आहे.

गोंकराचा ताभ पांचसहा दिवस येत आहे, पण गोंवर अजून बाहेर पडला नाहीं. चिंगीच्या तसबिरी आणल्या, पण चांगल्याशा निघाल्या नाहींत."

सोमवार ता० ४ एप्रिल सन १८८७.—" माईच्या मुलीला श्वास झाला ह्मणून तिला गाडींतून येथें आणली. सुमारें दहा वाजतां पोरगी मेली. संकटें येऊं लागलीं ह्मणजे एकदम येतात! कालपासून चिंगीच्या पोटांत दुखत आहे व तीन चार वेळ परसाकडे जावें लागतें. मुळींच शक्ति नसल्यामुळें तिला फार श्रम होतात. आज साऱ्या रात्रभर खोकला चाळवला होता. एक मिनिटभर देखील झोंप लागली नाहीं. मी शाळेंत गेलें नाहीं."

बुधवार ता० ६ एप्रिल सन १८८७.—" अण्णासाहेब आले. शितारामपंत आले होते. मी शाळेंतल्या लायब्ररींतून John Halifax हें पुस्तक वाचायाला आणलें."

गुरुवार ता० ७ एप्रिल सन १८८७.—" मिस् हर्फर्डचा पाय दुखत आहे ह्मणून ती शाळेंत आली नाहीं. माझें शाळेंत कपाळ दुखत होतें. मी शाळेंतून येतांना मिस् हर्फर्डच्या समाचारास गेलें होतें. मिस् सोराबजी चिंगीच्या समाचारास आल्या होत्या. * * * "

शुक्रवार ता० ८ एप्रिल सन १८८७.—" आ-

जपासून गुड्फ्रायडेची चार दिवस सुट्टी आहे. चिंगीची प्रकृति दिवसेंदिवस अधिकच होत चालली आहे. अंथरुणावर सर्व विधि होण्याची पाळी आली. तिला फारच यातना होतात, त्या अगदीं पाहवत नाहींत. असो ; ईश्वराची मर्जी ! * * * "

शनिवार ता० ९ सन १८८७ एप्रिल.

" मी मिस् हर्फर्डच्या घरीं गेलें होतें. चिंगीची प्रकृति अधिक बिघडली."

रविवार ता० १० सन १८८७ एप्रिल.—" सुद्रींचें हळदकुंकू झालें. माझ्या माडींत गौर मांडली होती. रात्रीं चिंगीला मी ह्मटलें " चिंगे माझ्या माडींत गौर पहायास येतेस का? ती ह्मणाली, मला कोणी उचलून नेलें तर येतें. मग बळवंतरावांनीं तिला उचलून माझ्या माडींत आणली. मी अंथरूण घातलें होतें त्यावर तिला निजविलें ! किती दिवसांनीं चिंगी माझ्या माडींत आली ! जेथें आह्मी दोघी बसावयाच्या तेथें येण्याची सुद्धां तिला शक्ति नाहीं ! तिनें हंसून माझ्या माडींतल्या सर्व जिनसांकडे पाहिलें, व मग तिचें तोंड जरा उतरल्यासारखें दिसलें ! ह्यावेळेस तिच्या मनांत काय बरें विचार आले असतील ! माझ्याप्रमाणेंच " आम्ही दोघी पहिल्याप्रमाणें ह्या माडींत गोष्टी सांगत बसलों आहों असा दिवस फिरून येईल काय ? " असें तर तिच्या मनांत आलें

नसेल ना ! घटकाभरानें चिंगीला उचलून तिच्या माडींत नेलें. "

सोमवार ता० ११ सन १८८७ एप्रिल.

" चिंगीला आज रात्रीं दहा वाजतां जास्त श्वास झाला. सारी रात्र कोणाला झोंप नाहीं. "

मंगळवार ता० १२ सन १८८७ एप्रिल.

" गेली ! माझी चिंगूताई सरशेवटीं मला सोडून गेली !! माझी फार प्रिय बहिण हरवली !! माझे मनाचें शांतवन करणारी आपलें काम माझ्याकडेस सोंपवून चालती झाली !! आतां तें तोंड ह्या जगांत माझ्या दृष्टीस पडणें नाहीं !!!

आज सकाळीं मी तिच्याजवळ जाऊन बसलें तेव्हां तिनें आपल्या दोन्ही हातांनीं माझ्या गळ्याला मिठी घातली तेव्हां मी रडूं लागलें. हें पाहून चिंगी ह्मणाली " आवडे, रडूं नको. मी रडतें आहें का पहा बरें ! आई, माझ्या वामनाला तो मोठा झाला ह्मणजे आवडीजवळ ठेव. तो चांगला निघाला तर तिच्या उपयोगी पडेल. आवडे, वामन आतां माझा नव्हे, तो तुझाच आहे. त्याला आतां संभाळ !! " होय, चिंगे मी आपल्या वामनाला जिवापलीकडे संभाळीन, पण तुझ्यावांचून मी आतां काय करूं? एखादें काम करतांना मी आतां कोणाची मसलत विचारूं ? आतां मला कोणी मित्र नाहींसा झाला.

ल्यां मला कांहीं सुचत नाहीं. तीन वाजतां चिमूताई चालत्या झाल्या. मिस् भोर व मिस् हर्फर्ड आल्या होत्या."

बुधवार ता० १३ एप्रिल सन १८८७.

" आज जिकडे तिकडे उदास भासत आहे. माझ्या मनाची स्थिति आतां काय आहे याचें वर्णन माझ्यानें करवत नाहीं. चिंगीची मूर्ति एकसारखी माझ्या डोळ्यांसमोर उभी आहे. किती प्रयत्न केला तरी डोळ्यांचें पाणी ह्मणून खळत नाहीं. आतां काय करावें हें कांहीं सुचत नाहीं. हातपाय अगदीं गळून गेले आहेत. माझें दुःख लपवून ठेवण्याची शक्ति आज मला मुळींच नाहीं! माझ्याजवळ कोणी नसलें ह्मणजे मन विचारांत गढून जातें. कोणी जवळ आलें कीं एकदम रडूं कोसळतें. मिस् सोराबजी आल्या होत्या."

ता० १५ शुक्रवार सन १८८७ एप्रिल.

" मी शाळेंत संध्याकाळीं गेलें होतें. मिस् सोराबजींनीं त्यांची थोरली बहिण जेन सोराबजी ह्यांनीं दिलेलें एक पत्र मला दिलें. त्यांत कांहीं इंग्रजी कविता करून पाठविल्या आहेत. त्यांत मला एक मुलगी कल्पिलें आहे व चिंगी माझ्या बागेंतील अति प्रिय झाड आहे, व माळी तें तोडून टाकीत आहे, तेव्हां ती मुलगी त्यास तें न तोडण्याविषयीं विनंति करीत

आहे. तेव्हां तो माळी तिचें शांतवन करून तिला त्या झाडाची एक फांदी तोडून देऊन ह्मणतो हीं तूं लावून चांगल्या काळजीनें वाढीव ह्मणजे त्यापासून तुला फलप्राप्ति होईल. हें झाड आतां तोडलेंच पाहिजे, कारण त्यांत विषारी किड्यानें प्रवेश केला आहे वगैरे."

हीं वर सांगितलेली इंग्रजी कविता तिनें जपून ठेवलेली आह्माला तिच्या कागदपत्रांत सांपडली. ती वाचण्यासारखी आहे ह्मणून ती आह्मी येथें देतों.

*In Loving Memory of the Dear One who fell asleep on the 12th April 1887.*

" The Gardener and the Maid. "

Maid:—

Why touch that tree ? why pull its leaves ?
'Tis quite new and tender.
Don't shake it, sir, my soul it grieves.
Say ' no ' to the Great Sender.

Gardener:—

Maiden, I do but what I'm told.
'Tis true, the tree is tender,
But do you see these leaves that fold ?
They can no service render.
The canker worm has eaten deep
Into its trunk once stronger,
Though young to look at; nay, don't weep.
The tree can't stand much longer.

**Maid :—**

Oh Sir, just look, so green and bright,
The leaves are new and shining;
They do look such a pretty sight
With that strong tree entwining.

**Gardener: —**

That colour bright can never last,
'Tis come so nigh to fading;
It's brightest hours may count a past,
The future is decading.
I'll save one branch and tend with care
Each leaf so frail and fleeting,
I'll plant it where its mother fair
Will oft ordain a meeting.
Their parent Oak is firm and strong,
It lives and thrives in beauty,
It shelters all who come along
And always does its duty.
So if this branch is planted near,
The leaves will have its shading ;
'Twill guard its own, have not a fear
Of enemies invading.
To save the branch, the tree must go
Its sap is poison–giving;
Your looks, dear maiden, speak of woe,
But we must tend the living.

**Maid :—**

Oh Sir, it's hard, nay, let me weep;
The tree I loved and cherished,
Has now to live in endless sleep
And lie amongst the perished !

GARDENER :—

Stay, maiden ! weep no more; that tree
Will blossom and live for ever.
'Twill by the Master cultured be,
Beside the clear cool river.
HIS gardens bloom when others die
HIS trees are firm and lasting ;
They thrive beyond in pastures high
Their shadows here forecasting.

MAID :—

Where are those gardens, Sir, do say;
I know the path is dreary;
But if you'll kindly point the way
It will not seem so weary.

GARDENER :—

*Your Master* points the way, my child,
If you will only see him;
Through deserts dark and forests wild
Look for all guidance to him.
You know him not, but seek him dear;
Your tree is in his garden.
Delay not, then, there is a fear
The way to it may harden.
'Tis easy now and can be found
*Your Master*'s near to guide you.
His love will form a circle round;
*He* stands himself beside you.

With love,
Yours affectionately
JANE SORABJEE.

मराठी वाचकांकरितां आह्मी यावरील कवितेचा भावार्थ कवितारूपानें देतों:—

माळी आणि मुलगी.

मु०—कां लाविशी बोट तया लतेला,
कां ओढिशी त्या नव पल्लवाला।
आहे लता ती सुकुमारगात्री,
हें दुःख तीचें बघवें न नेत्रीं॥
नको तिचे हाल करूं दयाळा,
निषेधि, बा, आपुलिया धन्याला।
मा०—आज्ञा धन्याची मजला प्रमाण,
लता जरी हे सुकुमार सान॥
तरी तिचीं हीं मिटतात पाहीं,
पानें तयांचा उपयोग नाहीं।
गे कोवळें खोड जरी दिसे हें,
गर्भी तयाच्या बघ कीट आहे॥
तो अंतरीं खाइ पहा लतेला,
देऊं नको शीण फुका मनाला।
मु०—उद्यान पाला, हिरवी कशीं हीं,
सुरेख पानें दिसतात पाही॥
त्या आम्रवृक्षा कवटाळितां तीं,
दृष्टीस आनंद अमूप देतीं।
मा०—मुली न हा रंग असा टिकेल,
क्षणांत शोभा सगळी ढळेल॥

निघूनि गेला दिन उत्सवाचा,
आला पुढें काळ, पहा, लयाचा ॥
शाखा तिची राखिन एक, पानें
हीं कोंवळीं रक्षिन काळजीनें ॥
लावीन हा अंकुर त्या लतेचा,
होई जिथें आठव माउलीचा ॥
होता हिला आश्रय ज्या तरूचा,
तेजस्वि त्या स्पर्श नसे जरेचा ॥
जे मागती आश्रय, त्यांसि देतो,
छाया स्वकर्त्तव्यचि आचरीतो ।
म्हणूनि गे सन्निध त्या तरूच्या,
लावीन शाखा म्हणजे तयाच्या ॥
छायेंत संरक्षण होय त्याचें,
जेथें नसे नांव मुळीं भयाचें ।
व्हाया मुली रक्षण अंकुराचें,
हें पातलें छेदन या लतेचें ॥
विषारि आहे रस या लतेचा,
घेईल तो जीवचि अंकुराचा ।
ही तों लता आज उद्यां मरेल,
तिच्यासवें अंकुर हा सुकेल ॥
सजीव-संरक्षण हेंच इष्ट,
उगा नको तूं मुलि, होऊं रुष्ट ।
मु०—उद्यानपाला, परि हा कठोर

प्रसंग, हें दुःसह दुःख घोर ॥
जीच्यावरी प्रेम मनीं उदण्ड,
केलें, अहा ! होईल काष्टखण्ड ।
मा०—नको रडूं हीच पुन्हां फुलेल,
जरा न वा मृत्यु हिला घडेल ॥
स्वोद्यानिं लावील तिला प्रभू तो,
जेथें सुधावर्ष सदैव होतो ।
आराम सारे जरि शुष्क होती,
त्याच्या तरूंना न कदापि भीती ॥
दिव्य स्थलीं वाढति जे तयांची,
छाया पडे येथ जना सुखाची ।
मु०—आराम हे सुंदर सांग कोठें,
वाटे तया मार्ग भयाण मोठे ॥
तूं वाट बापा ! जरि दाविशील,
कंटाळवाणे न च वाटतील ।
मा०—प्रभू जगाचा तुज वाट दावी,
त्याचेकडे दृष्टि तुवां करावी ॥
दावावया वाट भयाण रानीं,
प्रभूविणें नाहीं समर्थ कोणी ।
नसे तुला तो प्रभुराय ठावा,
त्याचा, मुली, शोध तुवां करावा ॥
त्याच्याच दिव्योपवनीं लता ते,
जीचें तुला प्रेम उदण्ड होतें ।

शोधावया लाग तया प्रभूसी,
नको करूं व्यर्थ विलंब यासी ॥
हा काळ जातां निघुनी, पडेल,
सायास, ती वाट न सांपडेल ।
आतांच सोपी बघ वाट आहे,
प्रभू तुझ्या पाशिं उभाच राहे ॥
तो पाठिराखा असतां कशीही,
बाळे तुला भीति मुळींच नाहीं ।

चिंगूताईचें स्मारक ह्मणून आणखी एक लहानशी इंग्रजी कविता तिच्या कोणी मैत्रिणीनें तिला पाठविली. ह्या कवितेविषयीं उल्लेख तिच्या रोजनिशींत नाहीं. तथापि तिच्या कागदपत्रांत हेंही लहानसें पद्य जपून ठेविलेलें आहे व त्याचाही भावार्थ फार उदात्त आणि रमणीय आहे ह्मणून तेंही आह्मी आपल्या वाचकांस येथें सादर करितों.

*In Memoriam* CHINGU BHIDE.

Chingu, Heaven has called thee;
Heaven has kept its own.
Into bliss God guides thee
Near his precious throne.
God has drawn thee nearer,
Unto him made dearer.
But thy babe He's leaving
Heaven will still its grieving.
Into hands so tender,

Dear, thy babe surrender;
Endless love he'll render.

याचाही भावार्थ आम्ही मराठी वाचकांकरितां पद्यरूपानें देतों:—

बोलाविलें तुजसि चिंगु जगत्पतीनें
जें त्यास इष्ट जगिं, रक्षियलें तयानें।
सिंहासनाजवळि नेइ सुखागरांत
आहेस तूं प्रिय ह्मणूनि धरूनि हात ॥
मागें तुझ्या तव शिशू जरि राहणार,
त्याला समर्थ हरि तो समजाविणार ॥
आप्तांचिया करिं तुझ्या प्रिय बाळकाला,
ठेवी, न अंतर कधीं हरिच्या दयेला ॥

ता० १८ सोमवार १८८७ एप्रिल. "मी वेडर्बर्न साहेबांच्या मुलीला एक साश करून पाठविणार आहे. याकरितां फीत व रेशीम मिस् सोराबजीनीं आणलें व मला पाहण्याकरितां पाठविलें.* *"

ता० २० बुधवार सन १८८७ एप्रिल. "साश करण्यास प्रारंभ केला. मिस् भोरनीं वामनाला लोंकरीचे पायमोजे दिले. *"

ता० २१ गुरुवार सन १८८७ एप्रिल. "चिंगीच्या तसबिरीला फ्रेम आणविली."

शनवार ता० २३ एप्रिल सन १८८७. "आज सकाळीं आह्मी शाळेंत गेलों होतों. सध्याकाळीं रा-

नडीबाईनीं शाळेंतल्या मुलीकारितां हुजुरपागेंत हळदकुंकू केलें. तेथें मी गेलें होतें. मिस् सोराब्जी आल्या होत्या त्यांच्या बरोबर मी व घारूताई त्यांच्या घरीं गेलों. तेथें सर्व मुली शिवणकाम करीत बसल्या होत्या. मी ही एक तासभर आपलें शिवणें तेथें करीत बसलें. नंतर आह्मी घरीं आलों. "

रविवार ता० २४ एप्रिल सन १८८७. " मिस् हर्फर्ड आज महिनाभर मला महाबळेश्वरास नेण्याची खटपट करीत आहे. तिनें आईला विचारलें कीं मजबरोबर आवडीला महाबळेश्वरास पाठवाल काय ? तेव्हां आई हो ह्मणाली. पण चांगली जागा अजून मिळाली नाहीं. शंकरराव पंडित व नूलकर हे तेथें गेले आहेत. त्यांस मला राहण्यास त्यांच्या बंगल्यांत जागा मिळावी ह्मणून मिस् हर्फर्डनें पत्रें लिहिलीं, पण आमचे बंगले फारच लहान आहेत असें त्यांनीं उत्तर दिलें. आतां एखाद्या हाटेलांत मिस् हर्फर्ड जागा पाहणार आहेत, पहावें काय होतें तें. "

ता० २५ सोमवार एप्रिल सन १८८७. " आज मिस् हर्फर्ड आलीं तेव्हां तिनें सांगितलें कीं मला आज महाबळेश्वराहून तार आली त्यांत रिपन हाटेलांत जागा आहे. तूं व मी एका खोलींत निजूं व तुला स्वयपाकास निराळें छप्पर बांधून देणार आहेत.

आमचा चवथ्या तारखेस निघण्याचा बेत झाला. माझ्या बरोबर स्वयपाक करण्यास गोविंदा येणार आहे."

शुक्रवार ता० २९ एप्रिल सन १८८७. "मी मिस् सोराबजीच्या घरीं गेलें होतें, तेव्हां त्या बाहेर गेल्या होत्या. त्या येईतों बराच वेळ मला थांबावें लागलें. त्या आल्यावर साश त्यांच्या जवळ दिली व कांहीं वेळ बसून मी घरीं आलें, त्यांनीं मला दोन इंग्रजी पुस्तकें वाचावयास दिलीं."

ता० २ मे सोमवार सन १८८७. "वेडरबर्न साहेब येथें आले आहेत. आज गांवांत पुष्कळ ठिकाणीं त्यांस मेजवान्या, पानसुपारी व सभा आहेत. मी अण्णासाहेबांच्या बरोबर त्यांच्या बंगल्यांत दोन वाजतां गेलें होतें. त्यांच्या मुलीकरितां तयार केलेलें बक्षीस मी आपल्याबरोबर नेलें होतें. तें त्यांच्या जवळ दिलें. त्यांनीं तें उघडून पाहिलें व हें फार चांगलें केलें आहे असें ते ह्मणाले. मिस् हर्फर्डच्या घरीं मी गेलें होतें तेव्हां त्यांनीं मला एक मोठी वेडर्बर्न साहेबांची तसबीर दाखविली. ती येथील न्यूस्कुलांतल्या ड्राइंगमास्तरानें काढली आहे."

मंगळवार, ता० ३ मे सन १८८७. "मी मिस् हर्फर्डबरोबर लष्करांत गेलें होतें. एक बूट विकत घेतला. मिस् हर्फर्डनें महाबळेश्वरास जाण्यास ७७

रुपयाला फेटन ठरविली. उद्यां संध्याकाळीं पांच वाजतां निघायचा बेत झाला. गोविंदा व मावशी महाबळेश्वरास जाण्याकरितां पुढें गेलीं."

ता० ४ बुधवार सन १८८७. "आज संध्याकाळीं सहा वाजतां आम्ही महाबळेश्वरास जाण्याकरितां पुण्याहून निघालों. गाडींत मी व मिस् हर्फर्ड अशा दोघींच होतों. मला रात्रीं गाडींत मुळींच झोंप लागली नाहीं. पहाटे मात्र थोडी लागली. सहासहा कोसावर गाडीचे घोडे बदलीत होते. वाईच्या जवळच्या टप्यांत आह्मी आलों तेव्हां तीन वाजले. सकाळीं ९ वाजतां येथें येऊन पोंचलों."

ता० ५ गुरुवार मे सन १८८७. "आह्मी येथें आलों तों मावशी व गोविंदा नुकतींच येऊन पोंचलीं होतीं. तीं वाठारपर्यंत आगगाडींतून आलीं व तेथून बैलाच्या गाडींतून येथें आलीं. सर्व तयारी होऊन जेवण मिळण्यास १ वाजला. आह्माला घालून दिलेलें छप्पर अगदींच लहान असून त्यास दार नाहीं. मिस् हर्फर्डची खोली मोठी आहे. तींत दोन पलंग आहेत. एकावर मी व मावशी निजलों व दुसऱ्यावर मिस् हर्फर्ड निजली. आह्मी संध्याकाळीं फिरावयास गेलों होतों."

ता० ६ शुक्रवार मे सन १८७७. "आह्मी सकाळीं लड्विकपाइंटकडे फिरायला गेलों होतों.

वाटेंत शंकरराव पंडित भेटले. दुपारी उषाबाई आली होती त्या उद्यां आह्मास गाडी पाठविणार आहेत. × × ×

महाबळेश्वर हें ठिकाण फारच चांगलें आहे. मला तें फार आवडतें. येथल्यासारखा मनोरम सृष्टीचा देखावा मी कोठेंच पाहिला नाहीं. सर्व डोंगर गर्द झाडींनें आच्छादिला आहे, व त्यांत नानाप्रकारचीं रानटी फुलें व फळें दृष्टीस पडतात. झाडीच्या बाहेर निघून पर्वताच्या टोंकावर उभें राहिलें ह्मणजे पुढें फारच भव्य व रमणीय देखावा दिसतो. मध्यें खोल दऱ्या व त्यांच्या पलीकडे एकापेक्षां एक उंच उंच पर्वत झाडांनीं हिरवेगार दिसतात. ढग अगदीं डोंगराच्या शिखरास टेंकल्यासारखे दिसतात. आज संध्याकाळीं बराच पाऊस पडला व गारा पडल्या. येथें धुकें अतिशय पडतें. सर्व झाडें, डोंगर व घरें धुक्यानें भरून जातात, व बाहेर गेलें असतां चार पांच हातांवरचें मनुष्य देखील स्पष्ट दिसत नाहीं."

शनवार ता० ७ मे सन १८८७. "आज सकाळीं आह्मी फिरावयास गेलों तेव्हां नूलकरांचें घर आह्मांस सांपडलें. आह्मी आंत गेलों होतों. त्यांची मुलगी गंगू ही येथें आहे. तिनें मला दुपारची बसायाला बोलावली. मी दुपारीं गेलें होतें. संध्याकाळीं उषाबाईनीं गाडी पाठविली तेव्हां त्यांच्या घरीं आ-

ह्मीं गेलों. त्यांचा बंगला फार सुरेख आहे. कृष्णी पंडित येथेंच आहे. आह्मी सर्वजण वाबिंग्टन पाइं-टकडे फिरायला गेलों होतों, पण धुक्यामुळें देखावा कांहींच दिसला नाहीं."

रविवार ता० ८ मे सन १८८७. "आह्मी बाहेर फिरायला गेलों तेव्हां तळें व शर्यतीची जागा पाहिली. मी नूलकरांच्या घरीं गेलें होतें. आज संध्याकाळीं बरेंच धुकें पडलें होतें."

सोमवार ता० ९ मे सन १८८७. "आह्मी गाडी करून बाहेर गेलों होतों. गायकवाडाच्या बायकोच्या बुकांत मिस् हर्फर्डनीं आपलें व माझें नांव घातलें. मग तेथून आह्मी चार पाइंट पाहिले:—Bombay Point, Carnac Point, Falkland Point and Ludwick Point. देखावा फारच बघण्यासारखा होता. मध्यें खोल दऱ्या व पलीकडे उंच उंच पर्वत. जिकडे तिकडे अगदीं शांत. मधून मधून पांखरांचे गोड शब्द ऐकूं येत तेवढेच कायते. जितकी लांब नजर पोंचेल तितक्या अवकाशांत डोंगरांवाचून दुसरें कांहीं नाहीं."

ता० १० मंगळवार सन १८८७. "आज सकाळीं आह्मी गव्हर्नरच्या बंगल्याकडे गेलों होतों. लेडी रेच्या बुकांत मिस् हर्फर्डनें आपलें नांव घातलें. मी नूलकरांच्या येथें गेलें होतें."

बुधवार ता० ११ सन १८८७. "आह्मी सकाळीं धोब्याच्या धबधब्याकडे फिरायला गेलों होतों. रस्त्यावर पाटी लाविली होती. त्या रस्त्यानें, आतां धबधबा येईल, मग धबधबा येईल असें करतां करतां आह्मीं सगळा डोंगर उतरून खालीं गेलों. फार लांब असेल ह्मणून दोन तीनदां आम्ही मागें फिरण्याच्या बेतांत होतों. पण शेवटीं एकदांच्या धबधब्यापाशीं आलों. पाणी फार मोठें नव्हतें तरी डोंगराच्या दऱ्यांतून खळखळ आवाज करीत तें वाहत असतांना पाहण्याची एक मोठी मजा आहे. आम्ही संध्याकाळीं शर्यतीच्या जागेकडे गेलों. तेथें शर्यती व्हावयाच्या होत्या ह्मणून पुष्कळ साहेब लोक व पार्शी लोक जमले होते. मिरजकर आले होते. आम्ही एक साधी व एक ताटीची अशा दोन शर्यती पाहिल्या व माघारी आलों. वाटेनें कोणीएक गृहस्थ भेटला त्यानें मिस् हर्फर्डला किती दिवस राहणार वगैरे विचारलें. हे माधवराव बर्वे असावे असें मला वाटतें."

ता० १२ गुरुवार मे सन १८८७. "आज सकाळीं आह्मी बाहेर जावयास निघालों तेव्हां वाटेंत शंकररावांची गाडी भेटली. ते व आह्मी बरोबर फिरायला गेलों. येतांना मी व कृष्णी गाडींत बसलों. मी नूलकरांकडे गेलें होतें. संध्याकाळीं फिरा-

यला गेलों तेव्हां मिरजकरांचा बंगला दुरून पाहिला.'

ता० १३ शुक्रवार मे सन १८८७. "आह्मी दोन तांगे करून आर्थर सीट, एल्फिन्स्टन पाइंट व महाबळेश्वर पहायला गेलों होतों. आर्थर सीट व एल्फिन्स्टन पाइंट येथून सहा मैल आहे. आह्मी आधीं आर्थर सीटवर गेलों. हा डोंगर फार उंच असून येथील देखावा अतिशय विस्तृत व मनोरम आहे. डोंगरावर किर्र झाडींचें मोठें अरण्य आहे त्याला ब्रह्मारण्य ह्मणतात. येथें ब्रह्मदेवानें यज्ञ केला, व येथेंच सावित्री व गायत्री या नद्यांचे उगम आहेत. या रानांत एक मोठा वाघ आहे असें सांगतात, व मोठमोठ्या झाडांवर वाघानें आपल्या नखांनीं ओरबाडल्याच्या अगदीं ताज्या खुणा आह्मीं पाहिल्या. येतांना आह्मीं महाबळेश्वरीं उतरलों. येथें कृष्णा नदीचा उगम झाला. मोठालीं पांच भोंकें बांधून काढलेली आहेत व त्यांतून थोडथोडें पाणी झुळ झुळ बाहेर येतें. हे कृष्णा, वेण्या, कोयना, सावित्री व गायत्री अशा पांच नद्यांचे उगम आहेत असें ह्मणतात. हे सगळे प्रवाह एके ठिकाणीं बांधून आणून एका गायमुखांतून मोठ्या कुंडांत सोडिले आहेत. येथें लोक स्नानें करितात. * * समोर महाबळेश्वराचें देऊळ आहे. महादेव स्वयंभू आहे. त्याच्या सभोंवती पांच ठिकाणीं जमिनींतून पाणी

निघत आहे. हा त्या वर सांगितलेल्या नद्यांचा खरा उगम आहे असें सांगतात. हें सर्व पाहून आह्मी पांच वाजतां घरीं आलों."

ता० १५ रविवार मे सन १८८७ "मी नूलकरांच्या घरीं गेलें होतें. त्यांच्या बरोबर गाडींत फिरावयास गेलें होतें. केट पाईट पाहिला."

मंगळवार ता० १७ मे सन १८८७. "मला—चें पत्र आलें, त्यावरून तिला माझें पत्र अझून पोंचलें नाहीं. आई नगरास गेली आहे असें तिनें लिहिलें आहे."

बुधवार ता० १८ मे सन १८८७. "मला धारूताईचें पत्र आलें, त्यांत फार दिवस येथें राहूं नये असें लिहिलें आहे. मला त्यांनीं २५ रुपयांची मनीआर्डर पाठविली."

गुरुवार ता० १९ मे सन १८८७. "मला—चें पत्र आलें, त्यांत तिनें मला लवकर निघून ये ह्मणून लिहिलें होतें. तुला मी हवी असेन तर ये. येथें काय चाललें आहे तें तूं आलीस म्हणजे मी तुला सांगेन असें तिनें लिहिलें होतें, ह्मणून मला फारच काळजी लागली.—कोणत्या तरी संकटांत आहे असें मला खास वाटतें. त्याखेरीज ती असें लिहिणार नाहीं. मी तिला वचन दिलें आहे कीं कोणत्याही संकटाच्या वेळीं माझ्यानें होईल ति-

तर्की मदत मीं तुला करीन व आतां तर मी इकडे आलें आहें. तिकडे तिला काय होत आहे याची मला कल्पना होत नाहीं. काय असेल तें असो. पण आतां पुण्यास जावें असें मला वाटतें. काल घारूताईनींही ये ह्मणून मला लिहिलें होतें. माझ्या मनांत एक अशी कल्पना आली कीं—च्या भावांच्या मनांत कांहीं तरी ( लोक रीतीप्रमाणें ) भलतें तर करावयाचें नसेलना ! ही कल्पना मनांत येतांच, तसें झालें असतां पुढें स्थिति काय बरें होईल? मग मी तिचें शांतवन कोणत्या रीतीनें करूं? ती गोष्ट न होऊं देण्याचें तर सामर्थ्य माझ्या अंगीं नाहीं. ह्या विचारांनीं माझें मन सर्व दिवसभर व्यापून टाकिलें आहे. रात्रींही नीट झोंप आली नाहीं. मी मिस् हर्फर्डला सांगितलें कीं पुण्याहून मला ये ह्मणून पत्र आलें आहे तर मी आतां जाणार. ती ह्मणाली मला एकटी धाडणें बरें दिसत नाहीं. तर मी आपली गाडी मागवतें, व आपण दोघी बरोबरच जाऊं. तिनें कंत्राक्टराला पत्र पाठविलें. "

आवडीनें आपल्या मैत्रिणीस जें वचन दिलें होतें तें आमच्या वाचकांस स्मरत असेलच. " कोणताही प्रसंग तुजवर आला तरी मी तुला मदत करीन " असें तिनें वचन दिलें होतें व वरील उताऱ्यांत तर असा प्रसंग येऊन पोंचला असा ध्वनितार्थ

होता. या मैत्रिणीवर तिचें अत्यंत प्रेम होतें व तिच्या या हांकेस न धांवणें ह्मणजे आपल्या स्नेह भावास व त्रीदास विसरणेंच होय असें आवडलि वाटलें व ती लागलीच महाबळेश्वराहून परत येण्यास सिद्ध झाली; यावरून तिचें ह्या मैत्रिणीवरचें खरें प्रेम दिसून येईल.

ह्या वरील उताऱ्यांत आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. स्नेहभावानें आपल्या मैत्रिणीस मदत करण्याच्या हेतूनें आवडी तर जाण्यास उताबीळ झाली, परंतु तिची मुख्य अध्यापिका मिस् हर्फर्ड आपल्या कर्तव्यास विसरली नाहीं. ह्या मुलीला एकटी जाऊं देणें ह्मणजे आपली जबाबदारी विसरणें होय, असें वाटून मिस् हर्फर्ड आपण स्वतःच तिजबरोबर निघण्यास सिद्ध झाली. अशी अध्यापिका व अशी शिष्या या दोघी धन्य होत! वरील उताऱ्यांत ज्या जनरीतीचा उल्लेख केला आहे ती जनरीत म्हणजे केशवपनाची चाल होय. ही चाल स्त्रियांना अगदीं आवडत नाहीं हें उघडच आहे.

शुक्रवार ता० २० मे सन १८८७. " आह्मी पंडितांच्या घरीं गेलों होतों. त्यांच्या बरोबर मुंबई पाइंटकडे फिरायला गेलों. "

शनवार ता० २१ मे सन १८८७. " गाडी देतों ह्मणून पत्र आलें सोमवारीं निघण्याचा बेत झाला."

रविवार ता० २२ मे सन १८८७. " मी मिसेस् पंडितबरोबर सिड्नी पाइंटकडे फिरायला गेलें होतें."

सोमवार ता० २३ मे सन १८८७. " आह्मी सकाळीं ६ वाजतां निघालों त्या वाठारच्या स्टेशना-वर १ वाजतां आलों. तेथून आगगाडींतून संध्या-काळीं पुण्यास आलों. "

मंगळवार ता० २४ मे सन १८८७. " मला असें समजलें कीं—काल रात्रीं येथून निघून साता-ऱ्यास गेलीं. तेथें त्यांचा कोणी देव आहे. त्याच्या पाया पडण्यास गेलीं आहेत. पांच सहा दिवसांनीं येतील. मला थोडें वाईट वाटलें. "

गुरुवार ता० २६ मे सन १८८७. " आज दु-पारीं बळवंतराव बराच वेळ माझ्याशीं बोलत बसले होते. त्यांनीं मला असें विचारलें कीं " मी लग्न करावें किंवा नाहीं ? " मी म्हटलें " करावें. " नाहीं ह्मणून मी कशाला ह्मणूं ? ते म्हणाले केले " तर पुन-र्विवाह करावा किंवा साधेंच लग्न करावें." मी सांगितलें " चांगल्या घराण्यांतली एखादी मुलगी तुमच्याशीं लग्न करण्यास तयार असेल तर खुशाल पुनर्विवाह करावा; मात्र तिजविषयीं तुह्मांस चांगली माहिती असली पाहिजे. असें नसेल तर लग्न लहान मुली-शीं करावें हें उत्तम. "

ता० २८ शनवार मे सन १८८७.—" आली

निषंत आहे. हा त्या वर सांगितलेल्या नद्यांचा खरा उगम आहे असें सांगतात. हें सर्व पाहून आह्मी पांच वाजतां घरीं आलों."

ता० १५ रविवार मे सन १८८७ "मी नूलकरांच्या घरीं गेलें होतें. त्यांच्या बरोबर गाडींत फिरावयास गेलें होतें. केट पाईट पाहिला."

मंगळवार ता० १७ मे सन १८८७. "मला-चें पत्र आलें, त्यावरून तिला माझें पत्र अझून पोंचलें नाहीं. आई नगरास गेली आहे असें तिनें लिहिलें आहे."

बुधवार ता० १८ मे सन १८८७. "मला घारूताईचें पत्र आलें, त्यांत फार दिवस येथें राहूं नये असें लिहिलें आहे. मला त्यांनीं २५ रुपयांची मनीआर्डर पाठविली."

गुरुवार ता० १९ मे सन १८८७. "मला-चें पत्र आलें, त्यांत तिनें मला लवकर निघून ये ह्मणून लिहिलें होतें. तुला मी हवी असेन तर ये. येथें काय चाललें आहे तें तूं आलीस म्हणजे मी तुला सांगेन असें तिनें लिहिलें होतें, ह्मणून मला फारच काळजी लागली.—कोणत्या तरी संकटांत आहे असें मला खास वाटतें. त्याखेरीज ती असें लिहिणार नाहीं. मी तिला वचन दिलें आहे कीं कोणत्याही संकटाच्या वेळीं माझ्यानें होईल ति-

तर्की मदत मीं तुला करीन व आतां तर मी इकडे आलें आहें. तिकडे तिला काय होत आहे याची मला कल्पना होत नाहीं. काय असेल तें असो. पण आतां पुण्यास जावें असें मला वाटतें. काल घारूताईनींही ये ह्मणून मला लिहिलें होतें. माझ्या मनांत एक अशी कल्पना आली कीं—च्या भावांच्या मनांत कांहीं तरी ( लोक रीतीप्रमाणें ) भलतें तर करावयाचें नसेलना ! ही कल्पना मनांत येतांच, तसें झालें असतां पुढें स्थिति काय बरें होईल ? मग मी तिचें शांतवन कोणत्या रीतीनें करूं ? ती गोष्ट न होऊं देण्याचें तर सामर्थ्य माझ्या अंगीं नाहीं. ह्या विचारांनीं माझें मन सर्व दिवसभर व्यापून टाकिलें आहे. रात्रींही नीट झोंप आली नाहीं. मी मिस् हर्फर्डला सांगितलें कीं पुण्याहून मला ये ह्मणून पत्र आलें आहे तर मी आतां जाणार. ती ह्मगाली मला एकटी धाडणें बरें दिसत नाहीं. तर मी आपली गाडी मागवतें, व आपण दोघी बरोबरच जाऊं. तिनें कंत्राक्टराला पत्र पाठविलें. "

आवडीनें आपल्या मैत्रिणीस जें वचन दिलें होतें तें आमच्या वाचकांस स्मरत असेलच. " कोणताही प्रसंग तुजवर आला तरी मी तुला मदत करीन " असें तिनें वचन दिलें होतें व वरील उताऱ्यांत तर असा प्रसंग येऊन पोंचला असा ध्वनितार्थ

येथें दुपारीं तीन वाजतां आली. मी तिला लवकर निघून ये ह्मणून लिहिण्याचें काय कारण ह्मणून विचारिलें. तुझ्या प्रकृतीला नीट नव्हतें व माईनें मला सांगितलें कीं—तूं तरी पत्र लिही कीं लवकर निघून ये ह्मणून—म्हणून मी पत्र लिहिलें. दुसरें कांहीं नाहीं. हें ऐकून मला बरें वाटलें. माझ्या मनांत व्यर्थ जी भलतीच कल्पना आली होती ती खोटी झाली. मग ती व मी बराच वेळ बोलत बसलों होतों."

ता० ३० सोमवार सन १८८७. "मी—च्या घरीं गेलें होतें. तिनें स्वतःस एक नवीन खोली केली आहे. त्या खोलींत लावण्याकरितां एक मोठी तसबीर तिला द्यावी असें माझ्या मनांत आहे. कृपा आली होती."

ता० ३१ मंगळवार मे सन १८८७. "आम्ही भवानी पेठेंतून पुढें फिरायला गेलों होतों. वाटेंत मिस् भोरचे घर आह्माला लागलें. म्हणून आह्मी आंत गेलों. मी कांहीं वेळ बोलत बसलें होतें. रखमाबाईविषयीं बोलणें निघालें होतें. ती मेरीची फार मैत्रीण आहे, व तिला इंग्रजी फारच चांगलें येतें असें ती सांगत होती."

गुरुवार ता० २ जून सन १८८७.—"आली होती. मी व ती पुष्कळ वेळ मागच्या माडींत बोलत बसलों होतों. ती ह्मणत होती "मला रात्रीं

मुळींच झोंप येत नाहीं. नाना प्रकारचे विचार मनांत येऊन आतां आपलें पुढें कसें होईल असें वाटतें. आपणास आपलें ह्मणण्यास कोणीच नाहीं." मी ह्मटलें" जसें तुला वाटतें कीं आपण एकटी तसें मलाही वाटत नाहीं काय? आपण जें पूर्वी दिलें नाहीं तें आपणास कोठून प्राप्त होणार? आहे ह्याच स्थितींत आनंद मानून रहावें हें बरें." ती ह्मणाली "अग आनंद मानण्यास एक तिळभर तरी अवकाश देवानें ठेवावयाचा होता? आई गेली, बाबा गेले, प्रियपतीही गेले. मला कोणीच राहिलें नाहीं. माझे भाऊ, ज्यांच्यावर माझी सर्व आशा, ते मला शत्रू- सारखे भासूं लागले. त्यांच्या कठोर शब्दरूपी बा- णांनीं माझ्या हृदयावर किती खोल घरें पडतात ह्मणून सांगू? माझ्या मनांत जी जी गोष्ट करावयाची वाटेल ती ती त्यांस आवडत नाहीं. कांहीं तरी थोडें बहुत शिकेन म्हटलें, माझ्या मनाला तरी त्यापासून करमणूक होईल, तर बायकांस शिकणें उपयोगी नाहीं असें सांगतात. कांहीं कशिद्याचें काम करीन ह्मटलें तर उगीच पैसे खर्च करण्यांत काय अर्थ आहे असें ह्म- णतात. जो उठणार तो बोलणार, उत्तर देतां कामा नये, नाहीं तर लगेच दांडगी होते. तेव्हां आनंद मानण्यास जागा तरी कोठें राहिली?" मी तिचें पुष्कळ समाधान केलें व मला कोणी नाहीं असें तूं

समजूं नको ह्मणून सांगितलें. "तुला मी तर आहेना असें मी तिला सांगितलें."

ह्या तारखेच्या पुढें आणखीं आठ दिवस रोजनिशी लिहिलेली आहे, पण ह्या टिपणांत कांहीं विशेष सांगण्यासारखी गोष्ट नाहीं म्हणून त्या तारखा आह्मी मुळींच गाळून टाकिल्या आहेत. ह्यानंतर तिनें रोजनिशी मुळींच लिहिली नाहीं किंवा लिहून ठेविली असून ती सांपडत नाहीं हें कांहीं निश्चयानें सांगतां येत नाहीं. परंतु बहुधा रोजनिशी लिहिण्याचा तिनें आपला क्रम बंदच केला असावा असा आमचा तर्क आहे. तिची प्रकृति अगोदरच क्षीण झालेली होती. प्रकृतीला कांहीं आराम पडावा याच उद्देशानें ती महाबळेश्वरास गेली होती, तथापि तेथें जाऊन देखील जो गुण वाटावा तो वाटला नाहीं. शिवाय ही रोजनिशी कोणाच्या हातीं पडेल ही भीति नेहमीं तिच्या मनांत जागृत होतीच. या दोन कारणांमुळें तिनें आपला नित्यक्रम टाळला असावा असें वाटतें. असो. यानंतरची तिच्या आयुष्याच्या दीड वर्षाची हकीकत तिच्या पत्रावरूनच देणें भाग आहे.

तारीख १६ जून सन १८८७ रोजीं तिनें आपल्या एका मैत्रिणीला पत्र लिहिलें. त्या पत्रांत महाबळेश्वराचें वर्णन थोडक्यांत केलें आहे. तें वाचकांस येथें सादर करतों.

My dear—Bai,

I have not had the pleasure of hearing from you for a long time. I heard from your brother that you had been to Singhur with your husband. I shall be very glad if you will kindly tell me something about the place in your letter. I am going to tell you how I passed my holidays. We had a long vacation from the 25th April to the 10th of June. I did [redacted] do much work during the holidays as I had not been feeling well before they began. I did not study very hard, only revised my old lessons. I could not learn anything new, because my brother was at Nagar and the master went home on leave.

My mother sent me to Mahabaleshwar with Miss Hurford, our Lady Superintendent. We had a very nice fortnight there. Mahabaleshwar is a very pretty place. The air is so delightful and the water so invigorating. It is about 74 miles South-West of Poona on the very top of the Western Ghauts. There are two parts of Mahabaleshwar; old Mahabaleshwar or Mahabaleshwar village, where there is the celebrated temple of Siva, and the source of the river Krishna; and new Mahabaleshwar or Nahar ( Malcolm Peith ) where people stay. The height of this place is about 4500 feet. We went up in a Phaeton and had a nice journey by moonlight. We used to take long walks there. The hill is quite red and the roads are very good and quite overshadowed with trees. The scenery from the different points is really very beautiful. One can see nothing but chains

of high mountains and deep valleys. Some hills look quite green with trees, others blue and white with the sun shining on them. The views are especially lovely at sun-rise and sun-set. I had never seen such beautiful scenery before. We one day went to see Arthur's seat and Elphenstone point an[illegible] the scenery there was perfectly charming. It was th[illegible] best of all. One can see the sea from there they [illegible] we did not notice it as we did not know, it coul[illegible] seen, till afterwards. The rivers Krishna a[illegible]ennyá look like fine silvery ribbon running through the valleys, from these high peaks. Many rich people go to Mahabaleshwar in summer especially Europeans. I saw the God Mahabaleshwar and Atibaleshwar and the source of the river Krishna. I wanted to bathe in the river but Miss Hurford would not let me, because she said the water was very cold and I would catch cold.

We came back to Poona on the 23rd of May, by Railway. It was not a very pleasant journey as we came down by day and it was very hot. I send my love to all your sisters-in-law. How is your little son Madhao? He must be grown now. Perhaps he won't know me when you come to Poona. With my love to you.

I remain,
Your loving friend
AVADA.

शाळेंतील अभ्यास करून राहिलेल्या वेळांत आ-
वडीला वर्तमानपत्रें वाचण्याची हौस होती. त्यांत

विशेषतः स्त्रियांच्या संबंधानें ज्या ज्या विषयांवर वर्तमानपत्रांतून चर्चा चालत असे त्या त्या विषयाच्या संबंधानें होईल तितकी माहिती मिळवून मोठ्या विचारानें आपलें स्वतःचें मत बनवावें अशी तिला संवय होती. केवळ वर्तमानपत्रांच्याच नजरेनें कोणत्याही विषयाचें अवलोकन करून त्यांवरच सर्वस्वीं अवलंबून राहणें हें तिच्या स्वतंत्र मनास आवडत नसे. शिवाय तिची न्यायबुद्धि इतकी तीव्र होती कीं कित्येक प्रसंगीं स्त्रियांची सुधारणा करूं इच्छिणाऱ्या लोकांच्या विचारा विरुद्धही ती आपलें मत खडखडितपणें सांगत असे. सारांश, कोणत्याही गोष्टीवर विचार करतांना ती परस्वाधीन होत नसे. तिच्या अंगच्या ह्या गुणाचें उत्तम उदाहरण तिच्या एका पत्रांत आहे. मे० वेडरबर्न साहेबांचे मुलीकरितां तिनें एक शाल तयार केली होती व ते साहेब विलायतेस गेले तेव्हां तिनें ती त्यांस अर्पण केली हें आमच्या वाचकांस स्मरत असेलच. वेडरबर्न साहेब फार उदार अंतःकरणाचे असून या देशाचे मोठे हितचिंतक आहेत ही गोष्ट अबालवृद्धास ठाऊक आहेच. पुणें येथें मुलींचें हायस्कूल स्थापन करण्यांत मुख्य यशाचा वाटा ह्यांचाच होय, असें ही म्हणण्यास हरकत नाहीं, यामुळें आवडीचे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



मनांत ह्या साहेबांविषयीं फार पूज्यभक्ति होती. शिवाय, वेडर्बर्न साहेबांची नेटिव्ह लोकांशीं अगदीं स्नेह्यासारखी वागणूक होती व नेटिव्ह लोकांपैकीं जे लोक त्यांच्या विशेष परिचयाचे होते त्यांच्या घरच्या इतर मनुष्याविषयीं ही ते फार कळवळा वाळगीत असत. आवडीच्या वैधव्याविषयीं त्याला फार वाईट वाटे व विलायतेला निघून गेल्यावर ही ते प्रत्येक पत्रांत हिजविषयीं फार चौकशी करीत असत. वेडर्बर्न साहेबांचें कुटुंब आवडीकरितां मुलींच्या उपयोगी असें एक वर्तमानपत्र पाठवित असत व त्यांची एकमेकींस पत्रें येत जात असत. त्यांपैकीं एक पत्र आह्मी पुढें देतों, ह्या पत्रांत रखमाबाईच्या संबंधानें आपला अभिप्राय आवडीनें दिला आहे. ह्या रखमाबाई कोण हें आमच्या वाचकांस सांगावयास नको. हा आवडीचा अभिप्राय कोणास आवडो किंवा न आवडो. तिनें तो अगदीं निष्प्रांजळपणें दिला आहे ही गोष्ट कोणीही कबूल करील. ह्या पत्रांत तिनें एक गोष्ट मोटी मुद्याची सांगितली आहे. ती ही कीं सुधारणेच्या कामांत कुटुंबांतील स्त्रियांची अनुकूलता पाहिजे. ही अनुकूलता नसेल तर घरांत शांति राहत नाहीं. आमच्या सर्व सुधारणेच्या कामाला मुख्य अडचण हीच आहे. बाहेर चार मंडळींत किंवा सभेंत बोलण्याचा प्रसंग आला म्हणजे हव्या तितक्या बढाया

मारावयाच्या, पण घरीं आल्यावर मग निमूट बसावयाचें, अशी स्थिति असण्याचें कारण हेंच कीं क्षुल्लक सुधारणेसही स्त्रियांची अनुकूलता मिळत नाहीं व ही अनुकूलता केवळ ज्ञानापासूनच प्राप्त होणारी आहे. तेव्हां स्त्रियांचें शिक्षण हा सर्व सुधारणेचा पाया आहे व या पायास धक्का बसला असतां पुढची इमारत बांधण्यास अडचण होईल असा आवडीच्या पत्राचा भावार्थ आहे.

Poona, 7th July 1887.

To

Lady Wedderburn

Dear Madam,

I thank you very much for your kind letter and the newspaper you are sending for me. It is really kind of you to think of me. I was very glad to hear that you liked the sash I sent for your little Dorothy. It was a great pleasure to work it.

You must have read about our Rakhmabai in the papers. The general opinion among our women is against her. Among us, the idea of a woman refusing to live with her husband goes sorely against the train; and it is quite natural, as all our women are taught to believe that their sole duty is to obey their husbands and never to go against their wishes. The men, of course, do not like women to be equal to them and so they are opposed to her. My private opinion is certainly not in her favour. She says she will even go

to prison for the good of the women of India. But I am sorry to say that the way she has adopted is quite a mistaken one. Examples of this kind will only serve to retard our progress. Besides, her husband, as I read in the papers, is not what she calls him. He is not a coolie; he gets 40 Rs. a month; he is not consumptive; and he is quite as well educated as herself. On the whole it is such a drawback to female education. Now if we ask any one why they don't send their girls to school, they answer at once " Well, we don't want any more Rakhmabais for the presnt. " It is quite impossible to make our women understand the advantages and disadvantages of such things as infant mrriages, widow-remarriages &c. for the present, because they are so ignorant that they have no idea of the world outside there own houses. So the only thing we can do now is to make female education popular and this can never be done by giving up our old customs whether they be good or bad. Because, even if one person knows that a thing is right, he cannot do it if all the members of his family think otherwise, and if he did it, there would be no peace in his family. So he must wait patiently till he has made them understand why it is right to do that thing. So Rakhmabai who thinks herself so highly educated ( though she publishes articles written by another in her own name )and who is the head of the Arya Mahila Samaj in Bombay will never have the honour of having set a good example to her fellow countrywomen.

I hope you are quite well. I send my love to your Dorothy and thank her for her kind letter.

Believe me
Dear Madam,
to remain
Yours Sincerely
AVADI Bhide.

आवडीचें प्रत्येक पत्र येथें दिलें असतां कदाचित् वाचकांस कंटाळा येईल म्हणून आतां त्यांपैकीं कांहीं निवडक पत्रें उतरून घेऊन हें चरित्र संपवितों. हीं पत्रें सुद्धां आह्मीं दिलीं नसतीं, परंतु ह्या अभागी मुलीच्या अंगीं जे अलौकिक गुण ईश्वरानें ठेवले होते त्या गुणांचीं सूचक हीं पत्रें आहेत. ह्या पत्रांतून तिचा सर्व अंतर्याम आपणांस दिसतो व आपल्यास तिची खरी योग्यता कळते.

आपले माजी व्हाइसराय लार्ड डफरिन यांच्या पत्नीनें एक फंड जमा केला, त्याचा उद्देश काय होता हें बहुतेक वाचकांस माहीत आहेच. ह्या विषयावर एक पत्र आवडीनें लिहिलेलें आह्मांस सांपडलें आहे तें पत्र येथें देतों. या पत्रांत लिहिल्याप्रमाणें रक्कम पाठविल्याविषयीं कांहीं प्रत्यंतर सांपडत नाहीं, व ती रक्कम पाठविली असावी असेंही वाटत नाहीं. तथापि या पत्रांत ग्रहण करण्यासारखा एक मुद्दा आहे, तो हा कीं ह्या डफरिन फंडाची फार अवश्यकता होती असें आवडाबाईचें मत होतें.

Poona 7th September 1887.

To

LADY DUFFERIN,

DEAR MADAM,

I am very glad to send a cheque for Rs. 200 towards the fund which you have raised for establishing a college for Lady Doctors in India. It is very kind of you to think of us. It is a proof of the great interest you take in native ladies. It would be a very great blessing to have Lady Doctors, because women are too shy to tell of their diseases to men, and the women of this country owing to their seclusion and manner of living, have a great aversion to seeing a Doctor or to speaking of their diseases. For this reason so many of them die or suffer intense agony, for want of proper care and attendance. So it would be a great boon to have Lady Doctors among us and we are all very thankful to you for your efforts to supply them.

I remain &c. &c.

आवडीच्या शाळेंतील मुली आपआपसांत एक ल्हानशी सभा करीत असत व त्या सभेंत कोणी निबंध लिहून वाचीत; कोणी भाषांतराचे चुटके वाचून जमलेल्या आपल्या मैत्रिणींचें मनोरंजन करीत. अशा एका प्रसंगाचें तिनें आपल्या एका इंग्रजी पत्रांत वर्णन केलें आहे. तें पत्र वाचलें म्हणजे ह्या मुलींचे अंगांत विद्येचें खरें स्वरूप कसें

बिंबत चाललें होतें हें आमच्या वाचकांस कळेल. तें पत्र पुढें लिहिल्याप्रमाणें आहे.

Sadashiv Peit,

8th September, 1887.

My dear Miss Cornelia,

I was very sorry you could not come to the meeting last Thursday. There were few ladies present, because the invitations did not reach them in proper time.

My sister Mrs. Limaye read an essay on Eloquence. It took about three quarters of an hour. Your mother and sister must have told you whether they liked it or not ; so I need not say anything about it. But I can tell you my sister had a deal of trouble to write it. She also translated the second canto of Raghu which was written in Sanskrit by our great dramatic poet "Kalidas," who is called the Shakespere of India. This translation was read at the meeting by Ramàbai, my brother's wife. I was going to read some portion out of Veni-Sambara ( the plaiting of the hair) as I told you when you came to our house on Saturday ; but there was no time, and so I could not read it. This Veni-Sambàra is also a translation of a beautiful Sanskrit drama written by a renowned ancient poet. The story is taken from our great poem, the Mahabbarata The story is that the Kurus or sons of Dhritarashtra, having beaten the Pandavas in a game of dice, one of them Duhshasana went to their house and finding their wife Draupadi alone, said to

her that he had beaten her husbands in a game, and that she was to come to his house and serve his wife as a slave ( दासी ). When she refused, he unjustly dragged her out seizing hold of her hair. The Pandavas were very angry at this insolent behaviour and Bhimasena the second brother made a promise that he would kill Duhshasana in battle, cover his hands with his blood and then come and plait Draupadi's hair with his own hands, which was ruffled by the wicked fellow. Till then she was not to tie up her hair. From this the drama is called "Venisamhara."

I have read part of it in Sanskrit and it is so very interesting. The Marathi translation also is very good indeed. You must read it. I would lend you the book very gladly if you would like to read it. You must have read so many nice English books, but don't you think you ought to read some in your own language? Of course there are very few nice books in Marathi, but I think you ought to write some pretty books in Marathi and increase the number, as you are so learned. It would be a great boon to have pretty books in our own dear language and we shall be very thankful to you for it. You must try and come to our Ladies' meeting next time.

With love to you,
Ever yours very sincerely,
Avadi Bhide.

आवडाबाईची स्वदेशभाषेवर किती प्रीति होती हें वरील पत्रावरून उघड आहे. स्वभाषेंत नवीं नवीं पुस्तकें व्हावींत अशी तिची इच्छा होती व ह्या इच्छेचें अभिनंदन कोणीही करील. आपल्या देशांत हजारों लोक विद्वान् झाले आहेत, परंतु ह्यांनीं परभाषेच्या द्वारें संपादिलेल्या ज्ञानाचा एक सहस्रांशसुद्धां महाराष्ट्र भाषेच्या द्वारें स्वदेशबांधवांस प्राप्त झाला नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे व आवडाबाईचेंही असेंच मत होतें.

ह्या स्त्रियांच्या सभेविषयीं तिच्या आणखी एका पत्रांत थोडी माहिती आहे. तें पत्र वाचलें ह्मणजे ह्या सभेंत कोणकोणत्या विषयाचे संबंधानें चर्चा होत असे हें आमच्या वाचकांस सहज समजेल. ह्या पत्रावर तारिख वगैरे कांहीं नाहीं यामुळें ही सभा कोणत्या दिवशीं भरली होती हें समजण्यास मार्ग नाहीं.

There was a ladies' meeting yesterday in our school in the evening. There were not many ladies present ...... The subject of the essay which my sister read at the meeting was "the enjoyment of wealth." The essay began with a description of wealth as it was thought of in ancient times and as it is thought of now. Several quotations from ancient Sanskrit authors were translated in which it was concluded that

wealth was the source of all troubles At first sight, the quotations would appear to be simply a tirade against riches ; but if one were to look a little deeper into the subject, he would at once see that it was only against misused wealth. The second part of the essay contained a description of people's ideas about the enjoyment of riches. Misers only take pleasure in keeping their wealth and looking at it. They can't bear the idea of using it in any way. Some people take pleasure in spending money in sensual pleasures, which, when indulged in too much, lead to destruction, and others again think that the real enjoyment of riches is to sit still, have everything done for them, ornament their bodies and spend their time in idleness like Sardars, Jahagirdars and their wives at the present day. In the third and last part of the essay it was stated that the above mentioned things were not to be considered the real enjoyment of wealth for they produce bad results. The essay was concluded with the statement that being charitable, spending money for right and good causes and in helping our fellow-creatures was the only real enjoyment of wealth.

पैशाचा विनियोग कसा करावा हें खरोखरच आपल्या लोकांस अजून चांगलेंसें समजत नाहीं व हें अज्ञान स्त्रियांत तर फारच आढळतें. कित्येक प्रसंगीं मुलांचीं आईबापेंच मुलांना आळसाचें वळण लावून देतात व ऐषआरामांत व ख्यालीखुशालींतच

आयुष्य घालविण्याकरितां आपल्यास ईश्वरानें श्रीमंती दिली आहे अशीं दुष्ट मतें मुलांना लहानपणापासूनच शिकवून ठेवतात. मुलांचें शिक्षण लहानपणीं आईचे स्वाधीन विशेषेंकरून असतें व तें तसें असावें हेंही योग्यच आहे; परंतु त्या आईचे मनावर विद्येचा संस्कार झाला असला पाहिजे; नाहीं तर आईच्या दुष्ट ग्रहांचें संक्रमण मुलाचे अंतःकरणांत होतें व आईनें वाईट कल्पना मनांत भरवून दिल्या म्हणजे भावी शिक्षणानेंही ते ग्रह दूर होत नाहींत. याकरितां आयांचे मनांत अशा सुविचारांचा प्रवेश व्हावा ही मोठी अभिनंदनीय गोष्ट आहे. ही स्त्रियांची सभा अशीच चालू राहो व त्या सभेंतील वादविवादानें त्यांचें ज्ञान वाढो अशी आमची फार इच्छा आहे.

पंडिता रमाबाईनीं आलीकडे " शारदासदन " या नांवाची एक स्त्रियांची शाळा स्थापन केली आहे हें आमच्या वाचकांस माहीत आहेच. पंडिताबाई अमेरिकेंतून परत येण्यापूर्वींच त्यांचा असा संकेत ठरलेला होता व ही गोष्ट आवडाबाईचे कानीं आली होती. या संबंधानें तिनें आपल्या एका मैत्रिणीस पत्र लिहिलें होतें. तें वाचण्यासारखें आहे म्हणून तें आतां आम्ही येथें देतों.

Poona, 17th Nov. 1887.

My dear Bai,

I received your letter of the 12th inst. and was glad to know that you read a great many Marathi papers. You must have read about the school for child widows which Pandita Ramabai who is now in America, is going to establish in Southern India. I think it is a very noble plan and will be of great benefit to those who will avail themselves of it. Ramabai, no doubt, will have to encounter much opposition and thousands of obstacles but I hope she will meet them bravely and will be successful. I hear that the school is going to be established in Poona. If so, the Poona papers will have something new to write about. I should think they are now pretty nearly tired of writing about the "Female High School" as they call it. Please give my love to all your sisters.

With love

Yours affeectionately.

आमच्या वाचकांस या पत्रांचा आणि कदाचित् या कथेचा (भाकड नव्हे) ही कंटाळा असेल ह्मणून आह्मी हें आख्यान आतां आटपतें घेतों; परंतु तसें करण्यापूर्वीं आणखी दोन तीन पत्रें सादर केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं; व हीं पत्रें सादर करणें फार महत्वाचें आहे. स्त्रीशिक्षणाचे संबंधानें जुन्या मताचे लोकांस जी फार मोठी भीति वाटते ती त्यांच्या सदाचरणाविषयीं. ह्या मताचे जे लोक आहेत

त्यांचा असा ग्रह बनला आहे कीं स्त्रियांना विद्या प्राप्त झाली ह्मणजे त्या आपल्या ज्ञानाचा दुरुपयोग करतील, आपल्या पतीची अवहेलना करतील व एकंदरीनें त्यांचें आचरण बिघडेल; परंतु सुविद्या प्राप्त झाली ह्मणजे त्यांच्या चित्ताची शुद्धि होऊन सतीत्व, वात्सल्य आदिकरून त्यांचे अमोल गुण विकास पावतील हें लोकांचे ध्यानांत येत नाहीं. स्त्रीशिक्षणा र प्रायः हा आरोप लोकांचा आहे. त्यांतून हा पुण्यांतील मुलींच्या हायस्कुलाची अनन्वित टवाळी करण्यांत कित्येकांस फार मोठें भूषण वाटतें व कित्येक तर असे वृथा आरोप करण्यानें आपण मोठी देशसेवा करीत अहों असें समजतात. हायस्कुलाची निंदा होतेंच आहे पण त्यांत ही प्रस्तुत चरित्राच्या नायिकेवर जो भडिमार होत होता त्यास कांहीं मर्यादाच नव्हती. हा सर्व छळ मुकाट्यानें सोसून ईश्वरावर हवाला देऊन स्वकार्य करणारी तिची तीच एक बहादर होऊन गेली. ती तर हा लोक सोडून गेली आणि तिजविषयीं अभद्र शब्द बोलणाऱ्यांच्या उच्छृंखल जिभेला आतां निदान एक वर्षभर तरी विसावा मिळाला आहे. आतां तरी ते निदान शांत मनानें व न्यायशील बुद्धीनें तिच्या आचरणाविषयीं आपल्या मनाशीं विचार करोत ! व त्यांना हा विचार करण्यास साधन मिळावें ह्मणून आम्ही

पुढील पत्रें देत आहों. यावरून तिच्या मनाची वास्तविक स्थिति कशी होती ह्याची कल्पना सहज करतां येईल.

Poona.
26th Aug. 1887.

My dear—bai,

I was very glad to get a letter from you after such a long time. I thank you very much for writing. I was glad to learn that you spent. your time in reading different Marathi books I send you a book called "Mitrachandra." I hope you will like it. I think it is the prettiest story book I ever read in Marathi. The story is about two friends and oh! how they suffered for each other! You cannot help crying when you read it. It shows you what true friendship really is. Another nice book that I should like you to read is "Venu." Oh! it is such a pretty story! Venu was such a dear little girl! and she was married when only nine years old to a young boy who was given up to vice! Her father-in-law and mother in-law were so unkind to her that they even used to beat her sometimes. But though she was so young, when she went to her mother's house, she never spoke a word about how she was treated at her husband's house, because she thought it would hurt her father and mother.

Her husband used to go out at night and would tell her that she was not to mention it to his mother-in-law. Venu always obeyed her

husband ; and when he was out at night, she would sit up in her bed and cry to God with all her heart that He might give sense to her husband and prevent him from doing wrong! Sometimes she would be quite disappointed and say to hereself " what is the use of crying to God ? I have prayed and prayed but He never seems to listen," and so she would go and lie down on her bed, but she could not sleep. Her heart would say to her, " Do not give up hope. God will surely listen to your prayer some day." So she got up again and prayed to God and He did listen to her at last. After many days her husband saw how she suffered and he began to take pity upon her and became a good husband ! and our poor Venu was happy and thankful. I had the book presented to me by one of my friends and would have gladly sent it to you but I am sorry to say I have lost it. I think I gave it to some one to read and it was not returned to me. With my love to you.

I am
Your loving friend
AVADI.

मराठी पुस्तकें वाचण्याची आवडीस किती हौस होती व या पुस्तकांचे गुणदोष समजण्याचीही तिच्या अंगीं किती शक्ति आली होती हेंही या पत्रावरून समजतें; परंतु आमच्या मतें या पत्रांत जो एक महत्वाचा मुद्दा आहे तो निराळाच आहे. ह्या पत्रांत वेणूच्या दुःखांत व ईश्वरकृपेनें पुढें वेणूला जें सुख

झालें त्या सुखांतही आपला वाटा आहे असेंच जणुं काय आवडीस वाटूं लागलें होतें. इतकें तादात्म्य होण्याला स्वतःच्या मनाची स्थिति तशी असली पाहिजे. नाहीं तर असे अंतःकरणांतून उद्गार निघावयाचे नाहींत. जी स्त्री वेणूसारखीच सहनशील व सदाचरणी असेल तिच्याच हृदयाला गहिंवर येऊन वाहवा! शाबास! वेणू! शाबास! अशीं अक्षरें तिच्याच सद्गदित कंठांतून निघावयाचीं. दुराचरणी स्त्रीस वेणूची अत्यंत सहनशीलता, तिचा ईश्वरावरचा भाव, हीं मुळीं खरींच वाटणार नाहींत व वेणूसारख्या गरीब मुलीला तशी स्त्री वेडगळ माणसांतच मोजील. "लाचावलें मन लागलीसे गोडी" असा प्रकार जेथें झाला असेल तेथें सदाचरण कडू वाटूं लागतें; मग त्याची प्रशंसा कोठून होणार? असो.

आणखी एक विशेष गोष्ट या पत्रांत ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. या पत्रांत चालू सामाजिक व्यवस्थेविषयीं तिटकाऱ्याचा एकही शब्द नाहीं. कित्येक लोकांचा असा समज आहे कीं इंग्रजी शिकलेल्या मनुष्यांस व विशेषतः तशा स्त्रियांस आपली सामाजिक व्यवस्था सर्व उलथी पालथी करून टाकावी असें वाटूं लागतें. तसेंच जर आवडीला वाटत असतें तर आपल्या मैत्रिणीला लिहिलेल्या या पत्रांत चालू व्यवस्थेस उद्देशून दहा पांच तरी कठोर-

शब्दाचा उपयोग तिनें केला असता; वेणूच्या मारकट सासूसारख्या कजाग बायकांना दहा पांच तरी शिव्या हंसडल्या असत्या परंतु आवडीच्या मनाची स्थिति तशी नव्हती; शिवाय, सुधारणेच्या कामीं उताविळपणा करणेंही प्रशस्त नाहीं हें आपलें मत तिनें मागील एका पत्रांत व्यक्त केलेंच आहे. वेणूच्या गोष्टींत चालू व्यवस्थेचीं जीं दुःखें आहेत त्यांचें यथार्थ चित्र उभें केलें आहे. अशा संकटांतून ईश्वरकृपेनें ती निभावून निघाली हें तिच्या शीलाचें महात्म्य व आवडीला जें रुचलें तें हेंच वेणूचें सुशील रुचलें यांत संदेह नाहीं. ह्याच मासल्याचा आणखी एक लेख तिच्या निबंधांत आहे. तो येथें देतों. तो वाचल्यावर पाश्चात्य विद्येच्या संस्करानें तिचे मनावर काय परिणाम झाला होता हें स्पष्ट होईल.

"ON MY FAVOURITE POEM."

Of all the poems that I have ever read (though I have read but few) I like Savitri Akhyana (the story of Savitri) the best. This poem is composed by Moropant, one of the best Marathi Poets. The story of the poem is as follows:—

Savitri was the dauhghter of a king named Ashwapati. She fell in love with the son of a deposed and blind king. His name was Satyavant. He was very young when his father became blind, and his enemies taking advantage of this took possession of his crown and banished him

from the kingdom. From that time he lived with his wife and son in a small cottage in a forest and there too they were happy and content. The Princess Savitri while travelling with her father's permission to look out for a husband passed through the forest where Satyavant lived with his blind old parents. They entertained her in their cottage for a day and she was so struck with the polite manners and the beauty of the young prince, that she fell in love with him and married him, getting but a reluctant consent from her father. After her marriage she lived with her husband in that poor cottage, refusing all her father's rich gifts. One day ( on the 15th of Jyeshtha, the third month of the year ) she went into the forest with her husband to worship the tree of Vata. ( ह्या वृक्षाची पूजा केली असतां आपल्या पतीस दीर्घायुष्य येतें असें पुराणांत सांगितलें आहे. ) After they had performed the rites, they were walking together in the forest, when sudden a serpent bit Satyavant's foot and he fainted. She sat down on a stone and put his head on her lap and tried to bring him to his senses. But it was all in vain. He was dead : she lamented over him so bitterly and prayed to God so earnestly that He restored her husband to life again. This is the story of the Poem.

The description of the beauty and grandeur of nature in the solitudes of the dense forest, the plain living and the deep feeling and tenderness of the lovers is repersented in such a charming

manner ; The passage in which Savitri's deep sorrow at her husband's death is described, is so extremely touching that one cannot help shedding tears. Her joy and gratitude when her husband rises to life again ( as if he had been asleep ) is depicted so naturally—and her prayers to Yama, begging him not to take away her husband are so full of pathos that I think the poem of the most beautiful I have ever read.

सावित्रीचे आख्यानासारखें दुसरें कोणतेंच काव्य मला प्रिय नाहीं असा वरील निबंधाचा आशय आहे. वरील निबंध शाळेंतल्या नित्य क्रमापैकीं एक होता व अशा प्रसंगीं तिनें महाकवि शेक्स्पियर किंवा मिल्टन् यांच्या एखाद्या काव्याचें नांव सांगितलें असतें तर चाललें असतें, कदाचित् तसें करणें तिच्या अध्यापिकेला ह्मणजे मिस् हर्फर्ड बाईला विशेष आवडलें असतें; किंवा सावित्रीचें आख्यान न सांगतां कविकुलगुरू कालिदास यांच्या काव्यांपैकीं किंवा इतर संस्कृत काव्यांपैकींही दुसरें एखादें आख्यान तिनें कां सांगितलें नाहीं ? मोरोपंतांनीं ही पुष्कळ आख्यानें लिहिलीं आहेत, परंतु त्या सर्वांत हेंच आख्यान हिला विशेष कां आवडावें ? ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यास एकच मार्ग आहे. ‘ समानशीलव्यसनेषु सख्यम् ’ ह्या ह्मणीप्रमाणें समान मनोधर्म दृष्टीस पडले असतां तेथें चित्ताची आसक्ति

होते हा नियम आहे. कामी पुरुषाला शृंगारादि कथांची गोडी वाटते, विरक्त मनुष्याला वेदान्त वाद आवडतात. आवडीची वृत्ति लहानपणापासून मोठी समाधानी होती. तिचा ईश्वरावर भरंवसा होता, यामुळें ज्या आख्यानांत समाधानवृत्तीचा कळस आहे, ज्यांत ईश्वरभक्तीची व ईश्वरीकृपेची ही पर्याप्ति आहे असेंच आख्यान आवडीच्या स्वभावास आवडावें हेंच योग्य आहे. सावित्री एका राजाची मुलगी होती व तिला सर्व गोष्टी अनुकूळ होत्या असें असून ही सत्यवानासारख्या निर्धन तपस्याचे गुणांवर तिचें मन आसक्त होऊन राजलक्ष्मीचा धिक्कार करून तिनें अरण्यवास आपल्या खुषीनें पत्करावा, व शांत निवांत आश्रमांत तपस्विजनांच्या नित्य व्यवसायांत त्या उभयतांनीं सुखानें दिवस काढावे, व त्या सुखांत विघ्न आणण्याकरितांच जणूं काय विधात्यानें सर्पदंशाचे निमित्तानें सत्यवानाचें मरण घडवून आणावें व पुनश्च शुद्ध आचरण आणि निर्व्याज ईश्वरभक्ति या दोन गुणांचें पारितोषिक व्हावें म्हणूनच कीं काय परमेश्वरानें त्या अकाल मृत्यूपासून सत्यवानाला मुक्त करावें व सावित्रीला अखंड सौभाग्याचें दान करावें, हें सर्व संविधानक खरोखरच फार रमणीय आहे. परंतु केवळ मनाला आनंद देणारीं आख्यानें आणि काव्यें अनेक आहेत

त्यांत हेंच आख्यान आणि काव्य आवडीला पसंत पडलें याचें कारण तिची आवड तशी. होती. पंच पक्वान्नाचें ताट एखाद्यापुढें आणून मांडलें व या पक्वान्नापैकीं कोणतें पक्वान्न तुला आवडतें ह्मणून विचारलें तर त्याला जें आवडत असेल त्याचेंच तो नांव सांगेल. यावरून इतर पक्वान्नें कमी योग्यतेचीं आहेत असा अर्थ होत नाहीं, परंतु रुचिवैचित्र्य मात्र व्यक्त होतें, व हें रुचिवैचित्र्य ज्याच्या त्याच्या मनोधर्मावर व संस्कारावर अवलंबून असतें. सारांश आवडीच्या मनाला सावित्रीचें आख्यान रुचलें याचें कारण हेंच कीं सदाचरणासारखी दुसरी कोणतीही गोष्ट तिला प्रिय नव्हती. इंग्रजी शिकल्यानें स्त्रियांची नीति बिघडेल, त्या उद्धट होतील, नवऱ्याची अवज्ञा करूं लागतील, गृहकृत्याचा कंटाळा करूं लागतील वगैरे अनेक भविष्यें आपण लोकांच्या तोंडून ऐकतों ; परंतु खरी विद्या प्राप्त झाली असतां तिचा स्त्रियांच्या मनावर काय संस्कार घडतो हें पुढील लहानशा निबंधावरून स्पष्ट होईल.

*An Ideal Woman.*

" A woman should be physically strong, tall, well formed and pretty. She should be active and cheerful. A woman ought to be very gentle and modest. She should never be lazy or

obstinate. She should be true, loving and obedient to her husband. She should always help him in his work, cheer him in his troubles and share in his happiness as well as in his sorrow. She ought to take great care of her children and instruct them so as to make them good. In this way she should be a good wife and good mother. She ought to be very gentle, kind and thoughtful and she ought to love and fear God. Above all she should be strictly religious for without religion no woman can fulfil all that is required of her as maiden, wife or mother."

उत्तम स्त्रीचीं लक्षणें काय हा वरील निबंधाचा विषय आहे, व यांत आवडीनें आपल्या समजुतीप्रमाणें हीं लक्षणें दिलीं आहेत. हा निबंध फार महत्वाचा आहे ह्मणून आह्मी याचें भाषांतर खालीं देतों.

"स्त्री शरीरानें सुदृढ असून उंच असावी. तिचा बांधा सुबक असून ती देखणी असावी. ती चलाख आणि आनंदी असावी, व तिची वागणूक सौम्य व मर्यादशीळ असावी. तिची नवऱ्यावर अनन्यभक्ति असून तिनें त्यांजवर प्रीति करावी व त्याची आज्ञा मानावी. त्याच्या कामकाजांत तिनें त्याला मदत करावी, त्याला दुःख झालें असतां त्याचें प्रोत्साहन करावें व त्याच्या सुखांत आणि दुःखांत वाटेकरी व्हावें. तिनें आपल्या मुला-

बाळांची अत्यंत काळजी घ्यावी आणि तीं चांगलीं निपजावीं ह्मणून त्यांना तिनें शिक्षण द्यावें. या रीतीनें तिनें सुपत्नी आणि सुमाता व्हावें. तिची वृत्ति सौम्य, दयाळू आणि विचारशील असावी आणि तिची ईश्वरावर भक्ति असून त्याची भीति ही तिनें पोटीं बाळगावी. सर्वांत विशेष गोष्ट ही आहे कीं तिनें धर्माचरण सोडूं नये कारण कुमारी, स्त्री आणि माता या ज्या तीन अवस्था आहेत त्या सर्वांचीं कर्तव्यें धर्माचरणावांचून तिच्या हातून बजावलीं जाणार नाहींत."

स्त्रीशिक्षणाचा वृथा उपहास करणाऱ्या लोकांनीं या वरील लक्षणांचा विचार करावा व हीं उत्तम लक्षणें विद्येवांचून प्राप्त होतील किंवा नाहीं याजविषयींही कांहीं विचार करावा. नुसत्या दापदडपीनें किंवा परंपरागत चालत आलेल्या क्रमाचें अनुकरण केल्यानें हीं लक्षणें प्राप्त होतील असें जर त्यांचें मत असेल तर त्यांनीं खुशाल आपल्या मताचा हेका धरावा.

---

## भाग पांचवा.

---

आतां आवडीच्या अल्प आयुष्याच शवटल्या दिवसाची थोडीशी हकीकत सांगून आम्ही आमच्या वाचकांची रजा घेतों.

आवडीची प्रकृति सन १८८७ सालापासूनच विघडली होती. त्या सालीं प्रकृतीला आराम व्हावा म्हणून ती महाबळेश्वरास गेली होती परंतु तिला जसा गुण यावा तसा आला नाहीं. दुसरे वर्षीही ती बापाबरोबर महाबळेश्वरास गेली; परंतु या खेपेस तिची प्रकृति पहिल्यापेक्षांही अधिक विघडली. ह्मणून महाबळेश्वराहून परत आल्यावर औषध घेण्याकरितां कांहीं दिवस ती मुंबईस जाऊन राहिली. तेथेंही पण तिच्या प्रकृतीस बरें वाटलें नाहीं व उलटा खोकला अधिक झाला.

याप्रमाणें झुरूमुरू प्रकृति असूनही ती जेमतेम अक्टोबर महिन्यापर्यंत शाळेंत जात होती. अक्टोबरच्या २० तारखेपासून तिला तिच्या अभ्यासाच्या खोलींतही जाववेनासें झालें, व तिनें आपल्या मेजावरच्या तारिख—पत्रकावर १९ अक्टोबरची जी तारिख उलटून ठेविली आहे ती अझून जशीच्या तशीच आहे.

ती जातीचीच अशक्त होती व या वर्षी क्षयाच्या भावनेचीं चिन्हें तिजवर दिसूं लागलीं. तिच्या फुपुसांत विकार होऊन ती दिवसेंदिवस क्षीण होत चालली. तिच्या आईनें व बापानें उपचारांची पराकाष्टा केली. डाक्तर वैद्य वगैरे सर्वांनीं परीक्षा करून औषधें दिलीं, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. क्षयी माणसें

दुखण्यानें अतिशय ग्रासलीं असतांही शुद्धीवर असतात असा अनुभव आहे, व तशीच आवडीचीही स्थिति होती. मरेतोंपर्यंत आवडी शुद्धीवर होती. मरणाचे आदलें दिवशीं ती फार विव्हळ होऊन पडली असतां अण्णासाहेब तिच्या पलंगाजवळ जाऊन उभे राहिले आणि तिला ह्मणाले "आवडे तूं आह्माला सोडून जाणार" आवडी म्हणाली "होय मी आतां जगेनसें मला वाटत नाहीं." इतक्यांत तिच्या पोटांत कळ उठूं लागली व ती ओरडूं लागली तेव्हां पुनः अण्णासाहेबांनीं तिला विचारलें "आवडे, तुझ्या डोळ्यापुढें काय दिसते? तुला मरणाची भीति वाटतें काय?" आवडी ह्मणाली, "मला मरणाची बिलकूल भीति वाटत नाहीं. मी पापाचरण केलें नाहीं मग मला परलोकीं जाण्याची भीति कां वाटावी? तुह्मां सर्वांस सोडून मी जात आहें व शिवाय मी जो हेतु मनांत धारण केला होता तो सिद्धीस जाण्यापूर्वीं मला देवाजीचें बोलावणें आलें आहे याबद्दल थोडें वाईट वाटतें, परंतु परमेश्वराचा हेतु कांहीं निराळा असेल. माझ्या पोटांत कळ येते ह्मणून मी ओरडते परंतु मला परलोकाचें कांहीं भय वाटत नाहीं." त्यावर अण्णासाहेबांनीं विचारलें "आवडे, तुझ्या मनांतून कोणास कांहीं द्यावयाचें असल्यास मला सांग" आवडी ह्मणाली "मी तुह्मांस

विनाकारण कां ओझें घालावें? आजपर्यंत तुह्मी जी माझ्यावर ममता केली ती मी कधीं विसरणार नाहीं व ती देवाच्या घरीं रुजु आहे, आतां मी कांहीं अधिक मागत नाहीं." हे तिचे शब्द ऐकून अण्णासाहेबांस गहिंवर आला आणि रडूं कोसळलें. तरी त्यांनीं कांहीं वेळानें तिला पुनः आग्रहानें विचारलें "आवडे तुझा कांहीं हेतु राहिला असला तर तो तूं मला सांग, देवानें आह्मांला पुष्कळ दिलें आहे, तेव्हां तूं मनांत संकोच बाळगूं नको." तेव्हां आवडी म्हणाली "मी यंदाचे वर्षी गोविंदराव चिंधडे यास कांहींच खर्चावयास पाठविलें नाहीं. दर वर्षास माझ्या स्कालरशिपच्या रकमेपैकीं पुस्तकें वगैरे घेऊन जें राहत असें तें मी त्याला पाठवित असे. यंदा ह्या दुखण्यामुळें माझी स्कालरशिप बंद झाली व मला त्या गरीबाचा समाचार घ्यावयास सांपडलें नाहीं." हे शब्द ऐकल्यावरोबर अण्णासाहेबांनीं गोविंदरावास २० रुपयांची हुंडी आवडीच्या नांवें पाठविली. आपली लाडकी शेवटली कन्या, जिच्याकरितां आपण लोकापवादासही जुमानलें नाहीं, जी मोठी होऊन आपल्या बुद्धिसामर्थ्यानें व शुद्ध आचरणानें प्रसिद्धीस येऊन कांहीं तरी स्वदेशाची सेवा करील अशी आशा बाळगली होती, ती हा लोक सोडून

जाणार हें पाहून त्यांना फार वाईट वाटलें. अशा सद्गुणी मुलीची आठवण कांहीं तरी रहावी असें सहजच त्यांच्या मनांत आलें आणि ते आवडीस ह्मणाले. "आवडे, तूं तर आतां जाणार, परंतु जे चार सज्जन तुला चाहतात त्यांना व आह्मांला तुझी आठवण होण्यास कांहीं साधन असावें ह्मणून तूं ज्या हायस्कुलांत होतीस त्या हायस्कुलांत तुझ्या नांवचे एक बक्षीस ठेवावें असा माझा बेत झाला आहे, तर तुला कोणता विषय विशेष आवडत होता हें सांग." आवडी ह्मणाली "अण्णासाहेब, माझी आठवण मागें रहावी अशी कांहींच मोटी कृति माझे हातून घडली नाहीं. एवढा माझा बहुमान करण्यास मी सर्वस्वी अयोग्य आहे." तथापि अण्णासाहेबांनीं फारच आग्रह धरल्यावरून ती ह्मणाली "तुमची तशीच मर्जी असेल, तर मला गणित आणि ड्राइंग हे दोन विषय शिकण्याची हौस होती." "बरें तर, जी मुलगी हे दोन विषय चांगली शिकेल तिला तुझ्या नांवचे एक बक्षीस देण्याची मी आतांचे आतां तजवीज करतों." असें ह्मणून त्यांनीं १००० रुपयांची प्रामिसरी नोट वरील आशयाचे पत्र लिहून गर्ल्स् हायस्कूलचे सेक्रेटरी यांजकडे पाठविली. वरील भाषण झाल्यावर ती सुमारें चोवीस तास होती. मंगळवार तारीख २२

जानेवारी रोजीं दुपारीं २ वाजतां हा देह या लोकीं ठेवून जेथें अखण्ड सुख आहे, व जेथें दुर्जनाच्या उच्छृंखल जिभेला अवसर मिळत नाहीं अशा शान्त व आनंदरूप लोकीं तिनें प्रयाण केलें.

आवडीबाई वारल्यावर तिच्या मैत्रिणींकडून व तिला ज्या बाया शिकवीत असत त्यांजकडून दुःखवट्याचीं पत्रें आलीं. हीं सर्व पत्रें देऊन पुस्तकांत भर घालणें योग्य नाहीं. तथापि त्यांपैकीं एक दोन पत्रें वाचकांस सादर केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

मिस् जे. मोर या बाईचे पत्रांत पुढें लिहिल्याप्रमाणें मजकूर आहे.

"Our beloved pupil, Avadabai, has gone but her memory will ever live in the hearts of those who had the privilege of instructing her. I say privilege, because who that has taught her will deny that it was both a pleasure as well as a privilege, to have led a mind so eminently gifted, as hers was, in the path of knowledge.

She did every-thing she undertook well. "Thorough" seemed to led her motto.

I had the good fortune to teach her Mathematics (a subject in which she took special delight) for upwards of 2 years, and I think during this short time she accomplished wonders. I always looked forward to the hour that I spent

in teaching her. She had a very retentive memory and grasped things very quickly.

My sister taught her music and gold embroidery. In the former she would have excelled asshe did in everything else, had her health permitted her to devote to it the necessary time. As for embroidery, specimens of work done by her speak for her skill in that department of needle work.

Avadabai's amiability of temper endeared her alike to her companions and teachers. But I think *the most beautiful feature in her character was her extreme humility.* Her extraordinary abilities, the praise alike of teachers and visitors, the honors she won every year, none of these things had any power to make her other than she was, *meek* and *good.*"

M. Sorabji या बाईचें तारीख ३१ जानेवारी रोजीं एक पत्र आलें, त्यांत आवडाबाईविषयीं जे उद्गार आहेत ते वाचून पाहिले असतां आवडाबाईचे मरणानें आपल्या देशाचा मोठा घात झाला असें वाचकांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. तें पत्र येणेंप्रमाणेः—

Dear Mr. Bhide,

I cannot tell you what dear Awdabai was to me! Pupil indeed—but I regarded her as a sister—a friend. Ever an ardent student, to teach her was a pleasure—to converse with her no less a delight. An idea was scarcely formulated before it was grasped with that intelligent interest and

appreciation that made the hours of study alike pleasant and profitable to us both. Often did we hold sweet converse together, and if she was an example to the pupils of the High School, she was as much a pattern to me. Frequently was I cheered by her affection, inspired by her diligent zeal—encouraged by her perseverance. Though so talented, she was ever diffident about her own abilities and always depreciated her achievements. Her filial affection, sisterly love, obedience, gentleness and modesty endeared her to us all.

*No one can ever fill her place in the school and in our hearts.* I think you are ( though bowed down with grief now ) happy parents to have had such a daughter! We can only trust that others will be enabled to walk in her steps and try to " make their lives sublime."

I am,
Yours in deep sympathy,
( Sd. ) M. SORABJI.

पुढें कांहीं दिवसांनीं याच बाईनीं आणखी एक पत्र पाठविलें व त्या पत्राबरोबर एक लहानशी पण फार चटकदार इंग्रजी कविता पाठविली. तें पत्र व कविता पुढें दिलीं आहेत:—

Dear Mr. Bhide,

A day or two after the sad event of January 23rd ( 22 ?) I wrote the accompanying lines. I was going to tear up the papers as the verses seemed so very unworthy of the subject, but it

occurred to me that you might like to keep them in remembrance of her who is gone.

Yours sincerly,
( Sd. ) M. Sorabji.

*In Memoriam*

AVADIBAI BHIDE.

Farewell to thee, Avadi, beloved and best.
No longer thy sweet face we see,
The Father has beckoned thee home to thy rest
And we breathe " requiescat " for thee.
Brief, brief was thy mission, shortlived thy career,
And chequered thy young life with pain,
But Heaven now greets thee, thy true home so dear,
Of sorrow thou'lt not taste again.
In that land, where widowhood brings no disgrace,
And trammels of caste are unknown
Where the soul's satisfaction is seeing God's face,
And worshipping round the White Throne.
We mourn thee beloved, we grieve for thee now,
Thy place not another may fill,
Yet in meek submission to Heaven to bow
We would learn, and to love His blest will.
As daughter, as sister, as pupil, as friend.
Example of love thou hast set.
Of patience in suffering and trust to the end

This, thy dear ones can never forget.
O, well may we lay thee "in pace" to rest,
And trust soon to meet thee above,
In those "many mansions" where thou art a guest.
Where in the King's presence is love.

या वरील कवितेचें मराठी भाषांतर पद्यरूपानें देतों. हें मराठी पद्य मूळाशीं ताडून पाहिलें असतां अगदीं नीरस वाटेल, तथापि त्याचा उदात्त भावार्थ नमन करण्यासारखा आहे.

॥ श्लोक ॥

बाले ! सद्गुणशालिनि ! प्रियतमे ! घेतों तुझा आवडे ! ।
आतां शेवटचा निरोप, न पुन्हां या लोकिं भेटी घडे ॥
विश्वाच्या जनकें स्वकीय चरणीं पाचारिलें गे तुला ।
विश्रांती तुज द्यावया ह्मणुनियां हा अंजली अर्पिला ॥ १ ॥
होतें अल्पचि कार्य, अल्पचि तुझें वास्तव्यही जाहलें ।
अल्पायुष्य असून त्यांतचि गडे दुःखाद्रि कोसाळले ॥
जाशी आज तया गृहा सखि, खरें माहेर जें लाडकें ।
दुःखाचा लवलेश नांवहि गडे जेथें नसे ठावकें ॥ २ ॥
जी वैधव्यविटंबना इहजनीं, ती जेथ ना ठावकी ।
जीं जीं ज्ञातिनिबंधनें इहजनीं, तीं सर्वही पारखीं ॥
जेथें ईश्वररूपवीक्षणसुखीं तल्लीनता पावुनी ।
आत्मा जोडुनि धन्यता रमतसे विश्वेश्वरोपासनीं ॥ ३ ॥
आह्मी त्वद्विरहामुळें रडतसों शोकार्त होऊनियां ।

नाहीं त्वत्सम अन्य कीं मज गमे होणार लोकांतया ॥
ईशाचा नच हेतु तो कळतसे, घेऊं परी या शिरीं ।
ईशादेश, असें गडे उचित हें या लोकिंया पामरीं ॥ ४ ॥
कन्या वा भगिनी तुला गणुं जरी शिष्या सखी वागडे ।
प्रीतीचें सकलां निदर्शनचि तूं झालीस गे आवडे ॥
दुःखें सोशिलिं पूर्णभाव धरुनी बाले ! तुवां ईश्वरीं ।
याची विस्मृति ना पडेल तुझिया मित्रांचिया अंतरीं ॥ ५ ॥
प्रेमें मित्रजनें त्वदर्थ सखये हा अर्पिला अंजली ।
काळें होइल गे समागम तुझा आम्हांसि दिव्यस्थळीं ॥
जेथें शांति सदैव वास करिते विश्वेश्वराचे घरीं ।
प्रीती नांदतसे अखंड, वसतो जेथें कृपाळू हरी ॥ ६ ॥

वर जीं दोन दुखवट्याचीं इंग्रजी पत्रें दिलीं आहेत त्यांपैकीं पहिल्या पत्राचा आशय पुढें दिला आहे. त्यावरून आवडीला शिकविणाऱ्या ज्या अध्यापिका या शाळेंत आहेत त्यांचा अभिप्राय आवडीविषयीं काय होता हें समजेल.

"आमची प्रियशिष्या आवडाबाई ही तर देवलोकीं गेली; परंतु तिला शिकविण्याचा थोर अधिकार ज्यांना प्राप्त झाला होता त्यांच्या हृदयांतून तिची आठवण कधींही नाहींशी होणार नाहीं. मी "थोर अधिकार" असे शब्द वरच्या वाक्यांत योजिले, कारण अशा असाधारण शक्तीच्या मनाचा ज्ञानमार्गांत प्रवेश करण्याचें काम ज्यांकडे होतें ते

लोक आवडाबाईला शिकविणें हें एक मोटें भाग्य आणि हा एक मोठा अधिकार असेंच मानीत होते.

"जें जें तिनें हातीं धरलें तें तें तिनें शेवटास नेलें. कोणत्याही कामांत कसर राहूं द्यावयाचीच नाहीं, अशी जणूं काय तिनें प्रतिज्ञाच केली होती.

"तिला गणित शिकविण्याचें काम २ वर्षें माझ्या सुदैवानें मजकडे आलें होतें. हा विषय शिकण्यांत तिला पराकाष्ठेचा आनंद वाटत असे; आणि या दोन वर्षांच्या अवधींत या विषयांत तिची फारच विलक्षण गति झाली. तिला शिकविण्याचा तास केव्हां येईल असें मला होत असे. ती विषयाचें ग्रहण लवकर करी व तिची स्मरणशक्तीही फार जबर होती.

"गायन आणि कलाबतूचें कशिद्याचे काम हे दोन विषय तिला शिकविण्याचें काम माझ्या बहिणीकडे होतें. गायनांतही ती प्रवीण झाली असती; परंतु तिच्या प्रकृतीमुळें तिला त्या विषयाकडे वेळ खर्च करतां येईना. कशिद्याचे कामांत ती किती निपुण होती ह्याविषयीं तिच्या हातचें तयार झालेलें काम साक्ष देतच आहे.

"तिच्या गोड स्वभावामुळें ती आपल्या बरोबरीच्या मुलींस जितकी प्रिय होती तितकीच शिक्षक स्त्रियांसही प्रिय होती; परंतु तिच्या अंगांत जो ओतप्रोत विनय होता हाच तिच्या सर्व गुणांत विशेष

मनोवेधक गुण होता असें माझें मत आहे. तिचे अंगीं अलौकिक गुण होते; तिचे शिक्षक तिची तारीफ करीत व शाळा पहाण्यास येणारे सद्गृहस्थही तिची प्रशंसा करीत; दर वर्षास तिला इनाम मिळून तिचा बहुमान होत असे; तथापि तिच्या अंगीं अभिमानाचा ताठा चढला नाहीं व शेवटपर्यंत ती जशीच्या तशीच नम्र आणि सत्वस्थ राहिली."

दुसऱ्या पत्राचा आशय पुढें देतों. त्यांत कांहीं विशेष मजकूर आहे.

"आवडाबाईचा आणि माझा काय संबंध होता हें मला सांगतां येत नाहीं. ती माझी शिष्य तर होतीच होती; परंतु मी तिला आपली बहिण किंवा मैत्रिण असें मानीत असें. तिला ज्ञानप्राप्तीची अतोनात उत्कंठा होती आणि तिला शिकविण्यांत जितका आनंद वाटे तितकाच तिच्याशीं भाषण करण्यांतही आल्हाद होत असे. कोणत्याही विषयाचें दिग्दर्शन मात्र करण्याचा अवकाश, तों ती आपल्या बुद्धिसामर्थ्यानें झट्कन त्याचें ग्रहण करी आणि यामुळें तिला शिकवितांना तिला व मला उल्हास वाटून दोघांचाही फायदा होत असे. तिचें आणि माझें वारंवार संभाषण होत असे व त्या प्रसंगीं मला फार आनंद वाटे; आणि हायस्कुलांतील मुलींना तिनें जसा कित्ता घालून दिला तसेंच तिचें आचरण

मलाही पण अनुकरण करण्यासारखें होतें. जेव्हां जेव्हां मला उदास वाटे तेव्हां तेव्हां तिनें आपल्या प्रीतियुक्त भाषणांनीं माझ्या अंगीं पुनः हुरूप आणावा, तिची तत्परता पाहून मला स्वकर्तव्याविषयीं आवेश यावा आणि तिचा दृढनिश्चय पाहून मलाही धैर्य यावें. असे प्रसंग अनेक वेळ घडून आले. तिची बुद्धि जरी इतकी तरतरित होती तरी आपल्याला कांहीं येतें असें तिला कधींच वाटलें नाहीं. आणि जें तिनें संपादन केलें होतें तें कांहींच नाहीं असें ती मानी. पितृभक्ति, बंधुप्रीति, आज्ञाधारकता, सौम्यपणा आणि विनय या तिच्या गुणांनीं ती आह्मां सर्वांस फार प्रिय झाली होती.

शाळेंत तिची आठवण न होऊं देणारी अशी मुलगी तर होणारच नाहीं; परंतु आमच्या अंतःकरणांतून तिची मूर्ति कधींही जाणार नाहीं. अशी मुलगी तुमच्या उदरीं व्हावी हें तुमचें मोठें भाग्यच होय असें मी समजतें (आणि हल्लीं जरी आपण शोकाकुल अहां तरी मुद्दां हें ह्मटल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं) आतां आह्मी इतकेंच मागतों कीं तिचा कित्ता गिरविण्याची शक्ति पुष्कळ मुलींस येऊन त्याही आपलें जीवित अशाच उदात्त आचरणांत घालवोत."

शाळेंतील मुख्य अध्यापिका मिस् हर्फर्डे ही

होईल. परंतु ही रोजनिशी प्रसिद्ध करणें हें आह्मा-
ला अवश्य वाटलें. आवडाबाईवर दैवानें एकामागून
एक संकटें आणलीं व तीं तिनें मोठ्या धैर्यानें सो-
सलीं, तिचा ब्राह्मणज्ञातींतील कांहीं अप्रबुद्ध लो-
कांनीं अतोनात छळ केला व तो सतत चालू असतां-
ही ती डगली नाहीं. तीं संकटें, तो छळ, तें धैर्य
व ती ईश्वरभक्ति हीं जगापुढें मांडून आवडाबाई-
चीच सेवा करावी व तिनें आपलें अल्प आयुष्य
कसें कंठिलें याविषयीं सूज्ञ व न्यायशील लोकांस
आपला अभिप्राय यथार्थ देतां यावा, व तिचें उदा-
हरण घेऊन इतर मुलींनींही तिच्या अमोल गुणांचें
अनुकरण करावें हे हेतु मनांत धरून आम्हीं ही
रोजनिशी प्रकट केली आहे. हे हेतु तिला परलोकीं
पसंत पडतील असा भरंवसा जाणून हें काम आम्हीं
हातीं धरिलें व यथामति शेवटास नेलें.

## IN MEMORIUM.

—oo—

जी आवडी आवडती पित्याची
जी जीव कीं प्राणचि माउलीची ।
जी लाडकी सर्व सहोदरांची
जी पट्टशिष्या निजशिक्षकेची ॥ १ ॥

स्त्रीशिक्षणाचें सुकुमार बीज
जें लाविलें पुण्यपुरीं सतेज ।
त्याची नवी जी गमली नवाळी
कोमेजली ती पडतांचि डोळीं ॥ २ ॥

वैधव्यदुःखा विसरूनि सर्वा
मातापित्याचा परितोष व्हावा ।
ह्मणूनि जी तत्पर नित्य होती
कोठें असे बालक आवडी ती ॥ ३ ॥

गीर्वाणभाषागहनीं प्रवेश
करूनि जीला नच तृप्तिलेश ।
ह्मणूनि आङ्गलाटविमाजि जीनें
संचार केला दृढनिश्चयानें ॥ ४ ॥

दोहोंतही साधुनि नैपुणातें
जीच्यासमाधान न अंतरातें ।
ह्मणूनियां चित्रकलेसि घाली
जों हात तों त्यांत प्रवीण झाली ॥ ५ ॥

विद्या असे जी विनयोपपन्न
तिलाच विद्या ह्मणतात विज्ञ ।
तिलाच येतें फळ गोड, जैशी
श्रद्धा फळे जोडिलि जी विधीशीं ॥ ६ ॥

असूनि विद्या विनयासि जोडी
न संकटीं जी निजधैर्य सोडी ।
विवेकशस्त्रें निजदुःख तोडी
दुर्वासनाङ्कूर समूळ मोडी ॥ ७ ॥

जी जाहलीसे उपमान सर्वां
शिष्यां धरी जी न तथापि गर्वा ।
जी भासली बालसरस्वतीची
मूर्तीच, सीमा गमली मतीची ॥ ८ ॥

दुर्भाषणीं जो छळ दुष्ट लोकीं
केला तियेचा न तयासि लेखी ।
एकाग्रचित्तें निजकार्य साधी
यती जसा लावुनियां समाधी ॥ ९ ॥

ही धाकुटी होइल बाळ मोठी
आशा अशी वाटलि फार पोटीं ।
परंतु झालें प्रतिकूल दैव
त्याच्या पुढें कांहिं नसे उपाव ॥ १० ॥

वाटे मना देशचि हा अभागी
जीं माणसें चांगलिं तींच रोगी ।

आनंदिबाई निजधामवासा
गेली न तों ही दुसरी निराशा ॥ ११ ॥

वाटे मना क्रूर असे परेश
ह्मणूनि आह्मां करितो हताश ।
परंतु कां दोष तयासि द्यावा
उद्देश त्याचा मनुजां न ठावा ॥ १२ ॥

वाटे परी जाहलि थोर हानी
अशी न होणार पुनश्च कोणी ।
सुशिष्य, सन्मित्र तशी सुकन्या
स्वसद्गुणें जी उपमान धन्या ॥ १३ ॥

23rd Jaunary, 1889.